उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी
■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २२० ■ नाशिक, शुक्रवार, दि. ९ मे २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

## आयएनएस विक्रांतकडून कराची बंदरावर हल्ला

भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध परिस्थिती निर्माण झाली आहे. पाकिस्तानने ड्रोन हल्ले केल्यानंतर भारताने तीव्र प्रत्युत्तर दिले आहे. लाहोरसह अनेक शहरांवर हल्ले झाले आहेत आणि वीजपुरवठा खंडित झाला आहे. भारतीय सैन्य पाकिस्तानच्या कोणत्याही कृतीला तोंड देण्यास तयार आहे.




# अखेर युद्ध पेटलं...

## भारताची लाहोरपर्यंत मुसंडी, पाकची रडार यंत्रणा उद्ध्वस्त



**नवी दिल्ली :**
**भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावाची स्थिती वाढली आहे. कोणत्याही क्षणी युद्धाला सुरुवात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भारताने ऑपरेशन सिंदूर करून पाकिस्तानला मोठा दणका दिला असला तरी अजूनही ऑपरेशन सिंदूर संपलेले नाही. पाकिस्तानच्या लाहोर शहराचे रक्षण करण्यासाठी लावलेली एअर डिफेन्स सिस्टिम भारताने उद्ध्वस्त करून पाकिस्तानला मोठा दणका दिला आहे. अशातच आता जम्मू आणि काश्मीरमधील सध्याची परिस्थिती पाहता सर्व निमलष्करी दलाच्या तुकड्या तिकडे पाठवण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.**

- ■ पाकिस्तानात ब्लॅकआऊट
- ■ पाकचे ४५ मिसाइल पाडले
- ■ राजधानी इस्लामाबाद हादरले
- ■ सेनाप्रमुख मुनीरची उचलबांगडी!

जम्मू आणि काश्मीरमधील सध्याची परिस्थिती पाहता, सर्व निमलष्करी दलांच्या अतिरिक्त तुकड्या तिथे पाठवल्या जाणार आहेत. यामध्ये सीआरपीएफ, बीएसएफ, आयटीबीपी आणि एसएसबी यांचा समावेश आहे. महत्त्वाच्या तुकड्या सुरक्षा आणि सीमेवर राहणाऱ्या लोकांना सुरक्षित ठिकाणी नेणे ही त्यांची प्राथमिकता असणार आहे. भारतातल्या ऑपरेशन सिंदूरनंतर बिथरलेल्या पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. एक, दोन नव्हे तर भारताच्या लष्कराच्या १५ ठिकाणांवर पाकिस्तानने हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता, अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली. पण भारताने पाकिस्तानचे सर्व हल्ले उधळून लावले आहेत. बुधवारी (दि. ७) रात्री वायुदलाने पाकिस्तानातून येणारा हल्ला एस ४०० या एअर डिफेन्स सिस्टिमने नेस्तनाबूत केला. एअर डिफेन्स सिस्टिम असलेल्या भारताच्या युनिटचे नाव सुदर्शन चक्र आहे. भारताने नेमकं सुदर्शन चक्र पाकिस्तानवर सोडत पाकिस्तानी हल्ला निष्प्रभ केला. मात्र, याबाबत अजून अधिकृत सरकारी घोषणा झालेली नाही. भारताच्या एस ४०० या सिस्टिमने पाकिस्तानातून आलेली सर्व क्षेपणास्त्र आणि ड्रोन उडवून लावले.

ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानी सैन्याने पंजाब, गुजरात आणि राजस्थानमधील भारतीय लष्कराच्या तळांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे भारतीय वायुदलाने ड्रोनचा वापर करून लाहोरमधील पाकिस्तानची एअर डिफेन्स सिस्टिम आणि /-...४

### अशी होती एचक्यू-९ हवाई संरक्षण यंत्रणा

एचक्यू-९ही चीनने विकसित केलेली सुरक्षा यंत्रणा आहे. हवाई हल्ले रोखणे आणि प्रतिकार करण्यासाठी ही यंत्रणा वापरली जाते. एकाचवेळी १०० टार्गेट ट्रॅक करून ते उद्ध्वस्त करण्याची क्षमता या यंत्रणेची होती. २०२१ मध्ये पाकिस्तानने आपल्या ताफ्यात तिचा समावेश केला होता. राफेल, सुखोई आणि ब्राह्मोस क्षेपणास्त्रांसारख्या भारताच्या हवाई धोक्यांना रोखसाठी पाकिस्तानने चीनकडून यंत्रणा घेतली होती.

## जम्मू, पठाणकोट, जैसलमेर, होशियारपूरवर ड्रोन हल्ला

### भारताचाही करारा जबाब, ड्रोन हवेतच केले नष्ट

**नवी दिल्ली :**
**ऑपरेशन सिंदूरमुळे बिथरलेल्या पाकिस्तानने आगळीक केली असून, त्याने भारतावर ड्रोन हल्ले केले. जम्मू, पठाणकोट, जैसलमेर, पंजाबमधील होशियारपूरवर पाकिस्तानने ड्रोन हल्ला केला. पाकिस्तानच्या हल्ल्यांनंतर या ठिकाणी ब्लॅकआऊट करण्यात आले असून, भारताची डिफेन्स सिस्टिम सक्रिय झाली आहे. भारताने पाकिस्तानचे अनेक ड्रोन पाडल्याची माहिती समोर आली आहे. जम्मूतील विमानतळ हे पाकिस्तानचे लक्ष्य होतं, अशी माहिती समोर येत आहे.**

गुरुवारी रात्रीच्या वेळी भारताच्या हद्दीतील जम्मू शहरात पाकिस्तानच्या ड्रोनचा हल्ला सुरू झाला. त्यानंतर जम्मूमध्ये ब्लॅकआऊट करण्यात आले आणि सायरन वाजवून लोकांना सावध करण्यात आले. त्यानंतर या प्रदेशाचा ताबा लष्कराने घेतला. दरम्यान, भारताची डिफेन्स सिस्टिम एस ४०० सक्रिय झाली आणि त्या माध्यमातून भारताने पाकिस्तानच्या अनेक ड्रोनला हवेतच लक्ष्य केले.

पाकिस्तानच्या या हल्ल्याला प्रत्युत्तर देत भारताने लाहोरमध्ये ड्रोन घुसवून त्यांची एअर डिफेन्स सिस्टिम निकामी केली. त्यामुळे पाकिस्तानची जगभरात नाचक्की झाली. परिणामी, पाकिस्तानमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं. तरीही पाकिस्तानने आता पुन्हा आगळीक केली आणि जम्मूवर ड्रोन हल्ला केला.

**विमानतळ लक्ष्य होतं**

जम्मूतील विमानतळ हे पाकिस्तानचे लक्ष्य होतं, अशी माहिती समोर आली आहे. जम्मूच्या विमानतळाच्या दिशेने जवळपास आठ ड्रोन येत होते. पण ते सर्वच ड्रोन हवेतच पाडण्यास भारताला यस आलं आहे.

**राजस्थानमध्येही ब्लॅकआऊट**

जम्मूनंतर राजस्थानच्या सीमावर्ती भागातही ब्लॅकआऊट करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. या सर्व सीमावर्ती भागात भारतीय लष्कर सक्रिय झालं आहे.

**भारताचे प्रत्युत्तर सुरू**

पाकिस्तानच्या आगळीकतेला भारताने आता प्रत्युत्तर द्यायला सुरुवात केली असून, पाकिस्तानवर हल्ला सुरू केला आहे. पाकिस्तानच्या भागात त्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाल्याचं चित्र आहे. /-...४

### पाकिस्तानची आगळीक सुरूच

पाकिस्तानच्या दहशतवादाला भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून प्रत्युत्तर दिलं आणि नऊ ठिकाणी हल्ला करून दहशतवादी तळं उद्ध्वस्त केली. त्यानंतर गुरुवारी सकाळी पाकिस्तानने शस्त्रसंधीचं उल्लंघन करून सीमाभागात गोळीबार केला. तसेच भारताच्या १५ शहरांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

### भारताने पाकिस्तानची दोन जेएफ-१७ विमाने पाडली



भारताने पाकिस्तानची दोन जेएफ-१७ विमाने पाडली असून, तशी कबुली पाकिस्तानच्या लष्कराने दिली आहे. पाकिस्तानचा संवादाच्या माध्यमावर विश्वास असून, आम्हाला शांती हवी आहे, अशी मुक्ताफळेही त्यांनी उधळली. पाकिस्तानचे हे विमान राजस्थानमध्ये पाडण्यात आलं असून, त्याचे अवशेष लष्कराच्या हाती लागले आहेत. भारताशी कुरापत करण्याच्या प्रयत्नामुळे पाकिस्तानने दोन विमाने गमावली. जेएफ-१७ विमाने ही चीनने पाकिस्तानला दिली होती.




### जम्मूमध्ये ड्रोन हल्ले कुठे झाले?

पाकिस्तानने ड्रोनने हल्ला करण्याचा प्रयत्न केलेल्या ठिकाणी जम्मू विमानतळ, जम्मू रेल्वे स्टेशन, चन्नी हिम्मत आणि जम्मूला लागून असलेला सीमावर्ती भाग आरएस पुरा यांचा समावेश आहे. भारताच्या हवाई संरक्षण प्रणाली S-४०० ने पाकिस्तानच्या या हल्ल्याच्या प्रयत्नांना हाणून पाडले.

### क्षेपणास्त्रांचा हल्ला

पाकिस्तानने भारतावर ड्रोन हल्ले केले. या हल्ल्याला भारताने लगोलाग उत्तर दिलं असून थेट इस्लामाबाद आणि लाहोरवर क्षेपणास्त्रांचा हल्ला केला आहे. गुरुवारी रात्री जम्मू शहरात पाकिस्तानचा ड्रोन हल्ला झाला. त्यानंतर जम्मूमध्ये ब्लॅकआऊट करण्यात आले आणि सायरन वाजवून लोकांना सावध करण्यात आले.

### भारताकडून पाकची ८ हजार एक्स अकाउंट बंद

भारताकडून पाकिस्तानची ८ हजार एक्स अकाउंट बंद करण्यात आली आहे. भारतानं अफवा रोखण्यासाठी हे पाऊल उचललं आहे.

### लाल रंगाचे गोळे हवेतच नष्ट

पाकिस्तानने भारताच्या दिशेने पाठवलेले ड्रोन हवेतच नष्ट करण्यात आले. आकाशातून जमिनीच्या दिशेने येणारे लाल रंगाचे गोळे हे तिथपर्यंत पोहोचू शकले नाहीत. भारताची एअर डिफेन्स सिस्टिम सक्रिय झाल्यानंतर सर्व डोन हे हवेतच पाडण्यात आले.

### इस्लामाबादवर हवाई हल्ला

यापूर्वी पाकिस्तानने जम्मू, राजस्थान आणि पंजाबमधील अनेक भागात ड्रोन हल्ले करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता, ज्याला भारतीय हवाई संरक्षण यंत्रणेने योग्य उत्तर दिले. भारताने त्यांच्या काउंटर ड्रोन सिस्टिम, एस-४०० वापरून पाकिस्तानची सर्व क्षेपणास्त्रे पाडली. एवढेच नाही तर भारताने पाकिस्तानची अनेक लढाऊ विमाने पाडली आहेत. भारताने पाकिस्तानचे २ जेएफ १७ आणि एक एफ-१६ विमान पाडले आहे.

### अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्र्यांची जयशंकर यांच्याशी चर्चा

अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांनी एस. जयशंकर यांच्याशी चर्चा केली आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने म्हटले आहे की, मार्को रुबियो यांनी भारताचे परराष्ट्र मंत्री सुब्रह्मण्यम जयशंकर यांच्याशी चर्चा केली. त्यांनी तणाव त्वरित कमी करण्यावर भर दिला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राजस्थान भागात पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले आहे.

### भारताने पाकिस्तानचा पायलट पकडला

भारताने राजस्थानमध्ये पाकिस्तानचे लढाऊ विमान पाडलं. यानंतर पाकिस्तानच्या एफ-१६ या लढाऊ विमानाच्या पायलटला ताब्यात घेण्यात आलं आहे. पाकिस्तानी लढाऊ विमान भारतीय हद्दीत घुसण्याचा प्रयत्न करीत होते, जे भारताने पाडले आहे. सध्या जम्मूमध्ये वीजपुरवठा पूर्ववत झाला आहे. त्याच वेळी राजस्थान, पंजाब तसेच जम्मू आणि काश्मीरमधील अनेक भागांत वीजपुरवठा खंडित झाला. भारताच्या पाकिस्तानविरुद्धच्या प्रत्युत्तर कारवाईदरम्यान, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह सीडीएस आणि तिन्ही सैन्यांच्या प्रमुखांशी सतत संपर्कात आहेत. दरम्यान, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली.



### कंदाहार विमान अपहरणाचा मास्टरमाइंड रौफ असगरचा खात्मा

जैशचा म्होरक्या मसूद अझहरचा दहशतवादी भाऊ रौफ असगरचा खात्मा झाल्याची माहिती समोर आली आहे. मृत्यूमध्ये भारतीय वायुदलाच्या हल्ल्यात अजगर गंभीररीत्या जखमी झाला होता. दरम्यान, १९९९ सालच्या कंदाहार विमान अपहरणात रौफ असगरचा प्रामुख्याने सहभाग होता. ऑपरेशन सिंदूरच्या सर्जिकल स्ट्राइक हल्ल्यात तो गंभीररीत्या जखमी झाला होता. एकीकडे मौलाना मसूद अझर याच्या कुटुंबातील १४ जणांचा मृत्यू झाल्याने जैश ही दहशतवादी संघटना पूर्णतः बिथरली होती. अशातच जैशचा म्होरक्या मसूद अझहरचा दहशतवादी भाऊ रौफ अजगरचा खात्मा झाल्याने दहशतवाद्यांना आणि दहशतवाद पोसणाऱ्यांना एक फार मोठा धक्का बसला आहे. मुरिदकेमध्ये भारतीय वायुदलाच्या हल्ल्यात तो काल जखमी झाल्याची माहिती समोर आली होती. गेल्या काही दिवसांपासून तो आजारी असल्याने त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. दरम्यान, भारतीय वायुदलाने एअर स्ट्राइक करत दहशतवाद्यांच्या नऊ तळांवर सटिक वार करत शंभरहून अधिक दहशतवादी ठार केल्याची माहिती समोर आली आहे. त्यातच आता जैशचा म्होरक्या मसूद अझहरचा दहशतवादी भाऊ आणि कंदाहार विमान अपहरण प्रकरणातील मास्टरमाइंड रौफ अजगरचा खात्मा झाल्याने भारतीय सैन्यदलाला मोठे यश मिळाले आहे.

## मुंबईवर हल्ला होण्याची शक्यता

### पोलिसांच्या सर्व सुट्ट्या रद्द

**मुंबई :**

भारत-पाकिस्तान तणाव वाढल्याने मुंबईत हायअलर्ट घोषित करण्यात आला आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानने केलेल्या भ्याड हल्ल्याने देशातील महत्त्वाच्या ठिकाणांवर अलर्ट जारी करण्यात आला आहे. जम्मू, राजस्थान, पंजाब या भागांतील काही भागात पाकिस्तानने हल्ले केले आहेत. या ठिकाणी ब्लॅकआऊट देखील करण्यात आले आहेत. पाकिस्तानच्या हल्ल्यांना भारताकडून प्रत्त्युत्तर देण्यात आले आहे. भारताने लाहोर, कराची आणि इस्लामाबाद येथे ड्रोन हल्ले केले आहेत. याचदरम्यान, मुंबईवरही हल्ला होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मुंबई पोलिसांच्या सर्व सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. धार्मिक आणि पर्यटन स्थळांवर हायअलर्ट आहे. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या ठिकाणी सुरक्षा यंत्रणा सक्रिय झाल्या आहेत.

## पाकिस्तानचे १०० पेक्षा जास्त दहशतवादी ठार

### सर्वपक्षीय बैठकीत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांची माहिती

**नवी दिल्ली :**

भारतीय वायुदलाने मंगळवारी (दि. ७) मध्यरात्रीच्या सुमारास पाकव्याप्त काश्मीरमध्ये केलेल्या एअर स्ट्राइकमध्ये किमान १०० दहशतवाद्यांचा खात्मा केल्याची माहिती दिल्लीत गुरुवारी (दि. ८) संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत देण्यात आली. या बैठकीला अमित शाह यांच्यासह प्रमुख नेतेही उपस्थित होते. हा आकडा जास्तदेखील असू शकतो, असे सर्वपक्षीय बैठकीत



सरकारतर्फे सांगण्यात आले.

पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारतीय वायुदलाच्या विमानांनी सीमारेषेवरून पाकिस्तानच्या दिशेने तब्बल २४ क्षेपणास्त्रे डागली होती. पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांचे नऊ तळ बेचिराख झाले होते. यामध्ये जैश-ए-मोहम्मदच्या बहावलपूर येथील मुख्यालयाचाही समावेश होता. भारतीय वायुदलाने अवघ्या २५ मिनिटांत क्षेपणास्त्रांचा मारा करून ९ ठिकाणं उद्ध्वस्त केली होती. या हल्ल्यात कुख्यात दहशतवादी मसूद अझहर याच्या आई, बहिणीसह १४ कुटुंबीयांचा मृत्यू झाला होता. मात्र, मृत्युमुखी पडलेल्या एकूण दहशतवाद्यांचा नेमका आकडा समोर आला नव्हता. पाकिस्तानने आपली लाज जाईल या भीतीने एअर स्ट्राइकमधील मृतांची आकडेवारी समोर आणली नव्हती. मात्र, आता केंद्र सरकारने ऑपरेशन सिंदूरमध्ये किमान १०० दहशतवादी ठार झाले आहेत, असे सांगितले आहे. भारतीय सुरक्षादलांच्यादृष्टीने हे मोठे यश मानले जात आहे.

### भारताचे १२ ड्रोन पाडल्याचा पाकचा दावा

भारताने बुधवारी रात्री पाकिस्तानच्या प्रमुख शहरांवर हल्ला करण्यासाठी ड्रोन पाठवले होते. मात्र, पाकिस्तानी लष्कर हायअलर्टवर असल्याने यापैकी १२ ड्रोन पाडण्यात आल्याचा दावा पाकिस्तानी सैन्याच्या अधिकाऱ्यांकडून केला जात आहे. लाहोरमध्येही तीन स्फोट झाल्याची माहिती समोर आली होती. यानंतर पाकिस्तानमध्ये हालचालींना वेग आला आहे.

संक्षिप्त ▸▸



## पिंपळस रामाचे शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**निफाड :** पिंपळस गावचे भूमिपुत्र कै. भगवंतराव लक्ष्मणराव पाटील व कै. सौ. सुशीलाबाई भगवंतराव पाटील या दांपत्याच्या स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव सुभाष भगवंतराव पाटील व विजय भगवंतराव पाटील यांच्यातर्फे गेल्या पाच वर्षांपासून शाळेतील सातवीच्या विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात येतात. यावर्षी पाटील बंधूंनी इयत्ता सातवीचे प्रथम आलेले तीन मुले व प्रथम आलेल्या तीन मुली यांना अनुक्रमे प्रथम क्रमांक १५०० रु., द्वितीय क्रमांक १००० व तृतीय क्रमांक ७५० रुपये बक्षिसाचे चेक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करून संबंधित विद्यार्थ्यांना चेक सुपूर्द करण्यात आला. या वर्षाच्या सातवीच्या वार्षिक परीक्षेत प्रथम क्रमांक मिळवलेले तीन विद्यार्थी १) साई आप्पा त्रिभुवन, २) प्रेम किशोर बागूल, ३) आर्यन विनायक गांगुर्डे तसेच शाळेतील सातवीच्या प्रथम तीन आलेल्या विद्यार्थिनी १) तनुजा श्रावण महाजन, २) आराध्या अशोक सोळसे, ३) अश्विनी प्रकाश पवार यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पाटील बंधूंचे ग्रामपालिका पिंपळस शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य तसेच शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांतर्फे आभार मानण्यात आले.

## लासलगावला हॅप्पीनेस प्रोग्राम

**लासलगाव :** आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक श्री श्री रविशंकर यांच्या जन्मदिवसानिमित्त लासलगाव येथे आर्ट ऑफ लिव्हिंग परिवारातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. १२ मेस येथील परमपूज्य भगरीबाबा मंदिरात सकाळी ९ ते दुपारी १ यावेळेत जनकल्याण रक्तपेढी, नाशिक व लासलगाव आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर होणार आहे. मंगळवारी (दि. १३) सकाळी नऊला गुरुपूजा होईल. तसेच श्री श्री रविशंकर यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून हॅपिनेस प्रोग्राम अर्थात आनंद अनुभूती शिबिर १३ मेपासून होणार आहे. शिबिरात योगासने, प्राणायाम, ध्यान, ज्ञान व जगप्रसिद्ध सुदर्शन क्रिया याबाबत माहिती प्रात्यक्षिकांद्वारे शिकविण्यात येणार आहे. शिबिरात वरिष्ठ प्रशिक्षक किशोर पाटील, बाळासाहेब कदम व मनीषा घोडके मार्गदर्शन करतील. शारीरिक आणि मानसिकरीत्या सक्षम असण्यासाठी आणि प्रत्येक दिवसाचा आनंद घेण्यासाठी १८ वर्षे वयाच्या पुढील युवक-युवती, स्त्री-पुरुषांनी मंगळवारी सकाळी सहा ते नऊ रोज तीन तास, असे सहा दिवस परमपूज्य भगरीबाबा मंदिरात हे आनंद अनुभूती शिबिर होईल. रक्तदान शिबिरात (दि.१२) सहभागी व्हावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## 'विद्यार्थ्यांनी मोबाइल विश्वातून बाहेर पडावे'

**पिंपळगाव बसवंत :** शालेय विद्यार्थी, तरुणांनी मोबाइलच्या विश्वातून बाहेर पडावे. अभ्यास व खेळात आपले लक्ष केंद्रित करावे, असा सल्ला खा. भास्करराव भगरे यांनी दिला आहे. येथील जीनिअस चेस अकॅडमीतर्फे आशीर्वाद मंगल कार्यालयात बुद्धिबळ प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले आहे. खासदार भगरे यांनी शिबिरास भेट दिली. त्यावेळी प्रशिक्षणार्थी खेळाडूंना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. बुद्धिबळ प्रशिक्षक विश्वजित थेटे, सरस्वती थेटे, स्वाती जाधव आदी यावेळी उपस्थित होते. खासदार भगरे म्हणाले की, सध्याची तरुण पिढी, शालेय विद्यार्थी मोबाइल, रीलच्या कचाट्यात सापडले आहे. मोबाइलचे नको तितके व्यसन तरुणवर्गात दिसते आहे. भविष्याच्या दृष्टीने मोबाइलचे व्यसन घातक असून, तरुणांनी मोबाइलपासून दूर व्हावे व अभ्यास, खेळात लक्ष गुंतवावे. बुद्धिबळ हा खेळ माणसाची बुद्धिमत्ता, एकाग्रता वाढवतो. समस्या सोडविण्याचे कौशल्य आणि दूरदृष्टी विकसित होते. बुद्धिबळासारख्या दर्जेदार खेळाच्या प्रशिक्षण शिबिराचा लाभ विद्यार्थी, तरुणांनी घ्यावा, असे आवाहन खासदार भगरे यांनी केले. यावेळी थेटे परिवारातर्फे किरण थेटे, हेमंत थेटे यांनी खासदार भगरे यांचा छोटेखानी सत्कार केला.

## मोहाडी केआरटी महाविद्यालयाचे यश

**पिंपळगाव बसवंत :** केआरटी हायस्कूल मोहाडी कला शाखा इयत्ता बारावी प्रथम पाच क्रमांकांचे मानकरी असे- साक्षी सुनील गवारे ७४ टक्के, दिया रॉबिन हिवाळे ६६.८३ टक्के, अस्मिता शांताराम डंबाळे ६३.३३ टक्के, पायल राहुल शार्दुल ६१.८३ टक्के, वैष्णवी एकनाथ सांबरे ६१ टक्के. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शालेय परिवार, विद्यालयाच्या प्राचार्या शरयू भामरे, मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे दिंडोरी तालुका संचालक प्रवीण जाधव, उच्च माध्यमिक शालेय समितीचे पदाधिकारी, संचालकांनी अभिनंदन करण्यात आले.

## एरंडगाव शिवारात युवकाचा मृत्यू

**येवला :** तालुक्यातील एरंडगाव शिवारातील विहिरीत पडून एका



युवकाचा दुर्दैवी अंत झाला. सतीश रामकृष्ण जाधव (वय २२) असे मयत झालेल्या युवकाचे नाव आहे. आपल्या मित्राचा कार्यक्रम आवरून घरी परतत असताना दुचाकी विहिरीच्या कठड्याला धडकून विहिरीत युवक सतीश जाधव पडला असता त्यात त्याचा मृत्यू झाला. दरम्यान, अचानक झालेल्या घटनेमुळे हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. याच विहिरीत पडून मृत्युमुखी पडल्याच्या दोन ते तीन घटना आतापर्यंत झाल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी बोलताना सांगितले.

# केवळ आश्वासन, प्रत्यक्ष पोलिस भरती कधी?

## निफाड तालुक्यातील हजारो युवक-युवती प्रतीक्षेत...

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

राज्य सरकारमधील मुख्यमंत्री अन् मंत्री वारंवार पोलिस भरतीची आश्वासने देत आहेत. त्यामुळे अनेक युवक-युवती गेल्या अनेक महिन्यांपासून भरतीची तयारी करत आहेत. मात्र, राज्य शासनाकडून केवळ आश्वासने मिळत आहेत. प्रत्यक्ष भरतीप्रक्रियेला अद्यापही सुरुवात झालेली नाही. त्यामुळे रोज पहाटे उठून, घाम गाळून तयारी करणारे युवक भरतीच्या प्रतीक्षेत आहेत. आश्वासने वारंवार मिळताहेत. मात्र, प्रत्यक्ष पोलिस भरती कधी? असा सवाल निफाड तालुक्यातील युवकांमधून उपस्थित केला जात आहे.



राज्यातील पोलिस दलात डिसेंबर २०२४ मध्ये समोर आलेल्या आकडेवारीनुसार ३३ हजार पदे रिक्त आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी तत्कालीन गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत २२ जुलै २०२४ ला लवकरच नऊ हजार पदांची पोलिस भरती राबविण्यात येईल, असे आश्वासन दिले होते, तर विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान पंतप्रधान मोदी यांनी त्यांच्या धुळे येथील सभेदरम्यान सत्तेत आल्यास २५ हजार महिला पोलिसांची भरती करणार असल्याची घोषणा केली. हीच घोषणा तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी १० कलमी घोषणेत नोव्हेंबर २०२४ रोजी केली. या आश्वासनांवर विश्वास ठेवून पोलिस भरतीच्या उमेदवारांनी तयारीला सुरुवात केली. मात्र, अद्याप भरतीची प्रक्रिया सुरू नसल्याचे नाराजी असल्याचे भरतीची तयारी करणाऱ्या युवकांनी सांगितले. पोलिस खात्यातील रिक्त पदे भरण्यास मान्यता आहे.

> **भरतीप्रक्रियेबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्याने तयारी करणाऱ्या युवकांत संभ्रम आहे. सन २०२२-२३ मधील भरतीप्रक्रिया २०२३-२४ मध्ये राबविण्यात आली होती. बेरोजगारीचे भीषण वास्तव समोर असताना राज्य सरकारमधील मंत्री फक्त आश्वासने देत आहेत. त्यामुळे तरुणांच्या भविष्याचा विचार करून सरकारने पोलिस भरतीची प्रक्रिया लवकर सुरू करावी. भरतीसाठी पूर्ण वेळ देऊन अनेक युवक-युवती तयारी करत आहेत. कोणतेही काम नसल्याने आणि भरतीची प्रक्रिया सुरू नसल्याने युवकांत नैराश्य येत आहे. त्यामुळे त्यांची पावले चुकीच्या दिशेने पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.**
>
> **-राजेंद्र बोरगुडे,** संचालक, लासलगाव बाजार समिती

> **अकॅडमीमध्ये गेली दीड ते दोन वर्षांपासून युवक-युवती पोलिस भरतीच्या तयारीसाठी आले आहेत. राज्य सरकारने आश्वासन देऊनही पोलिस भरतीची जाहिरात निघालेली नाही. त्यामुळे युवकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे, तरी राज्य सरकारने लवकरात लवकर जाहिरात प्रसिद्ध करून प्रत्यक्ष पोलिस भरतीची प्रक्रिया सुरू करावी.**
>
> **- नानासाहेब गाजरे,** संचालक, कमांडो करिअर अकॅडमी, नैताळे, ता. निफाड



## भाजप देवळा तालुकाध्यक्षपदी किशोर आहेर बिनविरोध

**देवळा : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या देवळा तालुकाध्यक्षपदी येथील युवा कार्यकर्ते व भाजप युवा मोर्चाचे माजी अध्यक्ष किशोर आहेर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष व निवडणूक निर्णय अधिकारी सुधाकर पगार यांच्या अध्यक्षतेखाली व भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष विकास देशमुख, कळवण तालुकाध्यक्ष दीपक खैरनार, कळवण शहराध्यक्ष निंबा पगार उपस्थित होते. आमदार डॉ. राहुल आहेर यांच्या संपर्क कार्यालयात झालेल्या बैठकीत निवडणूक निर्णय अधिकारी सुधाकर पगार यांनी पक्षाच्या वरिष्ठ कार्यालयाकडून आलेल्या बंद लिफाफ्यातून तालुकाध्यक्षपदासाठी किशोर आहेर यांचे नाव आल्याने त्यांची अध्यक्षपदी निवड झाल्याची घोषणा केली. यावेळी आहेर यांच्या समर्थकांनी आनंदोत्सव साजरा केला.

# पदोन्नतीत गडबड की जाणूनबुजून अन्याय?

## श्री महावीर विद्यालयाच्या उपशिक्षकाचा आत्मदहनाचा इशारा

**लासलगाव : वार्ताहर**

येथील श्री महावीर विद्यालयातील मुख्याध्यापकपदासाठी झालेल्या वादग्रस्त नियुक्तीमुळे शैक्षणिक वर्तुळात खळबळ उडाली आहे. या नियुक्तीत वरिष्ठतेचा अवमान झाल्याचा आरोप करत उपशिक्षक योगेश बन्सीलाल जैन यांनी थेट आत्मदहनाचा इशारा दिला आहे. त्यांच्या या लेखी इशाऱ्यामुळे संस्थेतील प्रशासन आणि शिक्षण विभागावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

योगेश जैन यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, १९७६ च्या महाराष्ट्र शैक्षणिक संस्था कायद्यानुसार कलम २(३) अन्वये संस्थेतील सर्वांत वरिष्ठ उपशिक्षक म्हणून मला मुख्याध्यापकपदाचा हक्क आहे. मात्र, पदोन्नती देताना या कायद्याची पायमल्ली करत इतर व्यक्तीस नेमणूक देण्यात आली.''त्यांनी या अन्यायाविरोधात दिनांक २२ सप्टेंबर २०२१ रोजी शिक्षणाधिकारी कार्यालयात लेखी तक्रार दाखल केली होती. त्यानंतर तीन वर्षे उलटूनही कोणतीही ठोस चौकशी अथवा कारवाई झाली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. संस्थेने पदोन्नती प्रक्रियेत पारदर्शकता ठेवलेली नाही. काही महिला शिक्षकांवर दबाव टाकून चुकीच्या जबाबदाऱ्या स्वीकारायला भाग पाडले गेले असून, मला बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

माझा आत्मसन्मान व न्यायासाठी मी आता आत्मदहनाशिवाय पर्याय उरलेला नाही, असे म्हणत त्यांनी आपल्या निवेदनात स्पष्टपणे नमूद केले आहे की, ''जर १५ मे २०२५ पर्यंत या प्रकरणात योग्य निर्णय झाला नाही तर मी विद्यालयासमोर आत्मदहन करणार असून, यासाठी संपूर्ण जबाबदारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर राहील.''

> **या शाळेतील वाढत्या अपारदर्शकता, प्रशासनिक अन्याय आणि मानसिक त्रासाला कंटाळून मी आत्मदहन करणार आहे. संस्थेतील नियुक्ती प्रक्रिया जर पारदर्शक नसेल, वरिष्ठतेचे निकष धुडकावले जात असतील आणि शिक्षकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष होत असेल तर त्या संस्थेच्या प्रशासकीय व्यवस्थेची सखोल चौकशी होणं गरजेचं आहे.**
>
> **- योगेश जैन,** उपशिक्षक, श्री महावीर जैन विद्यालय, लासलगाव

> **योगेश जैन यांच्यावर याआधीही शिस्तभंगाच्या नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. त्यांच्यावर महिला मुख्याध्यापिकेसोबत गैरवर्तन, अर्वाच्च भाषा वापरणे, वैयक्तिक टीका आणि आदी गंभीर आरोपांची नोंद आहे. आत्मदहनाची धमकी ही कारवाईपासून वाचण्याचा प्रयत्न आहे. आत्मदहनाची धमकी देणाऱ्या या उपशिक्षकावर आधीपासूनच शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे.**
>
> **- शांतीलाल जैन,** सेक्रेटरी, श्री महावीर जैन विद्यालय, लासलगाव

# पिंपळगाव येथे २२ ला बैलगाडा शर्यत

**पिंपळगाव बसवंत : प्रतिनिधी**

गणेश बनकर मित्रपरिवार निफाड तालुका व स्व. अशोकराव (अण्णा) बनकर पुरस्कृत नॅशनल हायवे मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने उत्तर महाराष्ट्र सर्वांत मोठी युवा हिंद केसरी भव्य बैलगाडा शर्यतीचा थरार २२ मे रोजी शहरातील जोपूळ रोडवरील कुरण क्षेत्राच्या पटांगणावर रंगणार आहे. या मैदानाची पाहणी व विधिवत पूजन आमदार दिलीप बनकर यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.



जोपूळ रोडवरील कुरण क्षेत्राच्या या पटांगणाचे काम जोरदार सुरू आहे. युवा हिंदकेसरी बैलगाडा शर्यतीकरिता महाराष्ट्रातील पुणे, छत्रपती संभाजीनगर, नांदेडसह अन्य जिल्ह्यांतील प्रमुख आकर्षण ठरणारे बैलगाडे व मालक या स्पर्धेत सहभाग नोंदविणार आहेत. या भव्य बैलगाडा शर्यतीचा थरार अनुभवण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार बनकर व गणेश बनकर यांच्यासह मित्रपरिवाराने केले आहे.

# बाहेरगावी जाणार असाल तर खबरदारी घ्या!

## पोलिस उपअधीक्षक डॉ. पालवे यांचे आवाहन

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

शाळा व महाविद्यालयांना उन्हाळ्याच्या सुट्या लागल्याने अनेक नागरिक पर्यटन, देवदर्शन किंवा लग्नसोहळ्याच्या निमित्ताने नातेवाइकांकडे बाहेरगावी जातात. ही संधी साधून चोरटे सक्रिय होतात. बंद घरे हेरून घरफोडी व चोरी करतात. त्यामुळे नागरिकांनी बाहेरगावी जाताना आपल्याकडील मौल्यवान दागिने, रोख रकमेच्या अनुषंगाने दक्षता घ्यावी, उपाययोजना कराव्यात, असे आवाहन निफाडचे पोलिस उपअधीक्षक डॉ. नीलेश पालवे यांनी केले आहे.

बाहेरगावी जाताना व परत येईपर्यंत सोशल मीडियावर सुट्यांचे नियोजन किंवा छायाचित्र पोस्ट करू नये. सार्वजनिक ठिकाणी प्रवासाबदल बोलताना सावधगिरी बाळगावी. बाहेरगावी जाताना आपल्या शेजाऱ्यांना माहिती देऊन घरावर लक्ष ठेवण्यास सांगावे. तळमजल्यावरील आणि सहज पोहोचता येणाऱ्या खिडक्यांना सुरक्षा ग्रील, जाळ्या किंवा चावीने उघडता येणारे कुलूप लावावे. खिडक्या आणि दाराजवळची झुडपे व झाडे छाटून टाकावीत जेणेकरून चोरट्यांना लपायला जागा मिळणार नाही. मौल्यवान दागिने व रोख रक्कम लॉकरमध्ये ठेवावी. किमती वस्तू खिडक्यांपासून दूर ठेवणे आवश्यक आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. व्हिडिओ डोअरबेल बसवावी. सोसायटीसाठी सर्वसाधारण पहारेकरी नेमावा. सोसायटीत प्रवेश करणाऱ्यांकरिता नोंदपुस्तिका ठेवावी, असे डॉ. पालवे यांनी सांगितले.

# पारख पतसंस्थेच्या ठेवीदारांचा तहसीलवर मोर्चा

**येवला : प्रतिनिधी**

येथील कै. सुभाषचंद्रजी पारख नागरी सहकारी पतसंस्थेच्या ठेवीदारांनी आपल्या ठेवी परत मिळाव्यात यासाठी तहसील कार्यालयावर मोर्चा काढला.

कर्जदारांच्या तारण मालमत्तेचा लिलाव करून ठेवीदारांच्या ठेवी परत द्या. कार्यक्षम अवसायक नेमावा, विशेष वसुली अधिकारी नेमून कामास गती द्यावी, या महत्त्वाच्या मागण्यांचे निवेदन प्रांताधिकारी बाबासाहेब गाढवे, तहसीलदार आबा महाजन, सहाय्यक निबंधक परदेशी यांना देण्यात आले. ठेवीदारांची ठेव परत मिळावी यासाठी नुकताच राधाकृष्ण लॉन्स येथे ठेवीदार आणि सभासदांचा मेळावा होऊन त्यात धोरणात्मक भूमिका घेऊन पहिला कृती कार्यक्रम,





मोर्चा आणि निवेदनाद्वारे प्रशासनाला आपली मागणी द्यावी,

या हेतूने सर्व ठेवीदार तहसीलदार कार्यालयाच्या आवारात एकत्रित झाले. यावेळी पंकज पारख यांनी पतसंस्थेची सद्यस्थितीत ठेवीदारांचे ६५ कोटी देणे आणि कर्जदारांकडून १३० कोटी घेणे अशी स्थिती पतसंस्थेत असल्याने कर्जदारांची वसुली हा महत्त्वपूर्ण टप्पा कायदेशीररीत्या प्रशासनाने हाताळावा व ठेवीदारांचे पैसे परत करावेत आणि पतसंस्था पुन्हा संचालकांच्या ताब्यात द्यावी, अशी मागणी केली. मोठ्या ठेवीदारांना वेसण घालून त्यांच्या तारण मालमत्तेवर टाच आणून कायदेशीर जप्ती आणून ठेवीदारांचे पैसे द्यावेत. यासाठी कार्यक्षम अधिकारी नेमावेत, अशी मागणी केली. संबंधितांवर कारवाई झाली नाही तर उपोषणाचा इशारा पंकज पारख यांनी दिला आहे. यावेळी अर्जुन कोकाटे, धनंजय कुलकर्णी, बाळासाहेब बाळासाहेब गायकवाड, भाऊसाहेब भड, प्रा. गुमानसिंग परदेशी यांच्यासह सुमारे ३०० ठेवीदार यावेळी उपस्थित होते.

# लासलगावला मॉन्सूनपूर्व पावसाची जोरदार हजेरी


**लासलगाव : वार्ताहर**

मंगळवारी दुपारी चारच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह वादळी वारा व गारांच्या मॉन्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली. शहर व परिसरातील गावांना चांगलेच झोडपून काढले. सुमारे दीड तासभर झालेल्या पावसामुळे शहरातील वीजपुरवठादेखील खंडित झाला. शेतात काढून ठेवलेला कांदा भिजल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

गेल्या काही दिवसांपासून लासलगाव शहराचा तापमानाचा पारा ४० ते ४२ अंशांपर्यंत गेला होता. त्यामुळे उष्णतेने लासलगावकर भलतेच हैराण झाले होते. मात्र, मंगळवारी मॉन्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे उष्णतेने व्याकूळ झालेल्या लासलगावकरांना मोठा दिलासा मिळाला. दुपारी ४ च्या सुमारास वादळी वारा, विजांचा कडकडाटासह गारांसह पावसाला सुरुवात झाली. त्यानंतर पावसाचा जोर वाढला आणि जोरदार पावसाने दीड तास झोडपून काढले. बाजारपेठेत आलेल्या नागरिकांची तारांबळ उडाली. शेतात उघड्यावर नुकताच काढून ठेवलेला कांदा या पावसाने भिजल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले.

# विद्या इंटरनॅशनलचा बारावीचा १०० टक्के निकाल





**येवला : प्रतिनिधी**

बारावी बोर्डाच्या परीक्षेत येवला शहरातील विद्या इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले. दरवर्षीप्रमाणे यंदाही निकाल १०० टक्के लागला.

प्रथम पाच विद्यार्थ्यांमध्ये वैष्णवी खानापुरे व गौतमी पाटील या दोघींनी ८६.१७ टक्के गुण मिळवून संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला तर लक्ष गुजराथी ८४.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय आला. नेत्रा बोरसे ८४.१७ टक्के गुण मिळवून तृतीय आली. तर अवधूत वाघ व सुहानी समदडिया यांना अनुक्रमे ८३.३३ टक्के व ८१.५० टक्के गुण मिळाले. मागील सलग ६ वर्षांपासून विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला. द्वितीय क्रमांक आलेला लक्ष गुजराथी याने राष्ट्रीय शालेय टेनिस स्पर्धेचे विजेतेपद पटकवूनदेखील विद्यालयात द्वितीय येण्याचा पराक्रम केला. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेश पटेल, सेक्रेटरी डॉ. संगीता पटेल, मुख्याध्यापिका शुभांगी शिंदे यांनी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले.

# चांदवडच्या दुर्गम भागात पाणी अन् वीज समस्या

## खासदारांचा कठोर पवित्रा; मूलभूत प्रश्न सोडविण्याचे प्रशासनास आदेश

**चांदवड : वार्ताहर**

तालुक्यातील आदिवासी दुर्गम भागातील राजदेरवाडी, इंद्रायणीवाडी आदी वस्त्यांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून वीज आणि पाण्याची मूलभूत सोय नसल्याने रहिवासी जीवन कष्टमय व्यथित करत आहे. या गंभीर समस्येची दखल घेत दिंडोरीचे खासदार भास्कर भगरे यांनी राजदेरवाडी ग्रामपंचायत सभागृहात तातडीची आढावा बैठक घेतली. बैठकीत त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांसह स्थानिक लोकप्रतिनिधींना धारेवर धरले आणि दोन्ही गावांसाठी तातडीने वीज व पाणीपुरवठा सुनिश्चित करण्याचे कठोर आदेश दिले.

बैठकीत खा. भगरे यांनी हात्याड धरणाच्या कामाला झालेल्या दिरंगाईबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, ''हे धरण माझ्या पूर्वीच्या प्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे रखडले. सध्या सत्तेत नसतानाही संबंधित नागरिकांच्या अडचणी दूर करण्यासाठी कटिबद्ध आहे.'' राजदेरवाडी आणि इंद्रायणीवाडीतील नागरिकांनी आपल्या व्यथा मांडल्या. पिण्याच्या पाण्याची आणि विजेची सोय नसल्यामुळे मुलांच्या शिक्षणावर आणि दैनंदिन जीवनावर कसा परिणाम होत आहे. केदाबाई अनिल गोधडे या आदिवासी महिलेने सांगितले की, लाईट आणि पाणी नसल्याने आमच्या मुलांनी शिक्षण कसे घ्यावे?, असा प्रश्न उपस्थित केला. स्थानिक नागरिक शहू शिंदे आणि दादाजी हरी जाधव यांनी, राजदेरवाडी हे नाशिक जिल्ह्यातील सर्वाधिक उंचीवर असूनही येथे पडणाऱ्या मोठ्या पावसाच्या पाण्याचा योग्य वापर केला जात नाही. पाणी वाहून जाते, त्यामुळे छोटे बंधारे बांधल्यास पाण्याची समस्या सुटू शकते, असे सांगितले. ग्रामस्थ जगन यशवंत यांनी या भागातील शासकीय सुविधांच्या अभावाकडे लक्ष वेधले. २००३-०४ पासून वनजमिनीवर राहणाऱ्या अनुसूचित जमाती आणि पारंपरिक वनवासी कुटुंबांना आजही शाळा, दवाखाना, अंगणवाडी आणि स्वस्त धान्य दुकानासारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. या त्रुटी तातडीने दूर करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

### विकासाची पहाट होण्याची शक्यता

खा. भगरे यांनी प्रशासनाला तत्काळ कार्यवाही करण्याचे स्पष्ट निर्देश दिल्याने या दुर्गम भागातील नागरिकांच्या अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आता विकासाची आणि सोयीसुविधांची पहाट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रशासनाकडून या आदेशांची अंमलबजावणी किती जलद गतीने होते, हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे.

गांवकरी




# जिल्हाभरात ४४ हजार २१६ साड्यांचे वाटप

## अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना मिळणार लाभ

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील लाडक्या बहिणींना डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त साडी वाटप करण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, उशिराने साड्या पोहोचल्याने १४ एप्रिलनंतर त्यांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबातील जिल्ह्यात ४४ हजार २१६ साड्यांचे वाटप पूर्ण झाले आहे.

जिल्ह्यात अंत्योदय योजनेतील सुमारे एक लाख ७६ हजार ९२४ पात्र महिला शिधापत्रिकाधारकांना साड्या वाटप करण्याचे नियोजन शासनाकडून करण्यात आले आहे. त्यानुसार प्रतिकुटुंब एक साडी देण्यात येणार आहे. लाडक्या बहिणींना सणानिमित्त साडी-चोळी वाटप करण्याची पद्धत महायुती सरकारकडून सुरू करण्यात आली आहे. रेशन दुकानांमार्फत प्रत्येक लाभार्थी कुटुंबास साड्यांचे वितरण करण्यात येत आहे. धाविअ मालेगाव व कळवण, येवला, सिन्नर तालुक्यात अद्याप साड्यांचे वितरण नाही. अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबीयांना साड्या वाटपाला पंधरा दिवसांपासून सुरुवात झाली आहे. अद्याप, धाविअ मालेगाव, कळवण व येवला, सिन्नर या ठिकाणी एकाही साडीचे वितरण झालेले नाही. तांत्रिक अडचणींमुळे वितरण होऊ शकले नसल्याची माहिती आहे.



| अंत्योदय लाभार्थी | | |
|---|---|---|
| तालुका | लाभार्थी | वितरण |
| बागलाण | १३,२४८ | ९,८६९ |
| चांदवड | ६,४१६ | २,६९० |
| देवळा | ५,०६० | ४९६ |
| दिंडोरी | १३,१२७ | १०,६३५ |
| धाविअ नाशिक | १०,६०६ | ८,१५९ |
| धाविअ मालेगाव | १६,५९७ | ००० |
| इगतपुरी | १०,७७८ | ००३ |
| कळवण | ८,६१७ | ००० |
| मालेगाव | ११,२७६ | १,०५१ |
| नांदगाव | ८,७४८ | २,२१० |
| नाशिक | ८,५८० | ०००५ |
| निफाड | १०,७८६ | १,५९३ |
| पेठ | १०,७८२ | ००३१ |
| सिन्नर | ८,२२८ | ००० |
| सुरगाणा | १५,२८८ | ७,४७१ |
| त्र्यंबकेश्वर | ८,८१८ | ००३ |
| येवला | १०,००९ | ००० |
| एकूण | १,७६,९२४ | ४४,२१६ |

# सॅप प्रणालीमध्ये बिघाडामुळे इंधन पुरवठा विस्कळीत

## सुरळीत करण्यासाठी ४८ तास लागणार

**नाशिक : प्रतिनिधी**

हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (एचपीसीएल) या सार्वजनिक क्षेत्रातील तेल विक्री कंपनीच्या सॅप प्रणालीमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे मागील ३६ तासांपासून देशभरातील इंधन पुरवठा विस्कळीत झाला आहे. एचपीसीएलच्या सर्व डिपोंमधून पेट्रोलपंपांपर्यंतचा पुरवठा बंद झाल्याने अनेक पंपांवर इंधन मिळणे बंद झाले आहे. नाशिक जिल्ह्यात एचपीसीएलचे २०० हून अधिक पेट्रोलपंप आहेत. या पेट्रोलपंपावरील इंधनपुरवठा हा विस्कळीत झाला असल्याचे असोसिएशनच्या वतीने सांगण्यात आले.

एचपीसीएल कंपनीचे तांत्रिक तज्ज्ञ सदर सॉफ्टवेअर प्रणाली पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करत असून, मॅन्युअल मोडने पुरवठा सुरू करण्याचाही प्रयत्न केला जात आहे. मात्र, प्रणाली एकमेकांशी जोडलेली असल्यामुळे अपेक्षित परिणाम मिळत नाहीत. त्यामुळे स्थिती पूर्णतः सुरळीत होण्यासाठी किमान आणखी ४८ तास लागू शकतात, अशी माहिती कंपनीकडून देण्यात आली आहे. दरम्यान, फेडरेशन ऑफ ऑल महाराष्ट्र पेट्रोल डीलर्स असोसिएशन अध्यक्ष अमित गुप्ता यांनी नागरिकांना घाबरून न जाण्याचे आवाहन केले आहे. ही केवळ तांत्रिक अडचण असून, पेट्रोल किंवा डिझेलचा साठा भरपूर आहे.

इतर कंपन्यांसारखे इंडियन ऑईल आणि भारत पेट्रोलियम यांचा पुरवठा सुरळीत सुरू आहे. त्यामुळे इंधन टंचाईचे कोणतेही कारण नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. फामपेडा ने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले असून, इंधन मिळवण्यासाठी इतर पंपांवर अनावश्यक गर्दी न करण्याचेही सूचित केले आहे. तांत्रिक बिघाड लवकरच दूर होईल आणि परिस्थिती लवकर पूर्ववत होईल, असा विश्वासही अध्यक्ष गुप्ता यांनी व्यक्त केला.

# चांदवड भाजपाकडून ऑपरेशन सिंदूर विजयोत्सव

**मंगरूळ : प्रतिनिधी**

चांदवड तालुका भाजपाकडून भारतीय सैन्य दलाचे शौर्य अभियान ऑपरेशन सिंदूरबद्दल विजयोत्सव साजरा करण्यासाठी असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाके वाजवून, तिरंगा ध्वज फडकवत, भारत माता की जयच्या घोषणा देत जल्लोष केला. पाकिस्तानने वारंवार परमाणु हल्ल्याच्या दिलेल्या पोकळ धमकीला न जुमानता भारतीय सैन्य दलाने पहलगाम हल्ल्याचा प्रतिशोध घेत मृत भारतीय नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करत भारतीय नागरिकांना न्याय मिळवून दिला.


महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**जाहिरात एजन्सी निवड**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित अर्थात महावितरणने वृत्तपत्रांना डीजीआयपीआर दराने जाहिराती देण्यासाठी वर्ष २०२५-२६ करिता जाहिरात एजन्सीची नियुक्ती करण्याचे ठरविले आहे. नाशिक परिमंडल येथे नियुक्त करण्यात येणाऱ्या या एजन्सीच्या मार्फत नाशिक परिमंडल आणि जळगाव परिमंडल अंतर्गत येणाऱ्या कार्यालयातील जाहिराती प्रकाशित करण्यात येतील. जाहिरात एजन्सी साठी पात्रता व अधिकचा तपशील महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळ www.mahadiscom.in व https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**मुख्य जनसंपर्क अधिकारी**, महावितरण, मुंबई



**निफाड नगरपंचायत, निफाड ता.निफाड, जि. नाशिक**
Email. :-npniphad@gmail.com स्थापना- १० मार्च २०१५
जावक क्र. नि.न.पं/कार्या-६८४ /२०२५ दि. ८/५/२०२५

**जाहीर निविदा सूचना**

या जाहीर निविदा सूचनेद्वारे कळविण्यात येते की, निफाड नगर पंचायतीस पाणीटंचाई निवारण करणेकरीता पाणीपुरवठा विभागाकरिता स्टार्टर, मोटार, केबल व पाईन लाईन व इतर अनुषंगिक साहित्य खरेदी करावयाचे आहेत. सदर कामाचे निविदा फॉर्म निफाड नगरपंचायत कार्यालयात उपलब्ध असून, इच्छुक पुरवठादारांनी निविदा सुट्टीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत **दि.०९/०५/२०२५ पासून दि. १६/०५/२०२५ सायंकाळी ठिक ०५.०० वाजेपर्यंत** निफाड नगरपंचायत कार्यालयात पोहोच करावे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**निफाड नगरपंचायत, निफाड**


# तत्कालीन महानगरपालिका शिक्षणाधिकारी पाटलांचे निलंबन

## राज्य शासनाची कारवाई; चौकशी अहवालात दोषी

**नाशिक : प्रतिनिधी**

महापालिकेचे तत्कालीन शिक्षणाधिकारी बापूसाहेब पाटील यांची शिक्षक बदल्यांतील आर्थिक गैरव्यवहारासह इतर वादग्रस्त निर्णयाप्रकरणी शासनाने त्यांचे निलंबन केले आहे. महापालिकेतील अतिरिक्त आयुक्तांसह चौघा सदस्य चौकशी समितीकडून पाटील यांच्या कारनामाचा तपास करून सदर अहवाल राज्य शासनाला सादर करण्यात आला होता. दरम्यान, पाटील यांच्यावर कारवाई होत नसल्याने याप्रकरणी उलटसुलट चर्चा सुरू होती. शिक्षक आ. किशोर दराडे यांनी पाटील यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करत अनेक गंभीर आरोप केले होते.

महापालिकेत शिक्षणाधिकारी असताना पाटील यांनी महापालिकेच्या अंतर्गत शाळांमध्ये ३१ मार्च २०२३ अखेर २७ पदे रिक्त होत असताना ३७ पदे इतर स्थानिक स्वराज्य संस्थांमधून सेवावर्ग करून सामावून घेतली. मात्र, सदर रिक्त पदे पवित्र प्रणालीमध्ये नोंदविण्याची कार्यवाही न करता प्रशासनाची दिशाभूल केली. नगरविकासच्या शासन निर्णयानुसार विहित केलेल्या धोरणातील एकाच जिल्ह्यातील नागरी किंवा ग्रामीण स्वराज्य संस्थेमध्ये सेवा वर्ग करता येणार नाही, अशी तरतूद असतानाही पाटील यांनी अकरा शिक्षकांना नाशिक जिल्हा परिषदेतून महापालिकेच्या सेवेत वर्ग करण्यात आले. यामध्ये त्यांनी नियमबाह्यपणे काम केल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. काही दिवसांपूर्वी शिक्षक आ. किशोर दराडे यांनी महापालिकेत शिक्षक दरबार घेतला असता यावेळी पाटील यांच्यावर अनेक गंभीर आरोप करण्यात आले होते. कोणतेही काम पैसे दिल्याशिवाय होत नव्हते. तसेच काही शाळांतील शिक्षकांना जाणूनबुजून टार्गेट केले जात असल्याचे महिला शिक्षकांनी केले होते. आ. दराडे यांनी सर्वांत प्रथम विधिमंडळात लक्षवेधीद्वारे बापूसाहेब पाटील यांच्या कारभारावर अनेक गंभीर आरोप केले होते. दरम्यान यापूर्वी देखील तत्कालीन शिक्षणाधिकारी सुनीता धनगर यांना लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडत कारवाई केली होती. धनगर यांच्या घरी मोठे घबाडही सापडले होते. त्यानंतर बापूसाहेब पाटील यांनी वादग्रस्त निर्णय घेत आर्थिक गैरव्यवहार केल्याचे समोर आल्याने मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी त्यांच्याकडील पदभार काढून घेतला होता. मात्र, शासनाला चौकशी अहवाल देऊन महिना उलटूनही कार्यवाही होत नसल्याचे चित्र होते. मात्र अखेर गुरुवारी शासनाने पाटील प्रकरणाची गंभीर दखल घेऊन सदर प्रकरणात त्यांचे निलंबन केले आहे.

# वडनेरदुमाला येथे वालदेवी नदीवर नव्या पुलास मंजुरी

## आ. सरोज आहिरे यांच्या पाठपुराव्याला यश; साडेतेरा कोटींचा खर्च अपेक्षित

**नाशिक : प्रतिनिधी**

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक महापालिकेकडून विविध विकासकामांना गती देण्यात येत आहे. देवळाली विधानसभा मतदारसंघातील वडनेरदुमाला येथे वालदेवी नदीवर नव्या समांतर पुलाच्या उभारणीसाठी महापालिकेच्या महासभेत मंजुरी देण्यात आली. या कामासाठी सुमारे साडेतेरा कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, आमदार सरोज आहिरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.

महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या महासभेत पुलाच्या कामास मान्यता देण्यात आली. यासंदर्भात आमदार आहिरे यांनी मनपा आयुक्त खत्री तसेच विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्याशी चर्चा करून सिंहस्थाच्या अनुषंगाने नाशिकरोड परिसरातील महत्त्वाची कामे प्राधान्याने हाती घेण्याची मागणी केली होती. दरम्यान, आयुक्त खत्री यांच्यासमवेत देवळाली मतदारसंघातील वडनेर, विहितगाव, देवळालीगाव, पिंपळगाव खांब, दाढेगाव आदी भागात संयुक्त पाहणी दौरा करत नागरिकांच्या गरजा जाणून घेण्यात आल्या होत्या. पुलाच्या उभारणीस मान्यता मिळाल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



वालदेवी नदीवरील पूल उभारणीसाठी केलेल्या मागणीला महापालिका प्रशासनाने मान्यता दिली आहे. सिंहस्थ निधीतून मतदारसंघातील गरजेच्या विकासकामांना गती देण्यासाठी प्रयत्न सुरूच राहतील.
**-आ. सरोज आहिरे, आमदार, देवळाली विधानसभा मतदारसंघ**

# गुंगीचे औषध देऊन पाच जणांचा तरुणीवर अत्याचार

**शहापूर : प्रतिनिधी**

टिटवाळ्यात आपल्या नातेवाइकांकडे राहत असलेल्या एका २१ वर्षांच्या तरुणीला गुंगीचे औषध देऊन, तिला मद्य पाजण्यास देऊन तिला बेशुध्द करून तिच्यावर सामूहिक लैंगिक अत्याचार करणाऱ्या पाच तरुण आणि पीडित तरुणीच्या दोन मैत्रिणी अशा एकूण सात जणांविरुद्ध पीडित तरुणीच्या तक्रारीवरून टिटवाळा पोलिसांनी मंगळवारी लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल केला आहे.

टिटवाळा पोलीस ठाण्यातील तक्रारीत पीडित तरुणीने म्हटले आहे की, मी टिटवाळा येथे माझ्या काकीकडे राहते. मी स्वत: कल्याणमध्ये एका बांधकाम कंपनीत नोकरी करते. घरात एक जण रिक्षा चालवतो. या मिळकतीमधून आमचा उदरनिर्वाह चालतो. गेल्या मार्चमध्ये आपले रात्रीच्या वेळेत काकी बरोबर किरकोळ कारणावरून भांडण झाले. या भांडणाच्या रागातून मी रात्रीच टिटवाळ्यात राहणाऱ्या माझ्या मैत्रिणीच्या घरी गेले. मैत्रिणीचे कुटुंबीय घरी होते. त्यांनी मला आधार दिला. मैत्रिणीच्या शेजारीच माझी अन्य दुसरी मैत्रिणपण राहत होती. त्यामुळे मी काकीच्या घरी न जाता दहा दिवस माझ्या दोन्ही मैत्रिणींच्या घरी आलटून पालटून राहत होते. दहा दिवसानंतर सकाळी मी माझ्या काकीच्या घरी जाण्याचा निर्णय घेतला. हा विषय मी माझ्या एका मैत्रिणीला सांगितला. मैत्रिणीने तिच्या मित्राला फोन करून बोलून घेतले.

# राज्यातील १३६ शासकीय आश्रमशाळांचा तर १०४ अनुदानित आश्रमशाळांचा १०० टक्के निकाल

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेब्रुवारी-२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर केला. या निकालात आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित केले. राज्यातील तब्बल १३६ शासकीय आश्रमशाळांचा तर १०४ अनुदानित आश्रमशाळांचा १०० टक्के निकाल लागला आहे.

आदिवासी विकास विभागाकडून ४९७ शासकीय तर ५५४ अनुदानित आश्रमशाळा चालविल्या जातात. दुर्गम आदिवासी भागातील मुलामुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आश्रमशाळा हा एक प्रभावी पर्याय ठरतो आहे. या आश्रमशाळांच्या गुणवत्तावाढीसाठी विभागाकडून विविध उपक्रम राबविण्यात येतात. यंदाच्या इयत्ता बारावीचा निकालात आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी बाजी मारल्याचे चित्र आहे. राज्यातील शासकीय आश्रमशाळांचा एकूण निकाल ९४.१५ टक्के इतका लागला. १३६ आश्रमशाळांचा निकाल शंभर टक्के आहे. त्यात कला शाखेच्या (५७) तर विज्ञान शाखेच्या (७९) आश्रमशाळांचा समावेश आहे. अनुदानित आश्रमशाळांचा निकाल ९२.४६ टक्के घोषित झाला आहे. १०४ आश्रमशाळांचा निकाल शंभर टक्के आहे. त्यात कला शाखेच्या (४७) तर विज्ञान शाखेच्या (५७) आश्रमशाळा आहे. दरम्यान, राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, विभागाचे सचिव विजय वाघमारे, आयुक्त लीना बनसोड यांनी विभागातील अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.

**विभागनिहाय १०० टक्के निकाल लागलेल्या आश्रमशाळा विभाग-शासकीय-अनुदानित**

नाशिक-४६-३८, ठाणे-३४-१०, अमरावती-३७-३७, नागपूर-१९-११ एकूण-१३६-१०४ आश्रमशाळांमध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनी केवळ परीक्षांमध्येच नव्हे, तर विविध शैक्षणिक उपक्रमांतही आपले कौशल्य सिद्ध केले आहे. विभागातील अधिकारी, शाळा मुख्याध्यापक, शिक्षकांनी सातत्याने केलेले मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची चिकाटी आणि शाळेतील शिस्तबद्ध वातावरण यामुळे बारावीच्या निकालात यश मिळाले. पुढील वर्षी सर्वच आश्रमशाळांचा १०० टक्के निकाल लागण्याच्या दृष्टीने नियोजन केले जाईल.
**-लीना बनसोड, आयुक्त आदिवासी विकास आयुक्तालय**

# गोंदेजवळ आयशरची कारला धडक; ५ म्हशी ठार

**सिन्नर : प्रतिनिधी**

नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर नागपूर येथून देवनार-मुंबईकडे २१ म्हशी घेऊन जाणाऱ्या आयशरने डाव्या बाजूला चालणाऱ्या कारला धडक दिल्याने झालेल्या अपघातात आयशरमधील ५ म्हशी ठार झाल्या असून, एक म्हैस गंभीर जखमी झाली. तर कारमधील एकजण गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवारी (दि.८) पहाटे ४.३० वाजेच्या सुमारास घडली.

दरम्यान, नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग अपघातांच्या मालिकांमुळे कलंकित झाला असून, या महामार्गावरून अवैधरीत्या जनावरांची वाहतूक सर्रास होत असल्याचे या अपघाताने उघडकीस आली आहे.

नागपूर येथून २१ म्हशी घेऊन देवनार-मुंबईकडे भरधाव वेगात जाणाऱ्या आयशर (क्र.एमएच-०३, ईजी-१८३१) गोंदे शिवारात चॅनल नं. ५६६.२ आला असता चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने आयशरने महामार्गावर डाव्या बाजूने मुंबईकडे जात असलेल्या कारला (क्र. युपी-६६, एबी-३१५७) धडक दिली. या अपघातात आयशरमधील ५ म्हशी जागीच ठार झाल्या तर एक म्हैस गंभीर जखमी झाली. तसेच कारमधील राजेंद्रकुमार राजकिशोर पांडे हे देखील गंभीर जखमी झाले.

# खेळाडूंसाठी निवड चाचणी वेळापत्रक जाहीर

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या विविध गटातील राज्यस्तरीय निमंत्रितांच्या क्रिकेट स्पर्धांसाठी नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेतर्फे- एनडीसीए तर्फे सर्व वयोगटातील खेळाडूंची वर्ष २०२५-२६ करिता जिल्हा क्रिकेट संघ निवड चाचणी हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान, गोल्फ क्लब येथे घेण्यात येणार आहे. त्याप्रमाणे सर्व इच्छुक क्रिकेट खेळाडूंनी नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेच्या हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान, गोल्फ क्लब येथील कार्यालयात कामकाजाच्या वेळेत नावनोंदणी करणे आवश्यक आहे.

# पिंपरखेडला बोगस डॉक्टरला अटक

## नांदगाव पोलिसांत गुन्हा दाखल, औषधसाठा जप्त

**पळाशी : वार्ताहर**

ॲलोपॅथीची वैद्यकीय पदवी अथवा परवाना जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्या पिंपरखेड (ता. नांदगाव) येथील बोगस डॉक्टरवर तालुका वैद्यकीय अधिकाऱ्यांनी कारवाई करत नांदगाव पोलिसांत गुन्हा दाखल केला. त्यास अटक केली असून, त्याच्याकडील उपलब्ध औषधसाठा जप्त केला.

सविस्तर वृत्त असे की, नांदगाव तालुक्यातील पिंपरखेड येथे कुठलीही वैद्यकीय परवानगी व शिक्षण नसताना अभिजित जगदीश मुखर्जी या बोगस डॉक्टरने ग्रामीण भागात वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. रुग्णाच्या जीवाशी खेळत उपचार केले जात होते. मिळालेल्या माहितीनुसार, अभिजित मुखर्जी ॲलोपॅथिक औषधांद्वारे रुग्णांवर उपचार करीत असल्याची तक्रार तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जगताप यांच्याकडे प्राप्त झाली होती. या तक्रारीवरून डॉ. जगताप यांनी आरोग्य विस्तार अधिकारी अमोल कठाळे व डॉ. दत्तात्रय मोरे यांच्यासह मुखर्जी याच्या पिंपरखेड येथील दवाखान्यावर छापा टाकत कारवाई केली. या झडतीदरम्यान मुखर्जी याच्या दवाखान्यात ॲलोपॅथिक औषधे, शेड्युल एन वन अंतर्गत येणारी औषधे, बी.पी., मशीन, स्टेथोस्कोप, सलाइन स्टँड, डॉक्टर बॅग यांसह उपचार साहित्य आढळले. हा संपूर्ण साठा जप्त केला. संशयिताने यावेळी बीईएमएस, सीएमएस आणि ईडीपी, डीएनवायएस इलेक्ट्रोपॅथी अशा गैर ॲलोपॅथिक पदव्या सादर केल्या. याप्रकरणी महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियमांतर्गत तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. जगताप यांच्या फिर्यादीवरून नांदगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलिस निरीक्षक सुनील बढे तपास करीत आहेत.


**नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या. नासिक**
सुयोजित संकुल, राजीव गांधी भवन शेजारी, शरणपूर रोड, नाशिक. २. फोन ०२५३-३५६६४१६

**अचल मालमत्ता विक्री करण्याबाबतची निविदा सुचना**

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या. नाशिक संस्थेची लक्ष्मी नगर, कॉलेज रोड, नाशिक येथील स्वमालकीची जागा विक्री करण्याबाबतची मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

निविदेतील सविस्तर अटी / शर्ती तसेच मालमत्तेची माहिती संस्थेचे कार्यालय येथे पहावयास मिळतील. निविदा प्रक्रियेच्या तारखा खालील प्रमाणे

| अनु. क्र | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | जागेचे बाजार मूल्य (रु. लाखात) | रु. ५९८ लाख (डिस्ट्रेस व्हॅल्यु) |
| २ | निविदा फॉर्म विक्री | दि. ०९/०५/२०२५ ते २२/०५/२०२५ (सकाळी ११.०० ते ५.३० पर्यंत) |
| ३ | मालमत्ता पाहणी कार्यक्रम | दि. ०९/०५/२०२५ ते २२/०५/२०२५ (सकाळी ११.०० ते ५.३० पर्यंत) |
| ४ | निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख | दि. २४/०५/२०२५ |
| ५ | निविदा उघडण्याची तारीख | २८/०५/२०२५ |
| ६ | संपर्क अधिकारी | श्री.के.टी.चोळके, व्यवस्थापक<br>ऑफीस ०२५३-३५६६४१६ |

दिनांक : **०९/०५/२०२५**
ठिकाण : **नासिक**

(के.डी.धुम) **मानद कार्य. संचालक** | (एस.एम.सुर्यवंशी) **व्हा. चेअरमन** | (के. एल. ढोमसे) **चेअरमन**

नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सेवकांची सह. पतसंस्था मर्या. नासिक.



**टायटल व्हेरीफिकेशनकामी जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका नाशिक पैकी **नाशिक** महानगरपालिका हद्दीतील **मौजे नाशिक** येथील **सि.स.नं.६००/अ** यांसी **क्षेत्र ७५८-३६ चौ.मी.** या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या **श्रीराम संकुल** या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील तळ मजल्यावरील **दुकान/शॉप नं.८ (आठ)** यांसी **बांधीव क्षेत्र १८-५८ चौ.मी.** ही मिळकत.

सदर मिळकत ही **श्री.अभिषेक सोहनलाल जैन** यांचे मालकीची असून सदरील मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची असल्याचे मिळकत मालकांनी खात्रीशीरपणे व भरवश्याने सांगुन आमचे पक्षकार यांचे बरोबर मिळकत विक्रीचा व्यवहार निश्चित केलेला आहे. तथापि सदरील मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा बोजा जसे गहाण, दान, लिन, लिज, विसारपावती, बक्षीसपत्र, साठेखत, विकसन करारनामा, जनरल मुखत्यारपत्र, करारमदार, कोर्ट वाद, जप्ती, जामीनकी बँक/सोसायटी इत्यादी स्वरुपाचा बोजा असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झालेपासुन **०७ (सात) दिवसांचे आत** समक्ष भेटुन आमचे खालील पत्यावर साक्षांकित कागदपत्रानीशी समक्ष येवुन आमची खात्री पटवुन द्यावी. दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजण्यात येईल व तसा ना हरकत दाखला मिळकत मालकांना देण्यात येईल. मुदतीनंतर आलेली हरकत किंवा परस्पर कोणत्याही दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेली हरकत ही सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी. कळावे, ही जाहीर नोटीस नाशिक. दि.८/५/२०२५.

**शितल विजय बोरस्ते, ॲडव्होकेट**
ऑफिस : ७, तांबे टॉवर, मारुती मंदिराजवळ, मखमलाबाद नाका, पंचवटी, नाशिक.मो.९८६०१२५१२०



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
**मौजे मानोली**, तालुका व जिल्हा नाशिक यांसी **गट क्रमांक व उपविभाग २३/१ (भोगवटदार वर्ग-१)** यांसी **क्षेत्र ०१ हे. १६.०० आर** यांसी आकार ०१ रुपये ११ पैसे यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे.

उपरोक्त वर्णन केलेल्या शेत जमीन मिळकतीचे **कमल अशोक घोडे** हे मालक व कब्जेदार असुन सदरील मालकाने **आमचे पक्षकार श्री.रंजित शिवराम गावित** यांच्याबरोबर व्यवहार निश्चित करून त्यांच्याकडून विसार स्विकारलेला आहे.

सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची असुन त्याकामी टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस प्रसिध्द कलेली आहे. तथापी, सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणत्याही स्वरुपाचा गहाण, दान, लिन, लिज, मृत्युपत्र, बक्षीसपत्र, अन्नवस्त्र, विसारपावती, साठेखत करारनामा, विकसन करारनामा अगर अन्य प्रकारे हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास त्यांनी आमचे खालील पत्यावर साक्षांकित कागदपत्रांनिशी **०८ दिवसांचे आत** लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न अल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजुन तसा संबंधितांना दाखला देण्यात येईल. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली, रजिस्ट्रर पोस्टाने आलेली हरकत तसचे मुदतीनंतर आलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही. कळावे, ही टायटल व्हेरिफिकेशन नोटीस. नाशिक. दि.०७/०५/२०२५.

**श्री.विशाल किसन जाधव, ॲडव्होकेट**
ऑफीस : शॉप नं.३ व ४, पुर्नम सोसायटी, कान्हेरेवाडी, सीबीएस., नाशिक, ता.जि.नाशिक.मो.९६६५००५२३२/९२८४८७७३४४



**दस्त गहाळ झालेबाबत जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी **तालुका निफाड** पैकी **मौजे ओझर** या गांवचे शिवारातील **सिटी सर्व्हे नंबर ३६६** यांसी क्षेत्र १७४४-०९ चौरस मीटर यावर बांधलेल्या व **बळवंत** या नावाचे इमारतीमधील **दुसऱ्या** मजल्यावरील **फ्लॅट नं.एस-३** यांसी **क्षेत्र ६०.४० चौरस मीटर** यांसी **ग्रामपंचायत मिळकत नं.७५८/१७** ही मिळकत, यांसी चतु:सिमा मंजुर नकाशाप्रमाणे.

उपरोक्त मिळकत आजरोजी **अलका शिवाजी वाघ** यांचे मालकीची व कबजे उपभोगातील असून त्यांनी सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचे खात्रीशिररित्या सांगितलेले आहे. परंतु सदर मिळकतीचे पुर्वाश्रमीचे मालक **श्री.महावीर बन्सीलाल कासलीवाल** यांचे लाभातील व **दिनांक १७/११/२०००** रोजी मे.दुय्यम निबंधक सो. निफाड यांचे कार्यालयात नोंदविण्यात आलेला **खरेदीखताचा दस्त** यांसी **दस्त क्र.४५१४/२०००, हा दस्त व त्याची मुळ नोंदणी पावती मिळकत मालक यांचेकडून निफाड परिसरात हरविली/गहाळ झालेली आहे** व शोध घेतला असता सापडुन आलेली नाही. मिळकत मालक यांनी उपरोक्त दस्तांचा कोणत्याही प्रकारे गैरवापर केला नसल्याचे खात्रीशीरपणे सांगितले आहे. तत्राप, उपरोक्त मिळकतीचे मालकी हक्क व निर्वेधपणा बाबत कोणाची काही हरकत/तक्रार असल्यास अगर उपरोक्त दस्ताची व नोंदणी पावतीची मुळ प्रत कोणासही सापडून / मिळुन आल्यास त्यांनी कृपया खालील पत्यावर **७ दिवसांचे आत** संपर्क साधावा. कळावे, ही दस्त गहाळ झालेबाबतची जाहिर नोटीस. नाशिक. दि.८/५/२०२५.

**समीर चंद्रशेखर रत्नपारखी, ॲडव्होकेट**
ऑफीस नं.३१०, सारडा संकुल, एम.जी.रोड, नाशिक.मो.९६२३११३७८५, ९१७५७२६५२९

पान १ वरून....

# अखेर युध्द पेटले

रडार यंत्रणा उद्ध्वस्त केली आहे. पाकिस्तान भारतावर मोठा हल्ला करण्याच्या प्रयत्नात होता. हा हल्ला उधळून लावण्यासाठी भारताने ड्रोन हल्ला करुन पाकिस्तानची -९ रडार यंत्रणा उद्ध्वस्त केली, अशी माहिती भारतीय लष्कराकडून देण्यात आली. अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कपूरथला, जालंधर, लुधियाना, आदमपूर, भटिंडा, चंदीगड, नल, फलोदी, उत्तरलाई आणि भुज या १५ ठिकाणी भारतीय लष्कराचे तळ लक्ष करण्याचा पाकिस्तानने प्रयत्न केला. पाकिस्तानने ड्रोन आणि मिसाईलचा वापर केला. आम्ही हाणून पाडला. डेब्रिज गोळा करण्याचे काम सुरू आहे, अशी माहिती भारतीय लष्कराकडून देण्यात आली आहे. गुरुवारी (दि. ८) सकाळी भारतीय सैन्याने पाकिस्तानमधील एअर डिफेन्स रडार आणि सिस्टम वर टार्गेट हल्ले केले. पाकिस्तानच्या कारवाईच्या समान क्षेत्रात आणि तीव्रतेतच भारताने प्रत्युत्तर दिले आहे. लाहोरमधील एक एअर डिफेन्स सिस्टम निष्क्रिय करण्यात आल्याची खात्रीलायक माहिती आहे. पाकिस्तानने कुपवाडा, बारामुल्ला, उरी, पुंछ, मेंढर आणि राजौरी या जम्मू-काश्मीरमधील नियंत्रण रेषेवरील भागांमध्ये मोर्तार आणि जड तोफखाना वापरून बिनप्रवोक हल्ल्यांची तीव्रता वाढवली आहे. या हल्ल्यांमुळे १६ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला असून, त्यामध्ये तीन महिला आणि पाच लहान मुलांचा समावेश आहे. या परिस्थितीत पाकिस्तानचा मोर्तार आणि तोफगोळ्यांचा मारा थांबवण्यासाठी भारताला कारवाई करावी लागली. भारतीय सैन्य तणाव वाढवण्याच्या विरोधात असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित करते, परंतु ही भूमिका पाकिस्तानच्या लष्करानेही पाळली पाहिजे.

**असे आहे भारताचे एस-४०० सुदर्शन चक्र**

एस-४०० मिसाईल सिस्टीम ही भारतातील सर्वात शक्तिशाली आणि घातक एअर डिफेन्स सिस्टीम मानली जाते. ही मिसाईल कोणत्याही हवाई हल्ल्यापासून संरक्षण करण्यात सक्षम आहे. भारताने ही मिसाईल रशियाकडून खरेदी केली आहे. ही मिसाईल अत्याधुनिक फाइटर जेट्सलाही मारून पाडण्याची क्षमता ठेवते. एस-४०० एकावेळी ७२ मिसाईल्स लाँच करू शकते. ही मिसाईल सिस्टीम इतकी शक्तिशाली आहे की पाकिस्तान आणि चीन यांच्याकडून होणारे हवाई हल्ले भारताच्या सीमांपर्यंत पोहोचण्यापूर्वीच नष्ट करू शकते. ही जगातील सर्वोत्तम एअर डिफेन्स सिस्टीम मानले जाते. ही सिस्टीम रशियाने तयार केली आहे. यात दोन स्वतंत्र रडार सिस्टीम्स आहेत, ज्या ६०० किमीपर्यंतच्या हवाई टार्गेट्सचा शोध घेऊ शकतात. एकावेळी ८० हवाई टार्गेट्स वर नजर ठेवून त्यांना लक्ष्य करू शकते. सिस्टीम सक्रिय झाल्यानंतर केवळ ३ मिनिटांत फायरिंगसाठी तयार होते. यामुळे शत्रूचा हल्ला तत्काळ निष्फळ केला जाऊ शकतो.

**अमेरिकन नागरिकांना पाकिस्तान सोडण्याच्या सूचना**

अमेरिकेच्या कर्मचाऱ्यांनी, अधिकाऱ्यांनी लाहोरमध्ये कुठेही फिरू नयेत अशा सूचना देण्यात आल्या आहेत. लाहोरच्या विमानतळाच्या आजूबाजूचा परिसर हा रिकामा केला जाऊ शकतो, असेही अमेरिकेने सांगितलं आहे. पाकिस्तानमधून बाहेर पडण्यासाठी प्लॅन तयार करा, सर्व आवश्यक कागदपत्रे तयार ठेवा, असेही अमेरिकेने सांगितले आहे.

**निष्पापांचा बळी घेणाऱ्या मसूदच्या अख्ख्या कुटुंबाचा खात्मा!**

भारतीय सैन्याच्या ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताचा गुन्हेगार दहशतवादी मसूद अझहरचंही कंबरडं मोडलं. मसूद अझहरच्या कुटुंबातील १४ जणांचा खात्मा केला. निष्पापांचा बळी घेणाऱ्या मसूदच्या कुटुंबावरच हिशेब देण्याची वेळ आल्यानं अझहर हादरून गेला आहे. अशातच कुख्यात दहशतवादी मसूद अझहरच्या कुटुंबातील १४ जणांसह या हल्ल्यात दहशतवादी मसूद अझहरचा भाऊ शतवादी भाऊ रौफ असगर गंभीर जखमी झाला होता. रौफ असगरचा मुलगा हुजैफाचाही यात समावेश होता. तर अझहरचा भाऊ रौफ असगरच्या भावाच्या पत्नीचाही मृत्यू झाला. रौफ असगर हा भारतातील मोस्ट मोस्ट वॉन्टेड दहशतवादी आहे. आयसी-८१४ अपहरण करण्यात रौफ असगरची महत्त्वाची भूमिका बजावली होती. यानंतर, अल-कायदाचा प्रमुख कार्यकर्ता उमर सईद शेख याला सोडण्यास भाग पाडण्यात आले होतं.अशातच ऑपरेशन सिंदूरमध्ये जखमी झालेल्या रौफ असगरचा ही आता खात्मा झाल्याची माहिती समोर आली आहे.

**कंदाहार विमान अपहरणातील मास्टरमाईंड**

राऊफ असगरने भारतीय एअरलाइन्सच्या आयसी-८१४ विमानाच्या अपहरणाची योजना आखली होती. या अपहरणामुळे भारत सरकारला मसूद अझहर, अहमद उमर सईद शेख आणि मुश्ताक अहमद झरगर यांना सोडावे लागले. कंदाहार विमान अपहरण प्रकरण, ज्याला आयसी-८१४ अपहरण म्हणूनही ओळखले जाते, हे भारताच्या नागरी विमान वाहतुकीच्या इतिहासातील एक अत्यंत गंभीर आणि वादग्रस्त घटना आहे. २४ डिसेंबर १९९९ रोजी, इंडियन एअरलाइन्सच्या फ्लाइट आयसी-८१४ या एअरबस ए ३०० विमानाचे अपहरण करण्यात आले. हे विमान नेपाळमधील काठमांडू येथून दिल्लीकडे निघाले होते. भारतीय हवाई क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर सुमारे ४० मिनिटांनी, पाच हिजबुल मुजाहिदीनच्या दहशतवाद्यांनी विमानाचे अपहरण केले.विमानात १७९ प्रवासी आणि ११ कर्मचारी होते. अपहरणकर्त्यांनी विमानाला अमृतसर, लाहोर आणि दुबई येथे उतरवले. दुबईमध्ये त्यांनी २७ प्रवाशांना सोडले आणि एका प्रवाशाची हत्या केली. शेवटी, विमान अफगाणिस्तानमधील तालिबान-नियंत्रित कंदाहार येथे उतरवण्यात आले. अपहरणकर्त्यांनी भारत सरकारकडे तीन दहशतवाद्यांची सुटका करण्याची मागणी केली. यानंतर मसूद अझहर, अहमद उमर सईद शेख, मुश्ताक अहमद झरगर या तिघांची सुटका ३१ डिसेंबर १९९९ रोजी करण्यात आली, ज्यामुळे अपहरण समाप्त झाले.

# जम्मू, पठाणकोट, जैसलमेर, होशियारपूरवर ड्रोन हल्ला

**(पान १ वरून)** करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे भारतीय वायूदलाने ड्रोनचा वापर करुन लाहोरमधील पाकिस्तानची एअर डिफेन्स सिस्टिम आणि रडार यंत्रणा उद्ध्वस्त केली आहे. पाकिस्तान भारतावर मोठा हल्ला करण्याच्या प्रयत्नात होता. हा हल्ला उधळून लावण्यासाठी भारताने ड्रोन हल्ला करून पाकिस्तानची -९ रडार यंत्रणा उद्ध्वस्त केली, अशी माहिती भारतीय लष्कराकडून देण्यात आली. अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, कपूरथला, जालंधर, लुधियाना, आदमपूर, भटिंडा, चंदिगड, नल, फलोदी, उत्तरलाई आणि भुज या १५ ठिकाणी भारतीय लष्कराचे तळ लक्ष्य करण्याचा पाकिस्तानने प्रयत्न केला. पाकिस्तानने ड्रोन आणि मिसाईलचा वापर केला. आम्ही हाणून पाडला. डेब्रिज गोळा करण्याचे काम सुरू आहे, अशी माहिती भारतीय लष्कराकडून देण्यात आली आहे. गुरुवारी (दि. ८) सकाळी भारतीय सैन्याने पाकिस्तानमधील एअर डिफेन्स रडार आणि सिस्टमवर टार्गेट हल्ले केले. पाकिस्तानच्या कारवाईच्या समान क्षेत्रात आणि तीव्रतेतच भारताने प्रत्युत्तर दिले आहे. लाहोरमधील एक एअर डिफेन्स सिस्टम निष्क्रिय करण्यात आल्याची खात्रीलायक माहिती आहे. पाकिस्तानने कुपवाडा, बारामुल्ला, उरी, पुंछ, मेंढर आणि राजौरी या जम्मू-काश्मीरमधील नियंत्रण रेषेवरील भागांमध्ये मोर्तार आणि जड तोफखाना वापरून बिनप्रवोक हल्ल्यांची तीव्रता वाढवली आहे. या हल्ल्यांमुळे १६ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला असून, त्यामध्ये तीन महिला आणि पाच लहान मुलांचा समावेश आहे.

**असे आहे भारताचे एस-४०० सुदर्शन चक्र**

एस-४०० मिसाईल सिस्टीम ही भारतातील सर्वात शक्तिशाली आणि घातक एअर डिफेन्स सिस्टीम मानली जाते. ही मिसाईल कोणत्याही हवाई हल्ल्यापासून संरक्षण करण्यात सक्षम आहे. भारताने ही मिसाईल रशियाकडून खरेदी केली आहे. ही मिसाईल अत्याधुनिक फाइटर जेट्सलाही मारून पाडण्याची क्षमता ठेवते. एस-४०० एकावेळी ७२ मिसाईल्स लाँच करू शकते. ही मिसाईल सिस्टीम इतकी शक्तिशाली आहे की पाकिस्तान आणि चीन यांच्याकडून होणारे हवाई हल्ले भारताच्या सीमांपर्यंत पोहोचण्यापूर्वीच नष्ट करू शकते. ही जगातील सर्वोत्तम एअर डिफेन्स सिस्टीम मानले जाते. ही सिस्टीम रशियाने तयार केली आहे. यात दोन स्वतंत्र रडार सिस्टीम्स आहेत. एकावेळी ८० हवाई टार्गेट्स वर नजर ठेवून त्यांना लक्ष्य करू शकते. सिस्टीम सक्रिय झाल्यानंतर केवळ ३ मिनिटांत फायरिंगसाठी तयार होते. यामुळे शत्रूचा हल्ला तत्काळ निष्फळ केला जाऊ शकतो.

**अमेरिकन नागरिकांना पाकिस्तान सोडण्याच्या सूचना**

अमेरिकेच्या कर्मचाऱ्यांनी, अधिकाऱ्यांनी लाहोरमध्ये कुठेही फिरू नयेत अशा सूचना देण्यात आल्या आहेत. लाहोरच्या विमानतळाच्या आजूबाजूचा परिसर हा रिकामा केला जाऊ शकतो, असेही अमेरिकेने सांगितले आहे. पाकिस्तानमधून बाहेर पडण्यासाठी प्लॅन तयार करा, सर्व आवश्यक कागदपत्रे तयार ठेवा, असेही अमेरिकेने सांगितले आहे.

**निष्पापांचा बळी घेणाऱ्या मसूदच्या अख्ख्या कुटुंबाचा खात्मा!**

भारतीय सैन्याच्या ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताचा गुन्हेगार दहशतवादी मसूद अझहरचंही कंबरडं मोडलं. मसूद अझहरच्या कुटुंबातील १४ जणांचा खात्मा केला. निष्पापांचा बळी घेणाऱ्या मसूदच्या कुटुंबावरच हिशेब देण्याची वेळ आल्यानं अझहर हादरून गेला आहे. अशातच कुख्यात दहशतवादी मसूद अझहरच्या कुटुंबातील १४ जणांसह या हल्ल्यात दहशतवादी मसूद अझहरचा भाऊ शतवादी भाऊ रौफ असगर गंभीर जखमी झाला होता. रौफ असगरचा मुलगा हुजैफाचाही यात समावेश होता. तर अझहरचा भाऊ रौफ असगरच्या भावाच्या पत्नीचाही मृत्यू झाला.

**कंदाहार विमान अपहरणातील मास्टरमाईंड**

राऊफ असगरने भारतीय एअरलाइन्सच्या आयसी-८१४ विमानाच्या अपहरणाची योजना आखली होती. या अपहरणामुळे भारत सरकारला मसूद अझहर, अहमद उमर सईद शेख आणि मुश्ताक अहमद झरगर यांना सोडावे लागले. कंदाहार विमान अपहरण प्रकरण, ज्याला आयसी-८१४ अपहरण म्हणूनही ओळखले जाते, हे भारताच्या नागरी विमान वाहतुकीच्या इतिहासातील एक अत्यंत गंभीर आणि वादग्रस्त घटना आहे. २४ डिसेंबर १९९९ रोजी, इंडियन एअरलाइन्सच्या फ्लाइट आयसी-८१४ या एअरबस ए ३०० विमानाचे अपहरण करण्यात आले. हे विमान नेपाळमधील काठमांडू येथून दिल्लीकडे निघाले होते.

**ई-निविदा सूचना**

ग्रामपंचायत कसबे सुकेणे, ता. निफाड, जि. नाशिक यांच्यातर्फे निविदा सूचना क्र.०१/२०२५-२६ द्वारे १५वा वित्त आयोग, ग्राम निधी, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत विविध विकास कामांसाठी साहित्य खरेदी करणे करिता, योग्य त्या प्रवर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहे. त्या बाबतची सविस्तर माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी इच्छुकांनी विहित मुदतीत निविदा सादर करावी.

**सही/-ग्रामविकास अधिकारी, कसबे सुकेणे, ता.निफाड, जि.नाशिक** | **सही/-उपसरपंच, कसबे सुकेणे, ता.निफाड, जि.नाशिक** | **सही/-सरपंच, कसबे सुकेणे, ता.निफाड, जि.नाशिक**

**ग्रामपंचात मरळगोईबु.ता.निफाडजि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सूचना क्र. ०२/२०२५-२०२६(प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत मरळगोई बु.ता.निफाड जि. नाशिक येथे १५ वित्त अयोग योजने दशक्रिया विधी परिसर सुधारणा करणे, शौचालय युनिट बांधकाम करणे कामी ई-निविदा मागवत आहे. ई-निविदा दिनांक ०५/०५/२०२५रोजी शासनाच्या www.mahatender.gov.in प्रसारित करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी वरील वेबसाईटवर उपलब्ध असून ठेकेदारांनी/पुरवठादारांनी ई- निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत मरळगोई बु.,ता.निफाड, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

**सही /-ग्रामपंचायत अधिकारी** **सही/-प्रशासक**
**ग्रामपंचायत मरळगोई बु., ता.निफाड, जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय खेडले ता. दिंडोरी, जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी**

**जाहीर ई निविदा सूचना २०२५-२६**

ग्रामपंचायत कार्यालय खेडले ता. दिंडोरी, जि. नाशिक येथे १५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरून दिनांक ०८/०५/२०२५पासून ते १४/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय खेडले, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय खेडले, ता. दिंडोरी,जि. नाशिक**

**ग्रामपंचायत कार्यालय ननाशी, ता. दिंडोरी, जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी**

**जाहीर ई निविदा सूचना २०२५-२६**

ग्रामपंचायत कार्यालय ननाशी ता. दिंडोरी जि. नाशिक येथे, १५वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून दिनांक ०८/०५/२०२५पासून ते १५/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय ननाशी, ता. दिंडोरी, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत..

**ग्रामपंचायत अधिकारी** **प्रशासक**
**ग्रामपंचायत कार्यालय ननाशी, ता. दिंडोरी जि. नाशिक**

**जाहीर नोटीस** नि., प्रोसेस जमा **मधुकर किसन शिंदे**

**कि.चौकशी अर्ज क्र.०८/२०२५**
**सुरगाणा येथील मे. तहसिलदार साहेब, तहसिल सुरगाणा यांचे न्यायालयात.....**
**मधुकर किसन शिंदे**, रा. हनुमंतमाळ, ता. सुरगाणा, जि. नाशिक **वादी**
**विरूध्द**
ग्रामसेवक, ग्रामपंचायत माणी, ता. सुरगाणा, जि. नाशिक **प्रतिवादी**
**विषय :- जन्म-मृत्यू नोंदणी सुधारीत अधिनियम २०२३ अन्वये मृत्युची नोंद होणेबाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **कमळी किसन शिंदे** यांचा मृत्यू **दिनांक १२/०९/१९९८** रोजी हनुमंतमाळ, ता. सुरगाणा, जि. नाशिक येथे झालेला आहे. त्यांचे मृत्युची नोंद सा.वाले यांनी ग्रुप ग्रामपंचायत माणी, ता. सुरगाणा, जि. नाशिक यांचेकडील जन्म-मृत्यु नोंद रजिष्टरला होऊन तसा दाखला मिळणेबाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी **कमळी किसन शिंदे** यांचा मृत्यू **दिनांक १२/०९/१९९८** रोजी हनुमंतमाळ, ता. सुरगाणा, जि. नाशिक येथे झालेबाबत मृत्युची नोंद सा. वाले यांचेकडील जन्म - मृत्यु नोंद रजिष्टरला होऊन तसा दाखला अर्जदारास देणे बाबत कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी स्वत: अगर आपले वकीलामार्फत सदर नोटीस प्रसिध्दीच्या दिनांकापासून **३०** दिवसांचे आत या न्यायालयात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. आपण हजर राहीला नाहीत अथवा कोणाची काही हरकत नाही असे गृहीत धरून अर्जदार यांना त्यांचे मागणीप्रमाणे मृत्युचे नोंदीबाबत आवश्यक ते आदेश पारीत करणेत येतील याची नोंद घ्यावी. आज **दिनांक ०८/०५/२०२५** रोजी मे. न्यायालयाचे आदेशान्वये व शिक्क्यानिशी दिली असे.

(शिक्का)
**सही/-तहसीलदार, सुरगाणा,**
**ता.सुरगाणा, जि.नाशिक**

**जाहीर नोटीस**

मी विनंतीपूर्वक प्रतिज्ञापत्राद्वारे कळवू इच्छिते की, माझे पती **रोहिदास विठ्ठल जाधव** यांचे **दिनांक १७/३/२०२३** रोजी दुःखद निधन झाले असून त्यांची कायदेशीर वारसदार म्हणून.**मी स्वतः (रंजना रोहिदास जाधव)** असून माझे पतीचे नावावर असलेली **महिंद्रा सिप्रो** ही मालवाहतूक **गाडी क्रमांक MH15FV993** ही माझे नावावर करायची आहे.याबाबत कुणाची काही हरकत असल्यास त्यांनी **सात** दिवसांचे आत लेखी मूळ दस्तासह संपर्क करावा. **सात** दिवसा नंतर आलेली कुणाचीही हरकत न आल्यास **रोहिदास जाधव** यांचे कायदेशीर वारस म्हणून पत्नी या नात्याने त्याचे नावे असणारी मालवाहतूक गाडी माझे नावावर करण्यास कुणाचीही हरकत नाही असे समजून. पुढील प्रोसिजर पूर्ण करण्यात येईल. **सात** दिवसांत आलेली तक्रार विचारात घेतली जाणार नाही. कळावे.

आपली विश्वासू
**रंजना रोहिदास जाधव**
**राहणार नैताळे ता. निफाड मो. नं. ९९६०६६१९१८/९५५२६७२९४७**

**नैताळे/रामपूर ग्रुप ग्रामपंचायत, नैताळे ता.निफाड जि.नाशिक**

**विषय - रिक्त असलेल्या शिपाई पदाच्या भरतीबाबत**

तमाम नागरिकांना कळविण्यात येते कि नैताळे/रामपुर ग्रुप ग्रामपंचायत कार्यालायात **शिपाई** या पदाची जागा रिक्त आहे. या जागेसाठी काम करणाऱ्या इच्छुक उमेदवारानी आपला अर्ज **दिनांक १३/०५/२०२५** रोजी पर्यंत **सकाळी ९-०० ते सायंकाळी ५-००** या कार्यालयीन वेळे पर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावा.सुट्टीच्या दिवसी कार्यालय बंद असेल याची इच्छुकांनी नोंद घ्यावयाची आहे. नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.अर्ज शक्यतो स्वतःच्या हस्तक्षरात असावा त्यावर शैक्षणिक पात्रता,काम करण्याची तयारी,पगाराची अपेक्षा याचा उल्लेख असावा
**(अटी व शर्ती लागू)**

**सौ.निशा पाठक, सरपंच** **सौ.सोनाली घायाळ, उपसरपंच**
**सौ.उज्वला भोईर - ग्रामविकास अधिकारी**
**नैताळे/रामपूर ग्रुप ग्रामपंचायत नैताळे ता.निफाड, जि.नाशिक**

**टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
**मिळकतीचे वर्णन** - तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी व तालुका सिन्नर पैकी मौजे सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील नगरपरिषद हद्दीतील व **सिन्नर २,** ता. सिन्नर, जि. नाशिक येथील **बिनशेती प्लॉट मिळकत स.नं. ९६१/१/९६१/२अ/९६१/२ब या मधील बिनशेती प्लॉट नं. ८६/३ यांसी क्षेत्र ६३.०० चौ.मी.** यांसी आकार रू. ४५-३६ यावर बांधकाम केलेल्या आणि **वात्सल्य संकुल -२७** या नावाने ओळखल्या जाणाऱ्या **रो हाऊस संकुलातील प्लॉट नं. ८६/३ यांसी क्षेत्र ६३.०० चौ.मी. क्षेत्रातील रो हाऊस चे तळमजला कारपेट क्षेत्र २७.४४ चौ.मी.+ पहिल्या मजल्याचे कारपेट क्षेत्र २७.३५ चौ.मी. याप्रमाणे एकुण कारपेट क्षेत्र ५४.७९ चौ.मी.** यांसी चतुःसिमा - मंजुर ले-आऊटप्रमाणे.

वर नमुद मिळकत ही **श्री. आसिफ इब्राहिम मनियार, सौ. हिना आसिफ मनियार** यांचे मालकी हक्काची व कब्जेवहिवाटीची अशी आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याबाबत त्यांनी आमचे पक्षकार यांस कबुली देऊन सदर मिळकतीबाबत आमचे पक्षकार यांच्यासोबत मिळकतीचा व्यवहार निश्चित केलेला आहे.

सबब वरील मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षीसपत्र, अन्न, वस्त्र, वारसदार, लिज, कोर्ट हुकुमनामा, साठेखत इ. कोणत्याही स्वरूपाचा हक्क अथवा हितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ **(सात)** दिवसांचे आत मुळ कागदपत्रांसह आमचे कार्यालयात देऊन आमची खात्री पटवुन द्यावी अन्यथा सदरील मिळकत निर्वेध असल्याबाबतचा दाखला देण्यात येईल तदनंतर कोणाच्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाही. ही जाहीर नोटीस.

सिन्नर, दि. ०८/०५/२०२५. **आमचे मार्फत प्रसिध्द**

**श्री. प्रदिप लक्ष्मण वारुंगसे (ॲडव्होकेट )**
**ऑफीस-लहामगे बिल्डींग, सिन्नर न्यायालयासमोर, सिन्नर, जि. नाशिक.**

**ग्रामपंचायत कार्यालय, ओढा ता. जि. नाशिक**

**जाहीर ई-निविदा सुचना क्र. ०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत ओढा ता. जि. नाशिक येथे विविध विकास कामासाठी महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत पुरवठादार यांच्याकडून साहित्यासाठी ई निविदा २ लिफाफा पद्धतीने -मागविण्यात येत आहे. सदर इ निविदा शासनाचा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून दि. ०८/०५/२०२५ ते १५/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. इ निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत..

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत ओढा, ता. जि. नाशिक**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकास कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णनः** तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका दिंडोरी पैकी **मौजे-वलखेड** ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत **अं.क्र. २३१/१, मालमत्ता क्रमाक २०१/१** ही मिळकत नामे **कै.किशोर कारभारी पाटील** रा.मु.पो. वलखेड, ता. दिंडोरी, जि.नाशिक यांचे मालकीची आहे. सदर मिळकतीचे **कै. किशोर कारभारी पाटील** यांचेनंतर कायदेशीर वारस नामे. **श्री. कारभारी किसन पाटील** असून याच्याव्यतिरिक्त अन्य कोणतेही वारस हे **कै. किशोर कारभारी पाटील** यांना नाही.

उपरोक्त मिळकतीचे वर नमुद वारसांव्यतिरिक्त कोणीही कायदेशीर वारस असल्यास तसेच कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क अधिकार असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१५** दिवसाचे आत आमच्या कार्यालयात संबधित कागदपत्र व साक्षी पुराव्यानिशी येऊन लेखी व समक्ष हरकत नोंदवाची अन्यथा सदरची मिळकतीचे वरील वारसाव्यतिरिक्त अन्य कोणतेही वारस नाही असे समजुन आमचे पक्षकार यांना त्यांचे मागणी नुसार नाहरकत दाखला दिला जाईल, मागुन कोणाची तक्रार ऐकली जाणार नाही. तसेच परस्पर वृत्तपत्रातील हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी,हि जाहीर नोटीस, आज **ता. ०८/०५/२०२५** रोजी अर्जदार यांचे मागणीनुसार प्रसिध्दीस दिली असे.

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**ॲडव्होकेट दिंडोरी-नाशिक न्यायालय,**
**कार्यालय-कृ.उ.बा.सं. संकुल, गाळा नं.३३,निळवडी रोड, दिंडोरी ता.दिंडोरी, जि.नाशिक मो.७३५००१२८११**

**ग्रामपंचायत तामसवाडी. ता.निफाड, जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सूचना क्र.०१/२०२५-२६(प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत तामसवाडी. ता.निफाड जि. नाशिक येथे वॉटर फिल्टर बसविणे, सोलर स्ट्रीट लाईट बसविणे, सोलर हायमास्ट बसविणे, सोलर सेट बसविणे या कामाकरीता दिनांक/०५/२०२५ पासून ई-निविदा शासनाच्या www.mahatender.gov.in प्रसारित करण्यात येत आहे.अधिक माहिती साठी वरील वेबसाईटवर उपलब्ध असून ठेकेदारांनी ई-निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत तामसवाडी. ता.निफाड जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

**सही /-ग्रामसेवक** **सही/-सरपंच**
**ग्रामपंचायत तामसवाडी, ता.निफाड, जि. नाशिक**

**चौकशीची जाहीर नोटीस**

एस.आर.एन.क्रमांक NSK/27294/1860/24
फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:

जावक क्रमांक/२७५८/२०२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाशिक, जानकी प्लाझा, नाशिक-पुणे रोड, द्वारका सर्कल जवळ, नाशिक. दि.१६/०७/२०२४

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक कै. सावळीराम गावित बहुउद्देशीय व शिक्षण संस्था, सुरगाणा, जि. नाशिक बाबत।**
**न्यासाचा पत्ता :-द्वारा-,** दिनकर सावळीराम गावित, घर नं.६३, मु.पो.उंबरठाण, ता.सुरगाणा, जि. नाशिक,
**अर्जदार- दिनकर सावळीराम गावित**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाशिक, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-
(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील १ | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १ | MEMBERSHIP FEE | ७०००.०० |

(अ) जंगम मिळकत :- रोख रु. ७०००/- मात्र
(अक्षरी रुपये सात हजार मात्र फक्त)

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किवा सर्वेक्षण क्र | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मुल्य |
|---|---|---|---|---|---|---|

ब) स्थावर मिळकत: रोख रु.०/- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **तीस** दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १६-०७-२०२४ रोजी दिली.

**सही/- अधीक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नाशिक**

**जाहीर नोटीस**
**(टायटल व्हेरिफीकेशनसाठी)**

ता.निफाड, जि.नाशिक गावचे शिवारातील शेतमिळकत **गट नं.८०** यांसी **क्षेत्र हे. ४=७३** तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, **मौजे भरवस, आर, पो.ख.०९ आर, असे एकुण क्षेत्र हे.४ = ८२ आर, आकार रू.४.८१ पैसे**, यापैकी **मंजुळाबाई संभाजी गाडे** यांचे मालकीचे **क्षेत्र हे. १ =०८ आर, पो.ख.०२ आर, आकार रू.१.१० पैसे** तसेच **विलास नारायण जाधव** यांचे मालकीचे **क्षेत्र हे.१=०८ आर, पो.ख.०२ आर, आकार रू.१.१० पैसे** व **जयवंत नारायण जाधव** यांचे मालकीचे **क्षेत्र हे.१=१० आर, आर, आकार रू.१.१० पैसे, तसेच १ विहीर** यांसह दरोबस्त मिळकत असून सदर मिळकतीस चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राइटप्रमाणे.

वर नमूद केलेली मिळकती या **१) मंजुळाबाई संभाजी गाडे २) विलास नारायण जाधव ३) जयवंत नारायण जाधव** यांच्या स्वतंत्र मालकीच्या व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीतील अशा आहेत. त्यांनी सदर मिळकती या निर्वेध व बिनबोजाच्या असल्याचे खात्रीने सांगुन त्यांनी आमचे पक्षकार यांचेशी व्यवहार निश्चीत केलेला आहे. त्याकामी सदर मिळकतीचे मालकी हक्क संबंधाने खात्री करावयाची असलेने आमचे पक्षकार यांनी आमचेकडे टायटल सर्टीफिकेटची मागणी केलेली आहे. त्यामुळे सदर मिळकतींचे टायटल व्हेरिफीकेशन कामी सदरची नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. त्या अनुषंगाने सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत असून सदर मिळकतींवर कोणासही कोणत्याही प्रकारचा हक्क जसे गहाण, दान, लिन, लिज, साठेखत, विसारपावती, जामिनकी, कोर्ट जप्ती, हुकूमनामा, मृत्युपत्र वगैरे अन्वये हितसंबंध असलेस सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून **सात** दिवसांचे आंत आमचे खालील पत्त्यावर येवून आमची कागदपत्रानिशी खात्री करून द्यावी. परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही. त्यानंतर आमचे पक्षकार सदरचा व्यवहार लगोलग पुर्ण करतील. येणेप्रमाणे मुदतीत वर्तन न केल्यास मिळकत पुर्णपणे निर्वेध आहेत असे समजुन टायटल व्हेरिफीकेशन सर्टीफिकेट देण्यात येईल.

**कळावे, ता.०८.०५.२०२५**

**आमचे पक्षकार-१) श्री.केशव भिकाजी उगलमुगले .**
**२) श्री. गणपत भागवत नागरे**

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**श्री.जनार्दन भाऊसाहेब कुंदे**
**ॲडव्होकेट्स चेंबर नं.२०३/१, निफाड जिल्हा व सत्र न्यायालय आवार, निफाड, ता.निफाड, जि. नाशिक मोबा नं.९०११४३६७७०**

**गांवकरी Classified**
**जाहिरातीसाठी संपर्क 9404434628**

**पाहिजेत**

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क :** ९२७२०९१४२५

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क-** ९८९००१३१३६

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोड येथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

**पाहिजेत**

पंचवटीत कापड दुकानाकरिता पंचवटीतील स्थानिक मुले पाहिजेत. सकाळी ९ ते १. ७५८८६६४४९१

---

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-९८६०१३६५३६**

**महिला व पुरूष पाहिजेत**

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१ **एन.एन. असोसिएटस्**, तिसरा मजला, आय. डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी.रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५.
संपर्क- 8668862801

**Name change**

I, SONALI JANARDAN KADAM DECLARE THAT MY SON NAME CHANGED VIBHAV JANADHAN KADAM (OLD NAME) TO **VIBHAV JANARDAN KADAM** AS PER VIDE AFFIDAVIT NO. 35AB146592 & GAZETTE NO. (MR-24244464)

---

I, GORDE MACHINDRA BAJIRAO father of NO. 15756554K RANK Signalman NAME GORDE RUTWIK MACHINDRA, presently residing at KOPARGAON, AHMADNAGAR MAHARASHTRA 423601 declare that I have changed my name from MACHINDRANATH BAJIRAO GORDE to GORDE MACHINDRA BAJIRAO.

---

I,GORDE ANURADHA MACHINDRA mother of NO. 15756554K RANK Signalman NAME GORDE RUTWIK MACHINDRA, presently residing at KOPARGAON, AHMADNAGAR MAHARASHTRA 423601 declare that I have changed my name from ANURADHA to GORDE ANURADHA MACHINDRA.

**नाम बदल**

मैं, गोर्डे मच्छिंद्र बाजीराव,संख्या १५७५६५५४ रैंक सिगनलमैन नाम गोर्डे ऋत्विक मच्छिंद्र का पिता हूं स्थाई पता: कोपरगाव, अहमदनगर, महाराष्ट्र ४२३६०१ घोषणा करता हूं कि मैंने अपना नाम मच्छिंद्रनाथ बाजीराव गोर्डे से बदलकर गोर्डे मच्छिंद्र बाजीराव कर लिया है।

---

मैं, गोर्डे अनुराधा मच्छिंद्र, संख्या १५७५६५५४ रैंक सिगनलमैन नाम गोर्डे ऋत्विक मच्छिंद्र की माँ हूं स्थाई पता: कोपरगाव, अहमदनगर, महाराष्ट्र ४२३६०१ घोषणा करती हूं कि मैंने अपना नाम अनुराधा से बदलकर गोर्डे अनुराधा मच्छिंद्र कर लिया है।

**जाहिरात छोटी किमया मोठी!**

**नाशिक येथील मे. श्री. फयाज मुलाणी, सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांचे समोर**
महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्यास बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे क.११ (३) अन्वये
**जा.क.जिउनि-नाशिक/काअ/मानवी अभिहस्तांरण अर्ज/दुर्गेश रेसिडेन्सी/जाहीर नोटीस/२५०५/२०२५**
दि. २९/०४/२०२५

**जाहीर समन्स/नोटीस** **मानिव अभिहंस्ताणरण अर्ज. ०७/२०२५**

**दुर्गेश रेसिडेन्सी ओ अपार्टमेंट तर्फे**
**तर्फे युनिटधारक दिलीप लक्ष्मण घोलप**
(घोषणापत्र क्र. ६४२/२०२२, दिनांक १८/०२/२००२
रा. फ्लॅट नं. ओ-१०. दुर्गेश रेसीडेन्सी अ-अपार्टमेंट, गंगापुर रोड, नाशिक. **अर्जदार**
**विरुध्द**
**१) मे. दुर्गेश कन्स्ट्रक्शन प्रा.लि. तर्फे संचालक**
**१) श्री. संजय प्रभाकर भडके**
**२) श्री. मंदार वसंतराव केळकर**
सर्व रा. आनंदी अपार्टमेंट, कोतवाल पार्क, त्र्यंबक रोड, नाशिक.
**२) मे. विभव कन्स्ट्रक्शन प्रा.लि. तर्फे भागीदार**
**१) श्री. सुबोध प्रभाकर कोतवाल**
**२) श्री. सचिन सुमतीलाल शहा**
**३) श्री. विवेक विनायक जायखेडकर**
सर्व रा. आनंदी अपार्टमेंट, कोतवाल पार्क, त्र्यंबक रोड, नाशिक **प्रतिपक्ष**

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ अन्वये आणि लागू असलेल्या नियमांन्वये अर्जदाराने, प्रवर्तकाच्या/प्रतिपक्षाच्या विरुध्द वरील अर्ज दाखल केला आहे. याकडे लक्ष देणे.

या कार्यालयाने सर्व संबधीत वादी व प्रतिवादी यांना दिनांक २४/०३/२०२५ रोजी सुनावणी नोटीस बजावुन अनुक्रमे दिनांक २३/०४/२०२५ व २८/०४/२०२५ रोजी सुनावणी ठेवण्यात आलेली होती. तथापि सदर सुनावणीचे दिवशी व वेळी सामनेवाले /प्रतिवादी हे उपस्थित राहिलेले नाही. सबब, सर्व संबधीत सामनेवाले/ प्रतिवादी व त्यांचे कायदेशिर वारस तसेच त्यांचे ज्ञात/अज्ञात हितसंबधी यांना विषयांकीत प्रकरणी त्यांचे लेखी/तोंडी म्हणणे मांडणेची पुनश्चः एक संधी या जाहिर नोटीसीव्दारे देण्यांत येत आहे. सबब, सर्व संबधीत वादी/प्रतिवादी व त्यांचे कायदेशिर वारस तसेच ज्ञात/ अज्ञात हितसंबधी यांना कळविण्यांत येते की, विषयांकित प्रकरणी या कार्यालयात दाखल अर्जाचे अनुषंगाने त्यांना काही म्हणने मांडावयाचे असल्यास त्यांनी **वार-सोमवार दि. १९/०५/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता** समक्ष अथवा प्राधिकृत प्रतिनिधी यांचेमार्फत या मे. सक्षम अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक सहकार संकुल, सारर्डा सर्कल, उर्दू शाळेजवळ, नाशिक ४२२००१ यांचे कार्यालयांत उपस्थित राहुन लेखी /तोंडी म्हणणे मांडावयाचे आहे. सदरहु सुनावणीचे दिवशी व वेळी आपण अथवा आपले प्राधिकृत प्रतिनिधी हे सुनावणीस उपस्थित न राहिल्यास विषयांकीत प्रकरणी आपले काहीएक म्हणणे नाही अथवा आपणांस कोणतेही म्हणणे मांडावयाचे नाही असे गृहीत धरुन अर्जाचे चौकशीचे कामकाज एकतर्फी चालविले जाईल व त्यात झालेला आदेश प्रतिवादी तसेच त्यांचे ज्ञात/अज्ञात कायदेशीर वारस व हितसंबधी यांचेवर बंधनकारक राहील. सदरहु जाहहर नोटीस मे. सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांचे **दि.२८/०४/२०२५** रोजी दिलेल्या आदेशानुसार प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

**स्थळ :- नाशिक, दि. २९/०४/२०२५**

**सही/-कार्यालय अधिक्षक,**
**जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक**

**पत्ता - मे. सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, नाशिक सहकार संकुल, सारडा सर्कल, उर्दू शाळेजवळ, नाशिक ४२२००१**

**मुळ दस्त गहाळ झालेबाबतची जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मौजे नाशिक शहर २.** ता. जि. नाशिक येथील **सर्व्हे नं. ४८४/१/अ/ब/२ ते १२/१५/प्लॉट/१५ आणि सर्व्हे नं. ४८४/१/अ/ब/ २ ते १२/१६/प्लॉट/१६ यांसी एकूण क्षेत्र ७११.५० चौ.मी.** या मिळकतीवरील **गुंजन संकुल को-ऑप. हौसिंग सोसायटी लि., नाशिक** या इमारतीमधील तळ मजल्यावरील **फ्लॅट नं. १ यांसी बांधीव क्षेत्र ५२.९७ चौ.मी.** ही मिळकत आमचे अशिल **श्रीमती चित्रा रामचंद्र पवार** यांचे मालकीची आहे. सदर मिळकतीबाबतचा हस्तांतरण दस्त (ट्रान्सफर डीड) आमचे अशिल व इतर १ यांचे लाभांत मे दुय्यम निबंधक साहेब, नाशिक कार्यालयांत **दिनांक ०२/०३/२००६ रोजी अ.क्र. १०६०/२००६** अन्वये नोंदविण्यात आलेला ५ यांचे मुळ दस्तऐवज व रजिस्ट्रेशन पावती आणि तसेच सदर मिळकतीबाबत बक्षीसपत्राचा आमचे अशिलांचे लाभांत मे दुय्यम निबंधक साहेब, नाशिक १ यांचे कार्यालयांत **दिनांक २०/१२/२०२३ रोजी अ.क्र. १२३४७/२०२३** अन्वये नोंदविण्यात आलेला मुळ दस्तऐवज व रजिस्ट्रेशन पावती हे आमचे अशिल यांचेकडून गहाळ झालेबद्दल त्यांनी मुंबई नाका पोलीस स्टेशन, नाशिक यांचेकडे आवश्यक ती तक्रार **दिनांक ०७/०५/२०२५ रोजी वस्तु मिसिंग रजि. नं. ११०३/२०२५** अन्वये नोंदविलेली आहे. सबब सदर मुळ हस्तांतरण दस्त (ट्रान्सफर डीड) व रजिस्ट्रेशन पावती आणि बक्षीसपत्र व रजिस्ट्रेशन पावती हे कोणासही सापडल्यास त्यांनी आमचे अशिल **श्रीमती चित्रा रामचंद्र पवार**, रा. फ्लॅट नं. १, गुंजन संकूल, जनरल वैद्य नगर, पाटीदार भवन जवळ, द्वारका, नाशिक ४२२०११ (मोबाईल नं. ९५११६६८२६४) यांचेशी किंवा आमचे खालील पत्यावर कृपया संपर्क साधावा. यदाकदाचीत वर नमूद केलेले दस्तऐवज कोणास सापडल्यास त्यांनी सदरील दस्तांचा कोणत्याही स्वरूपाचा आमचे अशिलांचे संमतीशिवाय दुरूपयोग करू नये. अशाप्रकारे आमचे अशिलांचे संमतीशिवाय सदरील दस्तांचा व पावत्यांचा कोठेही वापर करण्यात आला तर तो वापर आणि त्या वापराने येणारी कोणत्याही प्रकारची जबाबदारी आमचे अशिलांवर येणार नाही तसेच सदरील मिळकतीसंबंधाने कोणाचेही हक्क, हितसंबंध वरील दस्तऐवजांचे आधारे असल्यास तशी हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **(सात)** दिवसांचे आंत आमचे खालील पत्त्यावर साक्षांकीत कागदपत्रांनिशी हरकत नोंदवावी. कळावे, ही जाहीर नोटीस.

**नाशिक, दिनांक ०८/०५/२०२५**

**श्री. राजेंद्र वसंतराव ठाकरे, ॲडव्होकेट**
**ऑफीस- चेंबर नं. २१४, बिल्डिंग नंबर २, जिल्हा न्यायालय, नाशिक**

## महत्त्वाचे

### पाथर्डी शिवारातून मेस्ट्रो दुचाकी चोरी; अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल

**सिडको :** पाथर्डी शिवार परिसरात अज्ञात चोरट्यांनी मेस्ट्रो दुचाकी चोरी केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून चोरट्यांचा शोध सुरू आहे. बाळासाहेब निवृत्ती पाईकराव (वय ३५, रा. पोद्दार स्कूलसमोर, अमृतानगर, पाथर्डी शिवार, नाशिक) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांची एमएच १५ डीव्ही २२०१ क्रमांकाची मेस्ट्रो कंपनीची टु व्हीलर त्यांच्या राहत्या घरासमोरून कोणीतरी अज्ञात व्यक्तीने परस्पर चोरून नेली. याप्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास इंदिरानगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार पवन परदेशी करीत आहेत.

### चोरी झालेली बाइक सापडली

**शिलापूर :** नाशिक रोड रेल्वे पोलिसांच्या कर्तव्यदक्षतेने चोरी झालेली मोटारसायकल जुन्या जनरल तिकीट घराजवळ मिळून आली. सहाय्यक फौजदार संतोष उफाडे पाटील हे रेल्वे स्टेशन परिसरात गुन्हेगार वॉच ड्युटी करत असताना त्यांना जनरल तिकीट घराजवळ एक काळ्या रंगाची टीव्हीएस कंपनीची स्पोर्ट एम.एच. १५ जेव्ही २९ १८ ही दुचाकी मोटारसायकल मिळून आली. सदर गाडीच्या नंबरप्लेटवरून मूळ मालक विकास विलास खिल्लारे, रा. सिन्नर, नाशिक यांचा शोध घेऊन त्यांना सदर गाडी मिळून आल्याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, चार-पाच महिन्यापूर्वीच सदर गाडी चोरी झाल्याबाबत सिन्नर पोलीस स्टेशनला तक्रार दिली आहे. तेथे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यावरून गाडीबाबतची पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

### चांदवडमध्ये 'ऑपरेशन सिंदूर' विजयाचा जल्लोष

**चांदवड :** भारतीय सैन्य दलाने 'ऑपरेशन सिंदूर' मोहिमेत मिळवलेल्या अभूतपूर्व यशाचा जल्लोष चांदवड तालुका भारतीय जनता पार्टीने मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करत, तिरंगा ध्वज फडकवत आणि 'भारत माता की जय'च्या घोषणा देत विजयोत्सव साजरा केला. पाकिस्तानने वारंवार दिलेल्या परमाणु हल्ल्याच्या धमक्यांना न जुमानता भारतीय सैन्य दलाने पहलगाम हल्ल्याचा बदला घेत भारतीय नागरिकांना न्याय मिळवून दिला. या शौर्यगाथेबद्दल भारतीय सैन्य दलाचे अभिनंदन करण्यासाठी चांदवड भाजपाने हा विजयोत्सव आयोजित केला होता. याप्रसंगी मंडळ अध्यक्ष मनोज शिंदे, गीताताई झाल्टे, ज्येष्ठ नेते अशोक काका व्यवहारे, बाळासाहेब वाघ, वर्धमान पांडे, व्ही. बी. चव्हाण तात्या, सुनील शेलार, राजेंद्र गांगुर्डे, सुनील डुंगरवाल, महेंद्र कंकरेज, कैलास गुंजाळ, बाळा पाडवी, देवा पाटील, संतोष क्षत्रिय, महेश खंदारे, मुकेश आहेर, विशाल ललवाणी, विठ्ठल आवारे, बापू सोमवंशी, पिंटू भोईटे, विजय धाकराव, प्रविण ठाकरे, संजय चौबे, गणेश ठाकरे, संतोष ढोमसे, विशाल ठाकरे, आप्पा गांगुर्डे, शंकरराव आहेर, बापू शिंदे, प्रदीप वानखेडे, सुनील ढोके, गोकुळ वाघ, बबन दरेकर, आत्माराम खताळ यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### महसूल विभागाचा १०० दिवसांचा कार्यक्रम

**सोनजांब :** महसूल विभागाच्या मिशन १०० दिवसाच्या कृती कार्यक्रमांतर्गत दिंडोरी उपविभागीय अधिकारी आप्पासाहेब शिंदे व तहसीलदार मुकेश कांबळे यांच्या आदेशान्वये कसबे वणी येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर शिबिरात अनुसूचित जातीच्या लोकांना सर्व आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्र देणे व तसेच वनहक्कधारकांच्या विविध शासकीय योजनांचे लाभ अभिसरणाच्या माध्यमातून १०० दिवसांत उपलब्ध करून देण्याबाबत उपस्थित नायब तहसीलदार वसंत धुमसे कसबे वणी मंडळ अधिकारी स्वप्नील थोरात यांच्यामार्फत मार्गदर्शन करण्यात आले. वणी मंडळात आयोजित विशेष शिबिरात विविध दाखल्यांचे अर्ज प्राप्त करून घेण्यात आले तसेच काही शालेय विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना जात प्रमाणपत्र आदिवास प्रमाणपत्र यांचे वाटप नायब तहसीलदार वसंत धुमसे व मंडळ अधिकारी स्वप्नील थोरात यांचे हस्ते वाटप करण्यात आले.यावेळी त्यांनी विविध योजनांची माहिती ग्रामस्थांना देण्यात आली. उपस्थित वणी तलाठी ज्ञानदेव चौरे, अहिवंतवाडी तलाठी हरिश्चंद्र पालवी, दीपाली देशमुख, सलोनी चव्हाण,विजय पालवी,सेतू संचालक कोतवाल, महसूल मित्र व कसबे वणी मंडळातील ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी सूत्रसंचालन पांडाने, तलाठी विजय वाघ यांनी करून ग्रामस्थांचे आभार व्यक्त केले.

### मराठा वधू-वर परिचय मेळावा ११ मे रोजी

**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक व मराठा शुभ लग्न डॉट कॉम यांच्या संयुक्त विद्यमाने गंगापूर रोड येथील कर्मवीर रावसाहेब थोरात सभागृहात रविवार (११ मे) रोजी राज्यस्तरीय मराठा वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. लग्नासाठी इच्छित उमेदवारांची नोंदणी सकाळी ९ वाजेपासून कार्यक्रम ठिकाणी सुरू होईल. त्यानंतर मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे व अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होईल, याप्रसंगी मविप्र संस्थेचे सर्व पदाधिकारी, संचालक व समाजबांधव उपस्थित असतील. या संधीचा जास्तीत जास्त उमेदवारांनी व त्यांच्या पालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# १० गुन्हे उघडकीस, ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

## गंगापूर पोलिसांची कारवाई

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**गंगापूर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने उत्कृष्ट कामगिरी करत ९ चेनस्नॅचिंग व २ मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. या प्रकरणात ६ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**



या प्रकरणातील फिर्यादी रोहिणी पद्माकर पाटील या त्यांच्या नातीसह स्कूटीवरून गंगापूर रोडने विद्याविकास सर्कलकडे जात असताना, केबीटी सर्कलजवळ त्यांच्या गळ्यातील दोन तोळ्याचे मंगळसूत्र दोन अज्ञात इसमांनी हिसकावून नेले. गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याच्या तपासादरम्यान पोलीस अंमलदार राकेश राऊत आणि तुळशीदास चौधरी यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार व सीसीटीव्हीच्या आधारे पो. नि. जग्वेंद्रसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पोउनि मोतीलाल पाटील यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तुकाराम गार्डन परिसरातून अनिकेत उर्फ अंड्या शार्दुल (रा. गोवर्धनगाव) व दोन विधी संघर्षित बालकांना ताब्यात घेतले. यावेळी संशयित आरोपींच्या चौकशीत आरोपींनी गंगापूरसह म्हसरूळ, कर्जत, चिंचवड, उपनगर, मुंबई नाका व नाशिकरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकूण १० चेनस्नॅचिंग व मोटारसायकल चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. तसेच चोरीचे मंगळसूत्र एका विधी संघर्षित बालकाने त्रिमूर्ती चौकातील सराफ विलास विसपुते यास विकल्याचे निष्पन्न झाले. विसपुतेकडून ३ लाख ९५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले.

याशिवाय, गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या दोन मोटारसायकल्सपैकी एक पल्सर २२० ही सातपूर येथून व दुसरी कर्जत पोलीस ठाण्याच्या गुन्ह्यातील असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पोलिसांनी आतापर्यंत ६ लाखांचा मुद्देमाल जप्त केला असून, उर्वरित चोरीचे सोने हस्तगत करण्याचे प्रयत्न सुरू आहे.

या उल्लेखनीय कारवाईसाठी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, उपायुक्त किरणकुमार चव्हाण व सहायक आयुक्त नितीन जाधव यांनी गंगापूर पोलिसांचे कौतुक केले आहे.

# रविशंकर मार्गावर महिलेचे मंगळसूत्र हिसकावले

## दोन अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

उपनगर पोलीस ठाणे हद्दीत रविशंकर मार्गावरील स्टंट फिटनेस जिमजवळ चाललेल्या एका महिलेला दोन अज्ञात इसमांनी लग्न समारंभात जात असताना गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून पळ काढल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोन अज्ञात इसमांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणातील फिर्यादी मनीषा राजेंद्र नानकर (वय ५१, रा. विद्यानगर, कॉलेज रोड, ता. कन्नड, जि. संभाजीनगर) या त्यांच्या पुतण्याच्या लग्नासाठी श्री श्री रविशंकर मार्ग, नाशिक येथे आल्या होत्या. दि. २९ एप्रिल २०२५ रोजी रात्री ८.३० च्या सुमारास त्या पायी चालत लग्नस्थळाकडे जात असताना स्टंट फिटनेस जिम, के. के. वाघ शाळेजवळ एका काळ्या रंगाच्या मोटारसायकलवर आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांच्यावर लक्ष ठेवून हल्ला केला. पाठीमागे बसलेल्या इसमाने मोटारसायकल हळू करत ३३ ग्रॅम वजनाचे, अंदाजे ९९ हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र त्यांच्या गळ्यातून जबरदस्तीने हिसकावून चोरून नेत आरोपी घटनास्थळावरून मोटारसायकलवरून पसार झाले. या प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास वपोनि जितेंद्र सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक फुलपगारे, सपोनि बैसाणे, पोउपनि पावरा व त्यांच्या पथकातील अधिकारी पोहवा लखन करीत आहेत.



# गंगापूर रोड परिसरात संजय मराठे क्रिकेट अकॅडमीला प्रारंभ

**नाशिक :** खेळाडूंमधील कौशल्य ओळखून त्यांना केलेले योग्य मार्गदर्शन, नियमितपणे सरावावर दिलेला भर आणि कठोर मेहनतीच्या बळावर नाशिकमधून महाराष्ट्राच्या क्रिकेट संघात आज काही खेळाडूंना संधी मिळाली आहे. आता भारतीय संघात नाशिकमधील खेळाडूंचे स्थान पक्के करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ क्रीडा प्रशिक्षक संजय मराठे यांनी केले.

गंगापूर रोड परिसरात संजय मराठे क्रिकेट अकॅडमीच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. नाशिक शहर परिसर, गंगापूर रोड, मखमलाबाद रोड परिसरातील खेळाडूंसाठी या अकॅडमीचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी अॅकॅडमीतील सर्वांत लहान अशा नऊ वर्षीय खेळाडूच्या हस्ते फीत कापून अकॅडमीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक संजय मराठे, प्रशिक्षक चंदन ढेरे, गौरव सोनवणे, विकास वाघमारे आदींसह सर्व पालक व खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. १२, १४, १६, १९, २३ वर्षांच्या आतील स्वतंत्र संघ तयार करून विविध क्रिकेट स्पर्धांमध्ये खेळण्याची संधी खेळाडूंना उपलब्ध करून दिली जाणार आहे.

# स्वामी समर्थनगरात अल्टो कारवर हल्ला

## अज्ञात टवाळखोरांकडून तोडफोड; परिसरात भीतीचे वातावरण

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सेंट लॉरेन्स स्कूल जवळील स्वामी समर्थनगर येथे उभी असलेल्या एका अल्टो कारची अज्ञात टवाळखोरांनी मध्यरात्रीच्या सुमारास धारदार शस्त्राने तोडफोड केल्याची घटना उघडकीस आली आहे. सिडको परिसरात गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असून, गुरुवारी पहाटे एका महिला पोलीस कर्मचाऱ्याच्या पतीच्या चारचाकी वाहनावर कोयत्याने हल्ला करण्यात आला. या घटनेमुळे परिसरात घबराट निर्माण झाली आहे.



संभाजी कडवे हे स्वामी समर्थनगरमधील गंगासागर रोहाऊसमध्ये राहतात. त्यांच्या घरासमोर त्यांची एमएच १५ बीडी ३०७१ या क्रमांकाची चारचाकी गाडी पार्क करण्यात आली होती. गुरुवारी मध्यरात्री २ ते ४ वाजण्याच्या सुमारास चेतन तिडके आणि कमलेश तिडके यांनी त्यांच्या वाहनावर कोयत्याने हल्ला केला.

या हल्ल्यात गाडीच्या समोरील आणि पाठीमागील काचा पूर्णपणे फोडण्यात आल्या. या घटनेची माहिती मिळताच सिडको पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान, संभाजी कडवे यांनी सिडको पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून चेतन तिडके आणि कमलेश तिडके यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू असून, लवकरच अटक करण्यात येईल, असे पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांनी सांगितले. दरम्यान, चेतन तिडके आणि कमलेश तिडके यांच्यावर यापूर्वीही काही गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलीस तपासातून समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं असून, सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस गस्त वाढवण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे. रात्रीच्या सुमारास अशा प्रकारच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण होत असून, पोलीस प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

# म्हसरूळ येथून देशी बनावटीचे पिस्तूल, जिवंत काडतुसासह तरुणाला अटक

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कार्यरत असलेल्या गुंडाविरोधी पथकाने उल्लेखनीय कामगिरी करत म्हसरूळ-आडगाव लिंक रोडवरील देशमुख वस्ती येथे एका २० वर्षीय तरुणाकडून देशी बनावटीचे पिस्तूल व जिवंत काडतूस हस्तगत केले. याप्रकरणी आरोपीविरोधात हत्यार कायदा व महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आदित्य राजेंद्र पाटोळे (वय २०, रा. निशांत गार्डन, धात्रक फाटा, नाशिक) असे अटकेत घेतलेल्या आरोपीचे नाव असून, तो करण जनरल स्टोअर, देशमुख वस्ती, म्हसरूळ-आडगाव लिंक रोड या परिसरात संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

गुंडाविरोधी पथकातील पोलीस अंमलदार कल्पेश राजेंद्र जाधव (पोअं २२५५) व पोहवा वसावे, मलंग गुंजाळ यांनी मिळालेल्या माहितीच्या आधारे कारवाई करत त्याला ताब्यात घेतले. तपासणीदरम्यान त्याच्या पॅन्टच्या डाव्या बाजूच्या कमरेस पुढील बाजूस ३०हजार रुपये किमतीचे एक सिल्व्हर रंगाचे देशी बनावटीचे पिस्तूल व १ हजार रुपयांचे एक जिवंत काडतूस सापडले. काडतुसावर KF%.६५ असे लिहिलेले होते. संशयित आदित्य पाटोळे याच्याकडे शस्त्र बाळगण्याचा कोणताही परवाना नसल्याचे निष्पन्न झाले असून, तो पोलीस आयुक्त नाशिक शहर यांनी लागू केलेल्या शस्त्रबंदी आदेशाचा भंग करत होता. याप्रकरणी त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास वपोनि सपकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# वृद्धाला ६ लाख ४७ हजारांचा ऑनलाइन गंडा

## सायबर फसवणूक प्रकरण

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

सायबर गुन्हेगारीच्या साखळीत आणखी एक वृद्ध नागरिक फसवणुकीचा बळी ठरला असून, फसवणूक करणाऱ्यांनी ईमेल आणि इंटरनेटच्या माध्यमातून ६ लाख ४७ हजार ९३७ रुपये उकळल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी मधुकर शंकर चिंचोले (वय ७०, रा. कॉलेज रोड, क्रोमा पाठीमागे, नाशिक) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २० सप्टेंबर २०२४ ते २३ एप्रिल २०२५ या कालावधीत त्यांना roseline-edwards88gmail.com या ईमेलवरून एक महिला संपर्कात आली. तिचे वडील मृत पावल्याचे सांगून, त्यांच्या बँक खात्यातील २ मिलियन डॉलर भारतात ट्रान्सफर करायचे आहेत, यासाठी मदतीची विनंती केली. त्यानंतर hsbcbankingcorporation8gmail.com या ईमेलवरून त्यांचे HSBC बँकेत खाते उघडल्याचे सांगण्यात आले आणि त्या खात्यात ५ मिलियन डॉलर जमा आहेत, असा बनाव करण्यात आला.

या रकमेचा लाभ मिळवून देण्याच्या आमिषाखाली rbibankoffice1gmail.com या ईमेलवरून वेळोवेळी वेगवेगळ्या प्रोसेसिंग फीच्या नावाखाली विविध बँक खात्यांवर पैसे ट्रान्सफर करण्यास भाग पाडले. अखेरीस, एकूण ६ लाख ४७ हजार रुपये ट्रान्सफर करूनही त्यांना कोणतीही रक्कम मिळाली नाही हे लक्षात येताच त्यांनी सायबर पोलीस ठाणे गाठले. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास तपास सायबर सेलचे पोलिस निरीक्षक सुभाष ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# नियमित व्यायाम करा हाच निरोगी राहण्याचा मंत्र : डॉ. तोडकर

**नाशिकरोड : वार्ताहर**

कुठल्याही आजाराला घाबरू नका, आयुष्य परत परत भेटत नाही. प्रत्येक क्षण तणावात, दुःखात घालवण्यापेक्षा हसत-खेळत जीवन जगा, दुसऱ्यांनाही जगवा हाच आयुष्याचा खरा मंत्र आहे. जे रूप देवाने दिले आहे ते स्वीकारा. ते नैसर्गिक रूप आहे, त्याचा आनंदाने उपभोग घ्या हाच आयुष्याचा, औषधाविना आरोग्याचा मंत्र आहे, असे मनोगत प्रसिद्ध आयुर्वेदतज्ज्ञ डॉ. स्वागत तोडकर यांनी केले.



ते पुढे म्हणाले, आळसाचा खून करा आणि व्यायामाचे व्यसन लावा. खाणे एकपट तर व्यायाम दुप्पट ठेवा, विनाकारण एकाकी विचार करू नका, घाबरू नका. व्यायाम केला तरच आपल्याला जेवणाचा अधिकार असला पाहिजे. शरीर प्रकृती धष्टपुष्ट ठेवा. शरीरावर गर्व करा, पैशावर नव्हे. माणसाचे आयुष्य साठवर आलेले आहे. एकमेकांना नावे ठेवू नका. प्रत्येक क्षण आनंदात घालवा. दिलखुलासपणे राहावे. भीतीमुळे अधिक ताणतणाव वाढतो असेही ते म्हणाले. पन्नाशीनंतरच खरे जीवन जगता येते. पन्नाशीनंतर आपल्याला म्हातारे समजू नका. तेव्हा शारीरिक तपासण्याच्या गर्तेत अडकू नका.

# मधुमेह टाळण्यासाठी सकारात्मक जीवनशैली अवलंबावी : डॉ. घोडेराव

**नाशिकरोड : वार्ताहर**

भारत हा जगातील मधुमेहाची राजधानी बनत आहे. हा आजार चोर पावलांनी येतो. तो किडनी आणि डोळ्यांवर हळूहळू परिणाम करतो. काही त्रास होत नसल्याने तो लक्षातही येत नाही. या आजारावर मात करण्यासाठी सातत्याने व्यायाम, नियमित आरोग्य तपासणी, आहार-विहार याकडे लक्ष दिले पाहिजे. सकारात्मक दृष्टिकोनाने जीवन जगले पाहिजे. पाश्चात्यांच्या जीवनशैलीचे अनुकरण न करता भारतीय जीवन शैली अवलंबिली पाहिजे, सकस, संतुलित, पोषक आहार घ्यायला हवा, असे प्रतिपादन मधुमेहतज्ज्ञ डॉ. रेश्मा घोडेराव यांनी केले.



नाशिकरोड देवळाली व्यापारी बँकेतर्फे मनपा शाळा १२५ च्या मैदानावर आयोजित वसंत व्याख्यानमालेत त्यांनी सहावे पुष्प 'सकारात्मक जीवनशैलीची साथ मधुमेह व लठ्ठपणावर करू मात' या विषयावर गुंफले.

त्या पुढे म्हणाल्या, मधुमेह हा हिमनगासारखा आहे. त्याच्याखाली किती बर्फ असते हे कळत नाही. मधुमेहाची नियमित तपासणी करणे आवश्यक असते. एखाद्या आजारासाठी रुग्णालयात दाखल झाल्यावर मधुमेहाचे निदान होते.

# जात-धर्मावर आधारित खाद्यसंस्कृती माणसांवर लादू नये : पाटोळे

**नाशिक : प्रतिनिधी**

अन्न हे अन्न असते, ते शरीराला पोसण्याचे काम करते. मात्र, अलीकडच्या बुवाबाबांनी किंवा काही तथाकथित धर्मवाद्यांनी मांसाहार त्याज्य मानून सर्वसामान्यांच्या आहारात धर्मातील खाद्यसंस्कृती बळजबरीने केली आहे. म्हणून जात-धर्मावर आधारित खाद्यसंस्कृती माणसांवर लादू नये, असे प्रतिपादन शाहू पाटोळे यांनी केले.



वसंत व्याख्यानमाला

नाशिक

गोदाघाटावरील देवमामलेदार यशवंत महाराज पटांगणावर सुरू असलेल्या वसंत व्याख्यानमालेचे आठवे पुष्प गुंफताना गुरवारी (दि. ८) स्व. माधवराव काळे स्मृती व्याख्यानात अन्नात कालविलेला धर्म या विषयावर पाटोळे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर देणगीदार धनंजय काळे, मंडालेश्वर काळे, विजय राऊत, किशोर अहिरे आदी उपस्थित होते.

पाटोळे पुढे म्हणाले की, लोकांनी काय खावे आणि काय खाऊ नये हे सांगणाऱ्यांची एक मोठी टोळी निर्माण झालेली आहे. आता शालेय पोषण आहारामध्येसुद्धा दुधासोबत अंडी देण्यात येतात, मग ते अन्न नाही का? सामान्य माणसांच्या रोजच्या आहारातलं जे अन्न आहे ते सरकार महाग करत आहे. भरडधान्य महाग होत आहे, जी सर्वसामान्य माणसांची होती. अन्नाचा हा एकछत्री अंमल बंद व्हायला पाहिजे. कोणी काय खावे यावर कोणाचेही नियंत्रण नसायला हवे.

ज्यांना जे आवडेल त्यांनी ते खावं. कोणतं अन्न सात्त्विक? कोणतं तामसी? हेसुद्धा कोणी ठरवू नये. शाकाहार करणारे आणि स्वतःला शाकाहारी समजणारे अनेक लोक विचाराने आणि प्रवृत्तीने विक्षिप्त वागत असतात. त्यामुळे सात्त्विक अन्न खाल्ल्यावर माणूस फार सात्त्विक होतो ही भावना चुकीची असल्याचे पाटोळे यांनी यावेळी सांगितले. अलीकडच्या काळामध्ये काही बुवाबाबांचे ऐकून अनेक स्त्रियांनी मांसाहार बंद केले, असेही पाटोळे यांनी यावेळी सांगितले.

प्रमुख मान्यवरांचे स्वागत अध्यक्ष श्रीकांत बेणी यांनी केले. शाहू पाटोळे यांचा परिचय किशोर अहिरे यांनी करून दिला.

सेवानिवृत्त माहिती अधिकारी विजय पवार यांनी पाटोळे यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला.

### आजचे व्याख्यान

स्व. सदूभाऊ मोरे स्मृतिव्याख्यान

१) वरुण सुखराज, लेखक दिग्दर्शक, निर्माता, यांचे नवभारत : जाणिवेची उणीव या विषयावर व्याख्यान होईल.

२) विवेक केळकर प्रस्तुत गीतरामायण

# रेशनकार्डावरून मयतांची नावे हटविणार

## धान्य वितरण विभागाची मोहीम; सहकार्याचे आवाहन

**नाशिक : प्रतिनिधी**

धान्य वितरण विभागाकडून नाशिक तालुक्यातील रेशनकार्डावरील सुमारे १० हजार ३३५ मयतांची नावे हटविण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. मोहिमेच्या यशस्वीतेमुळे रेशनकार्डधारकांना धान्य वाटपात सुसूत्रता येण्यास मदत होणार आहे.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या निर्देशानुसार नाशिक जिल्ह्यातील रेशनकार्ड प्रणालीमधून १० हजार ३३५ मयत लाभार्थ्यांची नावे हटविण्याची विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. ही कारवाई प्रामुख्याने अचूक लाभार्थी ओळख व अपात्र लोकांना अनुदानित धान्य मिळण्यापासून रोखण्याच्या दृष्टीने करण्यात येत आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाच्या माहितीनुसार, विविध स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त मृत्यू प्रमाणपत्रांच्या आधारे ही नावे तपासली जात आहे.



डिजिटल डेटाबेसशी क्रॉस तपासणी करून ही नावे रेशन यादीतून हटवली जाणार आहेत. मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांनी जर अजूनही मयत व्यक्तीच्या नावावर रेशन घेतले असेल तर संबंधित कार्डधारकांविरोधात कारवाई केली जाऊ शकते.

हटविलेली नावे संबंधित कार्डावरून काढून टाकल्यानंतर उर्वरित सदस्यांचे रेशनकार्ड अद्ययावत करण्यात येणार आहे. भविष्यात अशा चुका टाळण्यासाठी, मृत्यू नोंदणी आणि रेशनकार्ड यंत्रणा यांचे समन्वय वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

नाशिक तालुक्यातील रेशनकार्डधारकांनी धान्य वितरण विभागास सहकार्य करावे.

शिधापत्रिकांची ज्या रेशन दुकानात नोंद असेल त्या ठिकाणी मयत व्यक्तीची कागदपत्रे सादर करावीत. रेशनकार्ड अद्ययावत करून घ्यावे, अशा सूचना धान्य वितरण कार्यालयाकडून देण्यात आल्या आहेत.

> मृत व्यक्तींच्या नावाची माहिती लवकरात लवकर स्थानिक रेशन कार्यालयात सादर करावी, जेणेकरून सरकारी धान्याचा अपव्यय टाळता येईल. रेशनकार्ड अद्ययावत होणार आहे.
>
> – **गणेश जाधव,** धान्य वितरण अधिकारी, नाशिक

# दिंडोरी, सुरगाण्यात अवकाळी पावसाचा कहर

## वीजपुरवठा खंडित, घरांचे पत्रे उडाले, पिकांचे नुकसान; भरपाईची मागणी

**दिंडोरी : प्रतिनिधी**

दिंडोरी तालुक्यासह सुरगाणा, पेठ येथे वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाच्या जोरदार हजेरीने शेतकऱ्यांची तारांबळ उडाली. गेल्या महिनाभरापासून उन्हामुळे हैराण झालेल्या नागरिकांना अवकाळी पावसाने हवेत गारवा निर्माण झाल्याने काहीसा दिलासा मिळाला. मात्र, वादळासह पावसामुळे घरावरील पत्रे, कौले उडाली, तर विद्युत तारा, खांब, झाडे कोसळली तर अनेक गावांत वीजपुरवठा खंडित झाल्याने गावात अंधाराचे साम्राज्य पसरले होते. ठेपणपाडा, ननाशी, कोकणगाव बुद्रुक, नळवाडपाडा येथे पिकांचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे पंचनामा करून नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी पीडित शेतकऱ्यांनी केली आहे.

**शेतकऱ्यांमध्ये मोठी निराशा**

पांडाणे : हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजाप्रमाणे दिंडोरी तालुक्यात हजेरी लावून पिकांचे अतोनात नुकसान झाले. वणी, अंबानेर, सागपाडा, पांडाणे, पुणेगाव, माळेदुमाला, पिंप्रीअंचला, हस्ते, कोल्हेर, खोरीपाडा, चौसाळे करंजखेड, एकलहरे, कोशिंबे, चंडीकापूर, मांदाणे, अहिवंतवाडी परिसरात सलग दोन दिवस वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. नागरिकांची उकाड्यापासून सुटका झाली, तरी संपूर्ण वर्षभराचे अर्थकारण अवकाळीच्या पाण्यात भिजले. नगदी पीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांची मोठी निराशा झाल्याने सर्वत्र चिंतेचे वातावरण आहे. त्यातच मार्केटमध्ये कांद्याची ३३६ ट्रॅक्टर, ११९ पिकअप इतकी विक्रमी आवक होऊन बाजारभावात काहीशी पडझड झाल्याचे दिसत होते. त्यावेळी कांद्याला किमान ८१० रुपये, तर कमाल १५९० आणि सरासरी ११८० व गोल्टीला किमान ३५० रुपये, तर कमाल १०८० आणि सरासरी ७१० रुपये दर मिळाला. वादळामुळे 'अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या विजेच्या खांबावर पडल्याने बत्ती गुल झाली तर काही ठिकाणी छतावरील पत्रे उडाल्याने नागरिकांची चांगलीच तारांबळ झाली. काढणीला येऊन मजुरांअभावी शेतातच असलेले कांदापीक मोठ्या प्रमाणात खराब होण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत आहेत.

**बाऱ्हे :** सुरगाणा तालुक्यात काल सकाळपासून ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. ज्यामुळे उष्णतेची तीव्रता काहीशी कमी झाली होती. मात्र, सायंकाळी चारच्या सुमारास गोंदुणे, उंबरठाण, सुरगाणा, वांगणसुळे, बाऱ्हे, आळीबंदाड, माणी व बोरगाव घाटमाथा परिसरात वादळी वाऱ्यांसह विजांच्या कडकडाटात जवळपास अर्धा तास जोरदार पाऊस झाला.

तालुक्यातील खिर्डी येथे वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याने एका घराची पडझड झाली. आळीबंदाड येथील जिल्हा परिषद शाळेचे वादळी वाऱ्याने पत्रे उडाली. विद्यार्थ्यांना सुट्या असल्याने मोठा अनर्थ टळला. या वादळी पावसामुळे काही ठिकाणी आंब्याची झाडे कोसळून पडली. विक्रीसाठी तयार झालेला आंबा पडल्याने अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

**नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी**

**वांगणसुळे :** सुरगाणा तालुक्यात सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. वांगणसुळे, पळसन, उबरठाण, सुरगाणा, मनखेड, माणी, खोकरी, जांभूळपाडा, जाहुले, बोरगाव, मोहपाडा, सराड भागात वादळी वारा व विजांच्या कडकडाटासह जवळपास अर्धा तास जोरदार सरी कोसळल्या. येथील चिंतामण रामा धूम यांच्या शेतातील घराचे पत्रे वादळी वाऱ्यामुळे उडाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले. येथील राजाराम काळू टोपले, धनसराम काळू टोपले व भोरमाळ येथील रंजना मोहन बोरशे यांच्या घराचे पत्रे व कौले उडाली. शेतकऱ्यांनी शेतामध्ये कापून ठेवलेला गहू व जनावरांना साठवून ठेवलेल्या चारा झाकण्यासाठी लगबग सुरू होती. या पावसामुळे आंब्याचे मोठे नुकसान होणार आहे. तालुक्यातील एकनाथ लक्ष्मण टोपले, नारायण पांडू सातपुते, चंदर लक्ष्मण टोपले, नारायण पांडू सातपुते, केशव सातपुते, मोहन चौधरी, माधव धूम, वसंत टोपले आदी आंबा उत्पादकांचे नुकसान झाले. त्यामुळे नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करून भरपाईची मागणी होत आहे.



## चांदवड तालुक्यात १५८४ शेतकऱ्यांचे नुकसान

**चांदवड : वार्ताहर**

तालुक्यात बुधवारी सलग दुसऱ्या दिवशी वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. या अवकाळी पावसामुळे १२ गावांतील तब्बल १५८४ शेतकऱ्यांचे नुकसान झाले. दोन दिवसांत १३९.७० हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती तालुका कृषी अधिकाऱ्यांनी दिली.

तालुका कृषी अधिकाऱ्यांनी नुकसानीचा प्राथमिक अहवाल चांदवडचे तहसीलदार मंदार कुलकर्णी आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे सादर केला आहे. या अहवालानुसार, अतिवृष्टीमुळे सर्वाधिक फटका कांदा बियाणांना (डोंगळे) बसला आहे. तब्बल ८५ हेक्टर क्षेत्रातील डोंगळे खराब झाले आहेत. यासोबतच, २५ हेक्टर क्षेत्रातील कांदापीक, ३ हेक्टर क्षेत्रातील द्राक्षबाग, २० हेक्टर क्षेत्रातील भाजीपाला आणि ६.७० हेक्टर क्षेत्रातील डाळिंबबागांचेही मोठे नुकसान झाले आहे. तहसील प्रशासनाकडून या नुकसानीचा प्राथमिक अंदाज जिल्हा प्रशासनाला पाठवला आहे. दरम्यान, मंगळवारी (दि. ६) झालेल्या गारपीट आणि वादळी पावसामुळे चांदवड तालुक्याच्या दक्षिण पूर्व भागातील १३ गावांमधील १२ घरांची अंशतः पडझड झाली आहे. कानमंडाळे, रेडगाव, नारायणगाव, दह्याणे, हरनूल, कोकणखेडे, खडकांच, बहादुरी, पिंपळणारे या गावांना या वादळाचा फटका बसला. या गावांमध्ये १२ घरांचे मोठे नुकसान झाले, तर गंगावे येथे एका पोल्ट्री शेडचेही नुकसान झाले आहे. पंचनामे करून नुकसानभरपाईची मागणी केली आहे. जोरदार गारपिटीमुळे डोंगळे पिकांसह इतर पिकांचेही मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीची पाहणी बुधवारी (दि. ७) चांदवडचे तहसीलदार मंदार कुलकर्णी, भाजपा तालुकाध्यक्ष मनोज शिंदे, तालुका कृषी अधिकारी नीलेश मावळे, डॉ. नितीन गांगुर्डे, पिंटू भोईटे आदींनी केली.

**नुकसानभरपाईची मागणी**

चांदवड तालुक्यात गारपिटीने मोठे नुकसान झाले असले तरी, शासनाकडून पंचनामे करण्याचे कोणतेही आदेश अद्याप आलेले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांनी शासनाला तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश देऊन नुकसानभरपाई जाहीर करण्याची मागणी केली आहे.

## मुक्त विद्यापीठाचे विशाखा पुरस्कार जाहीर

**नाशिक : प्रतिनिधी**





यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने 'विशाखा काव्य पुरस्कार - २०२४' जाहीर करण्यात आले आहेत. त्यानुसार 'तुझं शहर हजारो मैलांवर' या कवयित्री सुनीता डागा (रा. वडगाव शेरी, जि. पुणे) यांच्या काव्यसंग्रहाची प्रथम क्रमांकाच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. द्वितीय व तृतीय क्रमांकाचा पुरस्कार अनुक्रमे 'माती मागतेय पेनकिलर' (कवी सागर जाधव जोपुळकर, रा. चांदवड, जि. नाशिक) व 'दंगल होतेच कशी?' (कवी गौतम राजू ढोके, रा. बडनेरा, जि. अमरावती) यांच्या काव्यसंग्रहाला जाहीर झाला आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने दरवर्षी नवोदित कवींच्या प्रथमतःच प्रकाशित काव्यसंग्रहाला 'विशाखा काव्य पुरस्कार' दिला जातो. सन २०२४ च्या विशाखा काव्य पुरस्कारासाठी विद्यापीठास एकूण २७ काव्यसंग्रह प्राप्त झाले होते. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखालील गठित समित्यांनी ही द्विस्तरीय निवडप्रक्रिया पार पाडली. त्यानुसार प्राथमिक छाननी समितीने अंतिम निवडीसाठी नऊ काव्यसंग्रह निवडून दिले तर अंतिम निवड समितीने त्यातून पुरस्कारांसाठी निवड केली. या निवडप्रक्रियेचे समन्वयक म्हणून कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी काम पाहिले.

अंतिम निवड समिती सदस्य म्हणून डॉ. नंदकुमार मोरे (कोल्हापूर), प्रवीण दशरथ बांदेकर (सावंतवाडी), डॉ. प्रज्ञा दया पवार (ठाणे) यांनी काम पाहिले. या विजेत्या पुरस्कारार्थींचे विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. डॉ. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव दिलीप भरड यांनी अभिनंदन केले आहे. या विशाखा काव्य पुरस्कार - २०२४ तसेच मागील घोषित झालेल्या विशाखा काव्य पुरस्कारांचा एकत्रित वितरण समारंभ विद्यापीठाच्या एखाद्या विभागीय केंद्रावर लवकरच समारंभपूर्वक करण्यात येणार आहे.

## 'जीवन के रंग सुखी के संग' इंदोलीकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**नाशिक : प्रतिनिधी**



येथील विस्डम हायस्कूलच्या हिंदी शिक्षिका सुखदा इंदोलीकर यांच्या 'जीवन के रंग सुखी के संग' या पुस्तकाचे प्रकाशन विस्डम हायस्कूलमध्ये नुकतेच झाले. विस्डम हायस्कूलच्या संचालक वर्षा माहोरे, नीलोफर लथ, प्रीती जोशी, सुचेता कुलकर्णी यांच्या हस्ते हे प्रकाशन झाले.

प्रकाशनाबाबत इंदोलीकर म्हणाल्या, की माझ्या पहिल्या काव्यसंग्रहित पुस्तकात जीवनातील असलेले विविध रंग, विविध छटा साध्या सरळ शब्दांमध्ये उतरविण्याचा प्रयत्न केला आहे. याचा अनुभव 'जीवन के रंग सुखी के संग' या पुस्तकातील कविता वाचताना नक्कीच येईल. रितू अगरवाल व मनीष अगरवाल यांचे मार्गदर्शन लाभल्याचे इंदोलीकर यांनी सांगितले.

प्रिन्सिपल दीपक बोरले, व्हाइस प्रिन्सिपल गॉविन फर्नांडिस उपस्थित होते. सुखदा इंदोलीकर यांना यापूर्वी हिंदी काव्यरत्न मानद पदवी (शब्द प्रतिभा बहु-प्रादेशिक सन्मान प्रतिष्ठान, नेपाळ द्वारा), निराला काव्यरत्न पुरस्कार, विचारक्रांती कवितारत्न पुरस्कार, विचारक्रांती प्रेरणारत्न पुरस्कार, लुंबिनी, नेपाळ येथून हिंदी आयडॉल आणि काव्य शिरोमणी पुरस्कार मिळाले आहेत.

विचारक्रांती संस्थेने विनोदी कवितेसाठी त्यांना तिसरे पारितोषिक प्रदान केले आहे. काव्यरचना साहित्यासोबतच सुखदा इंदोलीकर या आदर्श शिक्षिका आहेत.

कवयित्री सुखदा इंदोलीकर यांच्या 'जीवन के रंग सुखी के संग' या पुस्तकाचे प्रकाशन करताना विस्डम हायस्कूलच्या डायरेक्टर वर्षा माहोरे, निलुफर लुथ, प्रीती जोशी, सुचेता कुलकर्णी आणि सुखदा इंदोलीकर.

## इगतपुरी तालुक्यात पावसामुळे दाणादाण

**मुकणे : प्रतिनिधी**

इगतपुरी तालुक्यात मंगळवारी (दि. ६) रात्री नऊच्या सुमारास व बुधवारी (दि. ७) वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने कहर केला. वादळी वाऱ्यासह पावसाने नागरिकांची तारांबळ उडाली. घोटी शहरासह तालुक्यात ठिकठिकाणी गारांसह पावसाने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. तालुक्यातील मुकणे, पाडळी देशमुख, टाकेद, खेड, वाडीवऱ्हे, मोडाळे, कुशेगाव, काळुस्ते, भरवज, निरपण, कांचनगाव, आधरवड, मयदारा, खैरगाव परिसरातही तासभर हजेरी लावली. या बेमोसमी पाऊस व गारांमुळे शेतकरी हवालदिल झाले. शेतमालाला कवडीमोल भाव त्यातच अस्मानी संकटाला तोंड देताना हातातोंडाशी आलेला घास हिसकावल्याने शेतकरीवर्ग मोठ्या संकटात सापडला. तालुक्यातील मुख्य बाजारपेठ असलेल्या घोटी शहरात सायंकाळी सहाच्या सुमारास वादळी पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. बऱ्याच ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला होता.

## वडांगळी विद्यालयात हर्षदा सांगळे प्रथम



**निफाड :** तामसवाडी येथील प्रगतशील शेतकरी गोरख सांगळे यांची मुलगी हर्षदा गोरक्षनाथ सांगळे हिने वडांगळी येथील न्यू इंग्लिश स्कूल कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक मिळविला. दहावीनंतर ती दररोज सायकलवर वडांगळी येथे शिक्षणासाठी ये-जा करीत होती. बारावी विज्ञान शाखेत हर्षदाने ७३.५९ टक्के गुण मिळवत महाविद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे.

## संक्षिप्त



### 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वितेबद्दल येवल्यात जल्लोष

**येवला :** भारतीय सैन्यांनी ऑपरेशन सिंदूर यशस्वी राबवून दहशतवाद्यांचा खात्मा केल्याबद्दल येवला शहरात विविध पक्ष -संघटनांतर्फे फटाक्यांची आतषबाजी करीत जल्लोष केला. शहरातील विंचूर रोड चौफुली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर भारतीय सैनिकांचा विजय असो, अशा घोषणा देत भारत सरकारचे अभिनंदन केले. ऑपरेशन सिंदूर यशस्वीरीत्या राबवल्याबद्दल भारतीय सैन्याचा व सरकारचा उत्साह वाढवण्यासाठी येवला व्यापारी महासंघातर्फे खांबेकर खुंटावर आनंदोत्सव साजरा केला. व्यापारी संघाचे योगेश सोनवणे, भाजपचे आनंद शिंदे, प्रमोद सस्कर, धीरज परदेशी, संजय कुक्कर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, माजी सैनिकांतर्फे शहरातील विंचूर रोड चौफुलीवर जल्लोष केला. माजी सैनिकांनी एकत्र येत येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. शासनाने ऑपरेशन सिंदूर यशस्वी केल्याबद्दल भारतीय सैनिकांसह केंद्र सरकारचे आभार मानले. शासनाने माजी सैनिकांना युद्धासाठी बोलवले तर येण्यास तयार आहोत, अशी प्रतिक्रिया माजी सैनिकांनी दिली.

### आगामी काळात राजकारण तापणार

**दिंडोरी :** स्थानिक स्वराज्य निवडणुका घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिल्याने जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत इच्छुक आता सक्रिय झाले आहेत. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांचे राजकारण तापण्याची चिन्हं दिसू लागली आहे. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या माध्यमातून जनहिताची कामे करणाऱ्यांसाठी मोठी संधी मिळते. पाणीयोजनांबरोबर रस्ते, आरोग्य, शिक्षण या सर्व गोष्टी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून राबविल्या जातात. सामान्य जनतेचे प्रश्न जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या माध्यमातून मार्गी लावले जातात. शासनाच्या आणि जनतेच्या मधील एक महत्त्वाचा दुवा म्हणून जिल्हा परिषद व पंचायत समितीकडे पाहिले जाते. अशा वेळी या ठिकाणी थेट जनतेचा संबंध येत असल्याने या संस्थेत जाण्यासाठी अनेक इच्छुक असतात. गेल्या दोन वर्षांपासून ओबीसी आरक्षण प्रश्नामुळे या निवडणुका लांबल्या होत्या. परंतु, आता उच्च न्यायालयाने चार महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याचे आदेश दिल्याने दिंडोरी व पेठ तालुक्यात इच्छुकांनी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट), भाजप, काँग्रेस, रिपाइं, मनसे, बहुजन समाज पक्ष आदी पक्ष सक्रिय झाले आहेत. सध्या जनतेमधील जागरुकता पाहता केवळ राजकारण करणाऱ्यांना जनता दूर ठेवेल, त्यामुळे निवडणुकीनंतर अधिक परिवर्तन दिसून येईल, अशी शक्यता आहे. सर्वच पक्षप्रमुखांची प्रतिष्ठा पणाला लागल्याने सर्व कामाला लागल्याचे चित्र दिसत आहे.

## निधन वार्ता

### आकाशसिंह चौहान



**नाशिक :** पंचवटी येथील आकाशसिंह चौहान (३४) यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ, वहिनी, वडील असा परिवार आहे. मार्केट यार्ड येथील एस. एस. ट्रान्स्पोर्टचे संचालक सुरेशसिंह चौहान यांचे ते मोठे चिरंजीव होत.

### यादवराव निकम



**इंदिरानगर :** नाशिक येथील रहिवासी यादवराव रामचंद्र निकम (९०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे. नाशिक महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी प्रशांत यादवराव निकम यांचे ते वडील होत.

## 'स्वामी मुक्तानंद'चे तिघे संस्कृतमध्ये राज्यात प्रथम





**येवला : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे बारावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. शहरातील श्री गुरुदेव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित स्वामी मुक्तानंद उच्च माध्यमिक विद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांनी संस्कृत विषयात १००पैकी १००गुण मिळवून राज्यात प्रथम क्रमांक पटकावला.

कला विभागातील विद्यार्थिनी स्नेहा राजू मैले (९१.५० टक्के) जिल्ह्यात प्रथम, विज्ञान विभागात तन्वी विक्रांत मेहतर (९४.८३ टक्के) तालुक्यातील सर्व केंद्रातून प्रथम आली. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे व पालकांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. अमृत पहिलवान, उपाध्यक्ष डॉ. किरण पहिलवान, सचिव सुधांशु खानापुरे, सहसचिव सचिन एंडाईत, खजिनदार तेजस गायकवाड, संचालक दीपक गायकवाड, संजय नागडेकर, शशिकलाताई फणसे, प्रवीण नागडेकर, प्राचार्य एम. टी. कदम, उपप्राचार्य अंबादास ढोले, अरुण विभूते आदींनी अभिनंदन केले.

**शाखानिहाय निकाल**

विज्ञान विभागात तन्वी विक्रांत मेहतर (९४.८३%) तालुक्यात प्रथम, समृद्ध रवींद्र मोकळ (८८.५०) द्वितीय, सिद्धी विजय कुक्कर(८८.३३) तृतीय, तन्वी सुनील कोकणे (८८.३३) तृतीय. कला विभागात स्नेहा राजू मैले (९१.५०) जिल्ह्यात प्रथम, प्रेक्षा अर्जुन लोणारी (८२.६७) द्वितीय, ललिता दत्तू गायकवाड (७९.१७) तृतीय. वाणिज्य विभागात गोकुळ मुक्ताराम देवरे (८४.३३) प्रथम, वैष्णवी संतोष बागल (८२.३३) द्वितीय, आस्मा सलीम पठाण (८१.३३) तृतीय. संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत राज्यात स्नेहा राजू मैले, विक्रांत मेहतर, साईतेज जितेंद्र कऱ्हेकर हे प्रथम आले.

व्यवसाय शिक्षण विभागातील सीएमएलटीमध्ये कावेरी सचिन निकम ८०.६७ टक्के, उमेमा अखलाख अन्सारी- ७८ टक्के. ऑटोमोबाइल टेक्नॉलॉजीमध्ये तेजस विठ्ठल तिपायले ६९.१७ टक्के, आदित्य पुंडलीक पिंपळे ६८ टक्के. इलेक्ट्रॉनिक्समध्ये सुमेध अनिल वाघ ६६.१७ टक्के, प्रणव तुळशीराम पाठे - ६३-५० टक्के. कॉम्प्युटर टेक्नॉलॉजीमध्ये दर्शन नारायण गंभीर- ७० टक्के. रवींद्र गोरख गायकवाड ६७-१७ टक्के गुण मिळवून प्रथम व द्वितीय आले.

## मानेंसारखे नेतृत्व तयार होणे गरजेचे : कराड

### सातपूरला राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा

**नाशिक : प्रतिनिधी**

राज्य व केंद्र सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगारांसाठी तयार केलेले कायदे अचानकपणे संपुष्टात आणले. छोट्या-मोठ्या कारखान्यांतील कामगार संपवला. त्यामुळे आता कामगार नेत्यांनीच कामगारांचे अस्तित्व टिकवण्यासाठी दिवंगत कामगार नेते व खासदार मुरलीधर माने यांच्यासारखे नेतृत्व तयार होऊन महापालिका, विधानसभा निवडणुका जिंकाव्यात. कामगारांचे प्रतिनिधित्व करावे, असे प्रतिपादन सीटू कामगार संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष व राज्य अध्यक्ष डॉ. डी. एल. कराड यांनी केले.




**सातपूर : गुणवंत कामगार कल्याण परिषद आयोजित रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे पुरस्काराचे मानकरी विकास नेहे, अनिल मंडलिक, सोपान शहाणे, संगीता फुके, रवींद्र गोजरेंसह डॉ. डी. एल. कराड, अध्यक्ष देवराम सैंदाणे, दीपक पाटील, समाधान देवरे आदी.**

सातपूर येथील मौले हॉल सभागृहात गुणवंत कामगार कल्याण परिषदेने आयोजित केलेल्या भारतीय कामगार चळवळीचे जनक रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे राज्यस्तरीय-२०२५ प्रथम पुरस्कार वितरण सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुणवंत कामगार कल्याण परिषदेचे अध्यक्ष देवराम सैंदाणे होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी दीपक पाटील, रायगड प्रतिष्ठानचे अध्यक्ष समाधान देवरे, गुणवंत कामगार परिषदेचे कार्याध्यक्ष विलास गोडसे, उपाध्यक्ष सुनील अवसरकर, सरचिटणीस पोपटराव देवरे, खजिनदार प्रशांत कापसे, सहसचिव संजीव अहिरे, सहखजिनदार योगेश कापडणीस, सदस्य संजय पवार आदी होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे राज्यस्तरीय पुरस्कार महिंद्रा अँड महिंद्रा कामगार संघटनेचे माजी सरचिटणीस सोपान शहाणे, ओझर येथील एचएएल कामगार संघटनेचे अध्यक्ष अनिल मंडलिक, मायको बॉस कामगार संघटनेचे अध्यक्ष विकास नेहे, आयएसपी स्टाफ युनियनचे जनरल सेक्रेटरी राहुल रामराजे यांनी पुरस्कार स्वीकारला. राज्य परिवहन महामंडळाच्या वरिष्ठ लिपिक संगीता फुके यांना प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप, सन्मानचिन्ह, महावस्त्र, पुष्पगुच्छ होते. यावेळी प्रमुख पाहुणे दीपक पाटील, समाधान देवरे आदींची भाषणे झाली.

पुरस्कारार्थी सोपान शहाणे, अनिल मंडलिक, राहुल रामराजे, विकास नेहे, संगीता फुके यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास महिंद्रा अँड महिंद्रा, मायको, एचएएल, नोट प्रेस व परिवहन महामंडळ आणि सर्व कंपन्यांचे उच्च पदाधिकारी व सीटू कामगार संघटनेचे विविध कारखान्यांतील कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोपटराव देवरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रशांत कापसे यांनी केले. विलास गोडसे यांनी आभार मानले.

## महत्त्वाचे

### महिला कामगाराचा मृत्यू

**सिन्नर :** माळेगाव एमआयडीसीमधील मिनी इलास्टोमर या कारखान्यात काम करीत असताना मोल्डिंग मशीनचा डोक्याखाली कानाला मार लागून गंभीर जखमी झालेल्या परप्रांतीय १९ वर्षीय युवतीचा मृत्यू झाला. पूजा राजू रावत (१९, रा. कुबरी, जि. सिंधी, हल्ली रा. माळेगाव) असे मृत महिला कामगाराचे नाव आहे. पूजा तिची बहीण व चुलत्यांसोबत कारखान्यात काम करीत असताना मोल्डिंग मशीनचा मार डोक्याखाली कानाला लागून कानातून रक्तस्राव होऊ लागला. तिला तातडीने सिन्नर व नाशिक येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, तिचा मृत्यू झाला. सिन्नर नगरपरिषद रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. हवालदार योगेश शिंदे अधिक तपास करीत आहेत.

### ट्रक उलटून एकाचा मृत्यू

**सिन्नर :** नांदूरशिंगोटे-चास रस्त्यावर ट्रक उलटून झालेल्या अपघातात ४३ वर्षीय इसमाचा मृत्यू झाल्याची घडली. चास खिंडीत सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास ट्रक उलटून सदर अपघात झाला. भाऊसाहेब केशव भांगरे (४३, रा. धामणगाव आवारी, ता. अकोले, जि. अ. नगर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. चालक मयूर धुमाळ आणि भांगरे ट्रकमधून जात असतांना ट्रक रस्त्याच्या कडेला नालीमध्ये उलटली. या अपघातात भांगरे यांचा मृत्यू झाला. तर मयूर धुमाळ गंभीर जखमी झाले. याप्रकरणी वावी पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली आहे. हवालदार अजय महाजन अधिक तपास करीत आहेत.

### ठाणगावला महाआरोग्य शिबिर

**ठाणगाव :** स्वराज्याचे दुसरे छत्रपती, स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त ठाणगाव येथील जनसेवा सेवाभावी संस्थेच्या वतीने बुधवारी (दि.१४) महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष रामदास भोर यांनी दिली. सकाळी ९ वाजता गावातील मारुती मंदिरात जयंती उत्सव साजरा करण्यात येणार असून, त्यानंतर सकाळी १० वाजता संताजी मंगल कार्यालयात चिंचोली येथील सिंधुताई विखेपाटील मेमोरियल हॉस्पिटलच्या सहयोगाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात विविध आजारांची मोफत तपासणी करण्यात येणार असून, औषधोपचार व वैद्यकीय सल्ला देण्यात येईल. गरजूंनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जनसेवा संस्थेचे आधारस्तंभ मुकुंद काकड, संस्थापक अध्यक्ष रामदास भोर, मोहन आव्हाड, विलास मोरे, वसंत आव्हाड, सचिन रायजादे आदींनी केले आहे.



### वडगाव-पिंगळा येथे यात्रा उत्साहात

**सिन्नर :** तालुक्यातील वडगाव पिंगळा येथे ग्रामदैवत बजरंग बली यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यात्रोत्सवानिमित्त मंदिर परिसरात स्वच्छता करून मंदिराला विद्युत रोषणाई करण्यात आली होती.
सामाजिक कार्यकर्ते अजय सुभाष हुल्ळूळे यांच्या हस्ते रथाची पूजा करून मिरवणुकीस प्रारंभ झाला. मधुकर धोंडीबा हुल्ळूळे यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. मधुकर सुखदेव विंचू यांच्या हस्ते मानाच्या काठीचे पूजन करण्यात आले. रथाच्या दुसऱ्या जोडीचा मान माणिक रंगनाथ सानप यांना तर नारळ फोडण्याचा मान शंकर दादा सानप यांना भेटला. यात्रोत्सवाचे औचित्य साधून आकाश शिंदे यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला. यावेळी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. यात्रोत्सव यशस्वीतेसाठी यात्रा कमिटीसह ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

### पाण्याची व्यवस्था करण्याची मागणी

**सिन्नर :** सिन्नर बसस्थानकात तहानलेल्या प्रवाशांना ऐन मे महिन्याच्या उन्हाळ्यात तापमानाचा पारा ४२/४३ अंशांवर पोहोचलेला असताना महामंडळाने बारमाही केलेल्या प्लास्टिकच्या टाकीतील गरम पाणी प्यावे लागते. त्यामुळे प्रवाशांना शुद्ध व थंड पाण्याच्या व्यवस्था करण्यासाठी एस.टी. महामंडळाने बसस्थानकात तातडीने वॉटर फिल्टर बसवावे, अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी शहराध्यक्ष कोतवाल यांनी केली आहे. दरम्यान, याबाबत आगारप्रमुख नेरकर यांच्याशी संपर्क साधला असता आम्ही याबाबत वरिष्ठांकडे पाठपुरावा करत असल्याचे सांगत शहरातील सामाजिक संस्थांनी अथवा दातृत्ववान व्यक्तींनी याबाबत पुढे आले तर स्वागतार्ह आहे असे सांगितले. एसटीचे आर्थिक उत्पन्न वाढावे म्हणून शासनाने महिलांसाठी ५० टक्के प्रवासात तिकीट सवलत दिली. मात्र, प्रत्यक्षात प्रवाशांना सोयीसुविधा पुरविण्यात प्रशासन अपयशी ठरले. दूरदूरहून आलेल्या प्रवाशांना आणि दिवसभर प्रवासात असलेल्या बस कर्मचाऱ्यांसाठी ही अत्यंत गैरसोयीची बाब आहे. त्यासाठी पर्यायी व्यवस्था महामंडळाने केलेली नसल्याने नागरिकांत संताप व्यक्त केला जात आहे.

# सर्व्हर डाऊनमुळे इंधन पुरवठा ठप्प; वेबसाइट हॅकची चर्चा

## वाहनधारकांची गैरसोय होण्याची शक्यता, तांत्रिक दुरुस्तीचे प्रयत्न सुरू

**मनमाड : प्रतिनिधी**

**मनमाडच्या पानेवाडीत असलेल्या हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीच्या प्रकल्पातून राज्यातील पेट्रोलपंपांवर केला जाणारा इंधन पुरवठा ठप्प झाला आहे. कालपासून सर्व्हर डाऊन असल्यामुळे इंधन पुरवठा ठप्प झाला असल्याचे कंपनीच्या वतीने सांगितले जात आहे. कंपनीची वेबसाइट हॅक झाल्याचीदेखील चर्चा होती. मात्र, याला अधिकृत दुजोरा मिळाला नाही. यामुळे खरोखरच वेबसाइट हॅक झाली की सर्व्हर डाऊन आहे, हे समजू शकले नाही. मात्र, या सर्व प्रकारामुळे हिंदुस्थान पेट्रोलियमच्या पेट्रोलपंपांवर इंधन पुरवठा ठप्प झाला होता.**



याबाबत सविस्तर वृत्त असे की, मनमाडच्या पानेवाडीत असलेल्या हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीच्या प्रकल्पातून राज्यात वेगवेगळ्या भागातील पेट्रोलपंपांवर टँकरच्या माध्यमातून केला जाणारा इंधन पुरवठा ठप्प झाला आहे. कालपासून सर्व्हर डाऊन असल्यामुळे इंधन पुरवठा खंडित झाला आहे.

मात्र, कंपनीच्या वेबसाइटला हॅक केल्याची जोरदार चर्चा सुरू होती. मात्र, याला अधिकृत दुजोरा नसल्याने नेमका काय प्रकार आहे हे समजू शकले नाही.

पानेवाडीच्या प्रकल्पातून रोज सुमारे ३५० टँकरच्या माध्यमातून पेट्रोलपंपांवर पेट्रोल, डिझेल पुरवठा केला जातो. मात्र, इंधन पुरवठा होत नसल्यामुळे अनेक पंप ड्राय झाले तर काही ड्राय होण्याच्या मार्गांवर आहे.

कंपनीतर्फे युद्धपातळीवर सर्व्हर सुरू करण्याचे काम सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली. भारत पेट्रोलियम आणि इंडियन ऑइल कंपनीच्या प्रकल्पातून इंधन पुरवठा सुरळीतपणे सुरू आहे.

# जागेच्या पाहणीसाठी एमआयडीसीचे अधिकारी कोपरगावात

## बेरोजगार युवकांच्या आशा पल्लवित

**वावी : वार्ताहर**

मतदारसंघातील बेरोजगार तरुणाईला मतदारसंघातच रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी कोपरगाव शहरात एमआयडीसी व्हावी यासाठी आ. आशुतोष काळेंचा पाठपुरावा सुरू आहे. त्याबाबत कोपरगाव शहरातील जागेच्या पाहणीसाठी एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली.

कोपरगाव मतदारसंघाच्या विकासाला आकार देणाऱ्या आ. आशुतोष काळे यांनी मतदारसंघातील जनतेला दिलेल्या विकासकामांच्या वचनाबरोबरच बेरोजगारीचा प्रश्न कायमचा निकाली काढण्यासाठी मतदारसंघात एमआयडीसी उभारणार असल्याचे सांगितले होते. दिलेला शब्द पूर्ण करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या सहकार्यातून त्यांचा अविरतपणे पाठपुरावा सुरू आहे. मागील वर्षी दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर सावळीविहिर-सोनेवाडी शिवारात



शिर्डी एमआयडीसी व डिफेन्स क्लस्टरचा भूमिपूजन समारंभ महसूलमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व उद्योगमंत्री ना. उदय सामंत यांच्या हस्ते संपन्न झाला होता.

# पांगरी येथील राष्ट्रीय पेयजल योजनेतील गैरकारभाराची चौकशी करा

## पाणीपुरवठा मुख्य कार्यकारी अभियंत्यांना निवेदन

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील पांगरी बुद्रुक गावासाठी पंचाळे येथून राबविण्यात आलेल्या राष्ट्रीय पेयजल योजनेतील गैरकारभाराची पारदर्शक चौकशी करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब बैरागी यांनी जिल्हा परिषद पाणीपुरवठा मुख्य कार्यकारी अभियंता यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

पांगरी बुद्रुक गावासाठी पंचाळे येथून राबविण्यात आलेल्या राष्ट्रीय पेयजल योजनेतील कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून, यासंदर्भात वारंवार जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडे तक्रारी करुनही पारदर्शक चौकशी होत नाही. चौकशीसाठी आलेले अधिकारी पेयजल योजनेतील गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी, पदाधिकारी व ठेकेदार यांना वाचवण्यासाठी पारदर्शक चौकशी न करता खोटे आहवाल सादर करून शासनाची फसवणूक करत आहेत. राष्ट्रीय पेयजल योजनेतील उद्‌भव विहिरीचे काम अपूर्ण आहे. स्टेंज गॅलरीचे काम न करताच ३,८४,००० रुपये काढून घेण्यात आले, पाइपलाइनचे काम हे शासकीय नियमानुसार न करता शेता-शेतातून केलेले आहे. त्यामुळे योजनेला कायमच गळती लागली असते.

विहिरीचा स्रोत व पाणी आरक्षित न करताच पेयजल योजनेचे काम केलेले आहे. योजनेतील गैरव्यवहारामुळे गेल्या दहा वर्षांपासून पांगरी बुद्रुक गावातील नागरिकांना पिण्यासाठी पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यामुळे या योजनेतील गैरकारभाराची पारदर्शक चौकशी करावी, अन्यथा सोमवार (दि.१९) पासून पंचाळेतील डांबर नाला येथे राष्ट्रीय पेयजल योजनेच्या कोरड्या उद्‌भव विहिरीत आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा बैरागी यांनी दिला आहे.

# 'ऑपरेशन सिंदूर' भारताच्या धैर्याचे प्रतीक : आ. काळे

**वावी : वार्ताहर**

पहलगाम येथे पर्यटकांवर करण्यात आलेल्या दहशतवादी भ्याड हल्ल्यात २६ निरपराध पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला होता. त्याचा बदला भारताने 'सिंदूर ऑपरेशन' राबवून घेतला आहे. भारतीय हवाई दल आणि लष्कराचे संयुक्त ऑपरेशन असलेल्या भारतीय सैन्याची ही कामगिरी अभिमानास्पद आहे. 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे दहशतवाद्यांना सडेतोड प्रत्युत्तर दिले असून, 'ऑपरेशन सिंदूर' भारताच्या धैर्याचे आणि सामर्थ्याचे प्रतीक असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी म्हटले आहे.

ते म्हणाले की, आपला भारत देश आता हल्ले सहन करणारा देश राहिला नाही तर प्रतिउत्तर देणारा हा नवा भारत आहे. त्यामुळे गरज पडल्यास निर्णायक कठोर पाऊल उचलून घरात घुसून मारणारा देश बनला आहे. 'सिंदूर ऑपरेशन' राबवून दहशतवाद्यांना आणि त्यांच्या पाठीराख्यांना स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. भारताच्या सीमा आणि नागरिकांच्या सुरक्षेबाबत कोणतीही आगळीक यापुढे सहन केली जाणार नाही. दहशतवादी हल्ल्याचा केवळ निषेध करून थांबणार नाही तर एका गोळीचे उत्तर मिसाईलने देण्यात येईल. त्यामुळे यापुढे कोणीही आपल्या देशाकडे नजर वर करून पाहणार नाही. 'सिंदूर ऑपरेशन' यशस्वीपणे राबविणारे भारतीय शूर सैनिकांचा सार्थ अभिमान आहे. 'सिंदूर ऑपरेशन' राबविण्याचा निर्णय घेणारे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचे अभिनंदन केले.



# एसबीसी अन्याय निवारण कृती समितीच्या जिल्हाध्यक्षपदी अंकार

**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे चेअरमन राजेंद्र दत्तात्रय अंकार यांची विशेष मागास प्रवर्ग (एसबीसी) अन्याय निवारण कृती समितीच्या नाशिक जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अंकार यांच्या निवडीबद्दल नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे यांनी त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी समता परिषदेचे तालुकाध्यक्ष राजेंद्र जगझाप, संदीप ठोकपाटील उपस्थित होते.

एसबीसी अन्याय निवारण कृती समितीचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पद्मशाली यांनी ही नियुक्ती केली. विशेष मागास प्रवर्गाच्या विविध मागण्यांसाठी राज्य शासनाकडून ही एसबीसी अन्याय निवारण कृती समितीची स्थापन करण्यात आली आहे. जात पडताळणी व एसबीसीच्या राज्यात असलेल्या दोन टक्के आरक्षणाबाबत कृती समितीच्या वतीने पाठपुरावा करण्यात येणार आहे. एसबीसी अन्याय निवारण कृती समितीचे सरचिटणीस जितेंद्र कांचानी व सचिव सुदर्शन बोगा तथा अन्य सदस्यांनी या नियुक्तीबद्दल अंकार यांचे अभिनंदन केले आहे. अंकार हे गेल्या ३० वर्षांपासून प्रिंट मीडियात पत्रकार म्हणून कार्यरत आहेत. ते सिन्नर येथील अटल रजत बहुद्देशीय सहकारी संस्थेचे चेअरमन व सिन्नर येथील पद्मशाली समाजाचे माजी अध्यक्ष आहेत.

# पं. पलुस्कर सभागृह आउटसोर्सिंगवर देणार

## मनुष्यबळ नसल्याने महापालिकेचा निर्णय

**नाशिक : प्रतिनिधी**

पंचवटीतील पं. विष्णू दिगंबर पलुस्कर सभागृह आता आउटसोर्सिंगद्वारे चालविण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला आहे. याबाबतचा प्रस्ताव महासभेवर ठेवण्यात आला आहे. हे सभागृह चालविण्यासाठी महापालिकेकडे कुशल व अकुशल मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने, तसेच देखभाल व दुरुस्तीचा खर्च करणे शक्य नसल्याने हे सभागृह पाच वर्षांच्या कालावधीवर आउटसोर्सिंगद्वारे देण्याचा निर्णय घेतला आहे.

पं. पलुस्कर सभागृह चालविण्यासाठी वातानुकूलित यंत्र, विद्युत व साउंड सिस्टिम, वार्षिक देखभाल-दुरुस्ती, कर्मचारी वेतन, वीजबिल व इतर शासकीय कर हे सर्व गृहीत धरून महापालिकेला हा खर्च करणे शक्य नाही. त्यामुळे निविदाप्रक्रिया राबवून बाह्य यंत्रणेद्वारे म्हणजेच आउटसोर्सिंगवर हे सभागृह दिले जाणार आहे.

दरम्यान, आउटसोर्सिंगवर सभागृह देताना महापालिकेने ठेकेदाराला काही अटी-शर्ती




घालून दिल्या आहेत. जसे की, या सभागृहाचा वापर फक्त सांस्कृतिक कार्यक्रम व नाटकाच्या प्रयोगासाठीच करण्यात येईल. सभागृहाच्या अतिरिक्त जागेचा वापर मक्तेदाराने करू नये किंवा बांधकाम करू नये. असे आढळल्यास मनपामार्फत नोटीस देऊन मालमत्ता ताबा घेण्याची कारवाई सुरू केली जाईल. मनपाच्या पूर्वपरवानगीशिवाय मक्तेदाराने वापरात कोणताही बदल केल्यास अटी-शर्तीचा भंग समजण्यात येईल व करार रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल. सभागृहाच्या नूतनीकरणासाठी रीतसर कराराची नोंदणी केली जाईल. मनपाला आवश्यक वाटेल अशा अतिरिक्त अटी-शर्ती करारात समाविष्ट करील. सभागृहाच्या नूतनीकरणास मक्तेदार इच्छुक नसल्यास मनपा अधिनियमातील तरतुदीनुसार मक्तेदारास नोटीस देऊन मालमत्तेचा ताबा देऊन मनपाच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू करेल. मनपाच्या मान्यतेशिवाय सभागृहाचे परस्पर हस्तांतरण केले जाणार नाही किंवा मालमत्ता तारण किंवा गहाण ठेवली जाणार नाही किंवा त्यावर त्रयस्थ पक्षाचे हितसंबंध प्रस्थापित किंवा निर्माण करता येणार नाही. कोणत्याही न्यायालयात मनपाच्या मालमत्तेवर कायमस्वरूपी हक्क प्रस्थापित करण्यासाठी अधिनियम आणि नियमांचा वापर केला जाणार नाही. भाडेपट्टा कालावधी पाच वर्षांचा असेल. सभागृहातील वातानुकूलित यंत्रणेची देखभाल-दुरुस्ती, स्पेअर पार्ट बदलणे, नवीन बसविणे आदी कामे संबंधित भाडेपट्टाधारकाने करावी लागेल. लाइट, माइक, ट्यूब, वायरिंग, अंतर्गत सीट व्यवस्था दुरुस्त करणे, नवीन बसविणे आदी कामे संबंधित भाडेपट्टाधारकाने करावी लागेल. सभागृहातील आतील व बाहेरील स्वच्छता, पाणीव्यवस्था, आवश्यक दुरुस्ती करणे संबंधित मक्तेदाराची जबाबदारी राहील. स्वच्छतेकामी लागणारे साहित्य मक्तेदाराने पुरवावे लागेल. सभागृहाबाहेरील गार्डनमधील देखरेख मक्तेदाराने करावयाची आहे. यासह संपूर्ण सभागृहाचे व बाहेरील परिसराचे वीजबिल, पाणीबिल व इतर शासकीय व मनपाचे कर संबंधित मक्तेदारास भरावे लागतील. शासनाकडील पोलीस आयुक्त, वाहतूक शाखेच्या व अग्निशमन दलाच्या आवश्यक परवानग्या संबंधित मक्तेदाराने सादर करावयाच्या आहेत. सभागृहाचे काही नुकसान झाल्यास त्यास सर्वस्वी मक्तेदार जबाबदार राहील. सभागृहात काही जीवित व वित्तहानी झाल्यास त्यास मक्तेदार जबाबदार राहील यांसह महापालिकेने घालून दिलेल्या अटी- शर्तीनुसार मक्तेदारास काम करावे लागेल.



# सिन्नर कृउबात आरोग्य तपासणी

**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील सिन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारात राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याअंतर्गत व आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचे औचित्य साधून काल (दि.६) संतुलित आहारासंबंधी एकदिवसीय आरोग्य तपासणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

बाजार समितीचे सभापती गणेश घोलप यांच्या हस्ते कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी बाजार समितीचे संचालक सुनील चकोर, नवनाथ नेहे, सचिव विजय विखे आदी उपस्थित होते. आरोग्यम् धनसंपदा या उक्तीप्रमाणे आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. प्रत्येकजण निरोगी व सुदृढ असावा यासाठी नियमित व्यायाम, सकस आहार, स्वच्छता याकडे बारकाईने लक्ष देणे गरजेचे आहे. मात्र, धकाधकीच्या जीवनामध्ये आरोग्याकडे नकळत दुर्लक्ष होते. बदलते हवामान, संकरित अन्नधान्य, बदलती जीवनशैली, चुकीची आहार पद्धती, व्यसनाधीनता, व्यायामाचा अभाव इत्यादी कारणांमुळे व्याधींचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. हे लक्षात घेऊन उल्हासनगर, कल्याण येथील मेलीन न्यूट्रिकेअर कंपनीच्या वैद्यकीय पथकाने बाजार आवारातील विविध घटकांची तपासणी करून त्यांना आहाराबाबत (न्यूट्रिशन) मार्गदर्शन केले. त्यात बीएमआय, त्वचेखालील चरबी, स्नायूंची ताकद, शरीरातील एकूण चरबीचे प्रमाणे, हृदय व पोटावरील चरबी, पाचनशक्ती क्रिया, शारीरिक झीज इत्यादींची तपासणी करण्यात आली. याप्रसंगी डॉ. जसविंदर सिंग, चाहत नागपाल, नवीन नागपाल, सुखधाम पांडे या वैद्यकीय तज्ज्ञांनी उपस्थितांना तपासणीनंतर आहार व व्यायामासंबंधी मार्गदर्शन केले. व्यापारी बाळासाहेब चकोर, दिलीप खिंवसरा, मंगेश कर्पे, सुरेश कलंत्री, महेश पारख, विजय तेलंग, राजू चकोर, सुजित भाबड, अनिल पऱ्हाळे, अनिल लहामगे, सोपान गोळेसर, बाबूशेठ लड्डा, सतीश चकोर, पप्पू गोळेसर, सुनील पऱ्हाळे, सुनील चोथे तसेच मापारी उज्ज्वल गुजराथी आदींनी तपासणीचा लाभ घेतला.

# रस्ते खोदकाम नियंत्रणासाठी सल्लागाराची नेमणूक

## कामावर ठेवणार देखरेख

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरात विविध संस्थांकडून महापालिकेची परवानगी घेऊन रस्ते खोदले जातात, परंतु या संस्था परवानगी घेताना दिलेल्या लांबीपेक्षा रस्त्याची अधिक प्रमाणात तोडफोड करतात. यामुळे महापालिकेचे नुकसान होते. परिणामी, याचा आर्थिक भार महापालिकेवरच पडतो. यावर उपाय म्हणून महापालिका प्रशासनाने आता शहरात भूमिगत गॅसवाहिन्यांसह इतर कामांसाठी रस्ते फोडणाऱ्या संस्थांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी सल्लागार नेमण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा प्रस्ताव बुधवारी (दि. ७) महासभेवर ठेवण्यात आला आहे.

महापालिका हद्दीत गॅसवाहिन्यांसह दूरसंचार, सेल्यूलर कंपन्यांमार्फत दूरसंचार, इंटरनेट सेवा



पुरविण्यासाठी ऑप्टिकल फायबर केबल टाकणे व गॅस कंपन्यांकडून भूमिगत वाहिन्या टाकल्या जातात. खोदलेले रस्ते सुस्थितीत ठेवण्यासाठी विविध सरकारी-निमसरकारी व खासगी कंपन्यांकडून मनपा शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार निश्चित केलेले रस्ते खोदाई दर आकारते. सुमन इन्का सर्व्हिसेस या संस्थेने महापालिकेला पत्र देऊन सर्वेक्षण करण्यासाठी सल्लागार अभिकर्ता म्हणून काम करण्यास इच्छुक असल्याचे कळविले आहे. आयुक्तांशी चर्चेनुसार उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली, परभणी, अहिल्यानगर व इतर महापालिकांच्या धर्तीवर नाशिक महापालिका हद्दीतील ओएफसी केबल व गॅस पाइपलाइन टाकण्याच्या कामासाठी सल्लागार अभिकर्ता म्हणून नेमणूक करण्यासाठीची योग्य ती कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत. शहरात वारंवार रस्ते फोडले जात असल्याने नागरिक व राजकीय पदाधिकाऱ्यांकडून महापालिकेवर संताप व्यक्त होतो.

दरम्यान, यापुढे रस्ते खोदाई करताना आता प्रत्यक्ष कामावर देखरेख करण्यासाठी सल्लागार असेल. महापालिका हद्दीत भूमिगत ओव्हरहेड ओएफसी गॅसवाहिन्या टाकण्यासाठी विविध कंपन्यांकडून आकारावयाचे रस्ता खोदाई करण्यासाठी शासनाचे निर्देश, सूचना व पत्रकानुसार नाशिक मनपाची दरसूची तयार करणे, विविध कंपन्यांकडून नवीन दरसूचीप्रमाणे रस्ते खोदाई, तसेच कंपन्यांना आकारणी केलेला दंड वसूल करणे, अस्तित्वातील सेवा वाहिन्यांचे भूमिगत केबलचे जीपीआर प्रणालीचे सर्वेक्षण करून त्यांची विनापरवानगी तपशिलावर संगणकीय माहिती मनपास उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### महसुलात वाढ होणार

रस्ते खोदकामासाठी सल्लागार नेमल्यास शहरातील रस्ते सुस्थितीत राखण्यासाठी मदत होईल. मनपाचे दायित्व कमी होईल. या कामांकरिता लागणारे मनुष्यबळ व खर्चात बचत होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे, वाढीव दराने रस्ता खोदाई शुल्क आकारणी व वसुली करून मनपाच्या महसुली उत्पन्नात वाढ होईल. परवानगी घेतलेल्याच रस्त्यांचे तंतोतंत कामे होतील. लांबीपेक्षा कोणालाही रस्ते फोडता येणार नाहीत.

# व्यसन आणि फॅशनमुळे हिंदू धर्म आणि संस्कृतीची अवहेलना

## ॲड. शंकर महाराज शेवाळे यांचे मार्गदर्शन

**ठाणगाव : वार्ताहर**

मनुष्य जन्म दुर्लभ आहे. मात्र, व्यसन आणि फॅशनच्या नावाखाली पाश्चिमात्य संस्कृती वाढते आहे. परिणामी, हिंदू समाजाच्याच माता, भगिनी संकटात सापडत आहे. संस्कृतीची अवहेलना होत आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीचा पुन्हा अंगीकार करण्याची गरज निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन शंकर महाराज शेवाळे यांनी केले.

ठाणगाव (ता. सिन्नर ) येथे श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक व बालसंस्कार केंद्रातर्फे आयोजित श्री दत्त चरित्र संगीतमय चरित्रकथा कार्यक्रमात ते बोलत होते.

मन ताब्यात येण्यासाठी नमन केल्याशिवाय पर्याय नाही. परमेश्वराकडे काहीही मागताना दुसऱ्यासाठी मागा. आपल्या जीवनात काहीही कमी पडणार



नाही. अध्यात्मावर सर्वांचा समान अधिकार आहे. समर्थांच्या इच्छेत मिळून रहा. आपल्या हातून कुणाची अवहेलना करू नका, असे शेवाळे यांनी विविध दृष्टांतातून सांगितले. स्वामी कथेनंतर भाविकांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. विविध मान्यवरांच्या हस्ते स्वामींची महाआरती करण्यात आली. केंद्र संयोजक जयराम शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी
■ gavakari.in ■ gavkarinews.com
■ नाशिक, शुक्रवार, दि. ९ मे २०२५



'महिला व बालविकास'च्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा : तटकरे ▸▸ नाशिक आज



दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास फायदाच : भुजबळ : ▸▸ नाशिक आज

## महत्त्वाचे

### नाशिकला तीन दिवस यलो अलर्ट

**नाशिक :** गेल्या तीन दिवसांपासून नाशिक शहरासह जिल्ह्याला अवकाळी पावसाने तडाखा दिला. मे महिन्याच्या सुरुवातीलाच अवकाळीने तडाखा दिल्याने नाशिकमध्ये कांदापिकाचे मोठे नुकसान झाले आहे. शुक्रवारी (दि.८ मे) अवकाळीचा इशारा देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे पुढील तीन दिवस म्हणजे १२ मेपर्यंत अवकाळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. नाशिकला पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. राज्यात गेल्या तीन दिवसांपासून अवकाळी आणि गारपीट झाल्याने उन्हाळी पिकांचे, फळबागांचे आणि कांद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काल ८ मेपासून संपूर्ण महाराष्ट्रात गारपिटीचा धोका कमी होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे तर संपूर्ण कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील १७ जिल्ह्यांमध्ये मात्र अवकाळीची शक्यता १२ मेपर्यंत टिकून राहण्याची शक्यता आहे. मुंबई, ठाणे, रायगड, नंदुरबार, पालघर, जळगाव, नाशिक, नगर या ९ जिल्ह्यांमध्ये अवकाळी प्रभाव कायम टिकून राहील, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. अवकाळी वातावरणामुळे पहाटेच्या किमान तापमानात सरासरीपेक्षा २ ते ६ डिग्रीने घट झाली आहे. त्यामुळे रात्री उकाड्यापासून दिलासा मिळत आहे.

### बारशिंगवेत पॉलिहाऊसचे नुकसान

**वासाळी :** इगतपुरी तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने



थैमान मांडले आहे. बारशिंगवे येथील शेतकरी दुंदा दगडू भोईर यांच्या पॉलिहाऊसवर अनेक गारा एकत्र होऊन त्याचा सुमारे ९ ते १० किलो वजनाचा गोळा तयार झाला. त्या वजनामुळे नेटचे पूर्ण नुकसान झाले. मात्र, परिसरात मोठी गार पडल्याची चर्चा झाल्याने तो गोळा पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी झाली होती. दरम्यान, बेमोसमी पावसामुळे शेतकऱ्यांना नुकसानीला तोंड द्यावे लागत आहे. मंगळवारी दुपारी तीनला गारपीट व अवकाळी पाऊस झाला. वातावरणात बदल होत गारपीट झाली. दुपारची वेळ असल्याने शेतकरी, मजूर आपापल्या शेतीकामात व्यस्त होते. शेतकऱ्यांसह शेतमजुरांची धांदल उडाली. दुपारची वेळ आणि सर्वच घराबाहेर असल्याने सर्वांनाच त्याचा फटका बसला. गारपिटीने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सुमारे पाऊण तास गारांचा पाऊस कोसळत होता.

> गार ही जास्तीत जास्त सुपारीच्या आकाराची असू शकते. नऊ ते दहा किलोची गार शक्यच नाही. पॉलिहाऊसवर अनेक गारा एकत्र होऊन त्याचा गोळा तयार झाला असावा.
> **- गणेश शेळके,** हवामानतज्ज्ञ

# अवकाळीमुळे १,३७७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान

## पेठ तालुक्यात सर्वाधिक १०१ घरांची पडझड, १८४ गावांमधील ५,१८१ शेतकऱ्यांना बसला फटका









**नाशिक : प्रतिनिधी**

**बुधवारच्या अवकाळीत पेठ आणि त्र्यंबकेश्वर तालुक्यांतील आंबा भक्ष्यस्थानी पडला. एकूण १८४ गावांमधील ५,१८१ शेतकऱ्यांचे १,३७७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. यात १२४० हेक्टरवरील नुसता आंबाच आहे.**

सोमवारपासून अवकाळी पावसाने थैमान घातले आहे. तीन दिवसांच्या काळात जिल्ह्यात सर्वत्रच पावसाने तडाखा दिला. यात कांदा आणि फळपिकांचे मोठ्या प्रमाणात नुसकसान झाले. सोमवारी आणि मंगळवारी पडलेल्या पावसाने जवळपास दोन हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले होते. यात कांदा या पिकाला मोठ्या प्रमाणात फटका बसला होता. बुधवारीही पावसाने जिल्ह्यात हजेरी लावली. यात १,३७७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. विशेषत: आंब्याला फटका बसला. एकूण १२४० हेक्टरवरील आंबा अवकाळीच्या भक्ष्यस्थानी पडला. याशिवाय, १३१ हेक्टरवरील कांद्याचेही पावसामुळे नुकसान झाले. पेठ तालुक्यातील १३३ गावांमधील ४,६६५ शेतकऱ्यांचा १,१२४ हेक्टरवरील आंबा पावसाने हिरावून नेला. त्र्यंबकेश्वर तालुक्यातील ३४ गावांमधील ४०७ शेतकऱ्यांच्या ११३ हेक्टरवरील आंब्याला फटका बसला. दिंडोरी तालुक्यात सात गावांमधील ६७ शेतकऱ्यांचा ४० हेक्टरवरील कांदाही पावसाच्या तडाख्यात सापडला. सटाणा तालुक्यातील तीन गावांमधील २५ शेतकऱ्यांच्या २५ हेक्टरवरील कांद्याचे नुकसान झाले.

### २९९ घरांची पडझड

सोमवारी झालेल्या पावसाने २९९ घरांची पडझड झाली. वादळीवारा असल्याने काही घरांचे पत्रे उडून गेले. यात सर्वाधिक १०१ घरे पेठ तालुक्यातील आहेत. तसेच बागलाण तालुक्यात एका जनावरांच्या गोठ्याचेही पावसामुळे नुकसान झाले. नांदगाव तालुक्यात सात लहान तर निफाड तालुक्यात एका दुधाळ जनावराचा अवकाळीने मृत्यू झाला. मालेगाव तालुक्यात एक ओढकाम करणारे जनावर दगावले. चांदवड तालुक्यात एका पोल्ट्री शेडचे नुकसान झाले. याशिवाय एक कांदाचाळ, दोन शाळा आणि एका प्राथमिक आरोग्य केंद्राचेही नुकसान झाले.

# अवकाळीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करा

## छावा क्रांतिवीर सेनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी**



अवकाळीमुळे झालेल्या शेतीमाल व पशुपालन व्यवसायाच्या नुकसानीबाबत तत्काळ पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी छावा क्रांतिवीर सेनेतर्फे करण्यात आली आहे.

दोन दिवसांपासून जिल्ह्यासह अनेक भागात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा जोर सुरू असून, शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. विशेषतः नाशिक, त्र्यंबकेश्वर, इगतपुरी, निफाड, मालेगाव, सटाणा, नांदगाव, कळवण, दिंडोरी, सुरगाणा, पेठ, सिन्नर, चांदवड तालुक्यांतील अनेक गावांमध्ये अवकाळी पावसामुळे वादळी वाऱ्याचे आणि काही भागांतील गारपिटीचे मोठे संकट ओढवले आहे.

या आपत्तीमुळे अनेक ठिकाणी शेतीमाल पूर्णतः नष्ट झाला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे तत्काळ व प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करावेत. संबंधित तलाठी, कृषी अधिकारी व ग्रामसेवक यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीचा अहवाल तयार करावा. शेतीसोबतच पशुपालन, पोल्ट्री व इतर व्यवसायांचेही पंचनामे करून आर्थिक मदतीची घोषणा करावी. शासनाने शेतकऱ्यांसाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे. मा. कृषिमंत्र्यांनी जिल्ह्यातील नुकसानीचा स्वतः दौरा करून आढावा घ्यावा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्याशी समन्वय साधून शेतकऱ्यांना तात्काळ आणि अधिकाधिक मदत मिळेल अशा उपाययोजना कराव्यात.

जर शासनाने या मागण्यांकडे तत्काळ लक्ष दिले नाही, तर छावा क्रांतिवीर सेनेतर्फे जनआंदोलन उभे करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. निवेदन देण्यासाठी संस्थापक अध्यक्ष करण गायकर, शिवा तेलंग, नवनाथ शिंदे, आशिष हिरे, प्रवीण पाटील, आबा पाटील, वैभव दळवी, शुभम महाले, ज्ञानेश्वर पालखेडे, सागर जाधव, अमोल देवरे, दत्ताजी पवार, राकेश पाटील, प्रवीण बिल्याणी, जयेश मोरे, भगवान घुगे आदींसह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> नाशिक जिल्ह्यासह महाराष्ट्रात अवकाळी पावसाने दोन दिवसांपासून थैमान घालून प्रचंड मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान केलेले आहे. त्यामध्ये कांदा, आंबा, गहू, टोमॅटो, डाळिंब, द्राक्ष यांसह अनेक फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केल्यामुळे राज्य शासनाने तत्काळ शेतकऱ्यांना विशेष पॅकेज घोषित करून आर्थिक मदत करावी. बळीराजाला या अस्मानी संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने सर्वतोपरी मदत करून शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, अन्यथा संघटनेच्या वतीने या विरोधात राज्यभर आंदोलन करून शासनाला मदत करण्यास भाग पाडू.
> **- करण गायकर,** संस्थापक अध्यक्ष, छावा क्रांतिवीर सेना, महाराष्ट्र



# नाशिक जिल्हा ट्रान्स्पोर्ट असो. उपाध्यक्षपदी तेजपालसिंग सोढा

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा ट्रान्स्पोर्ट असोसिएशनच्या आडगाव विभाग उपाध्यक्षपदी तेजपालसिंग सोढा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे अध्यक्ष पी. एम. सैनी यांच्या अध्यक्षतेखाली काल आडगाव ट्रक टर्मिनल येथे झालेल्या बैठकीत त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी वाहतूकदार व चालकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आपण प्रयत्न करू, असे प्रतिपादन उपाध्यक्ष तेजपालसिंग सोढा यांनी केले. यावेळी पदाधिकारी व वाहतूकदारांनी त्यांचे अभिनंदन केले.

यावेळी नाशिक जिल्हा ट्रान्स्पोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष पी. एम. सैनी यांच्यासह संघटनेचे महेंद्रसिंह राजपूत, सुभाष जांगड़ा, दलजित सिंह मेहता, रामभाऊ सूर्यवंशी, संजय तोड़ी, हनुमान बेनीवाल, किशन बेनीवाल, सज्जन सिंह, गुरमित सिंग, नरेश बंसल, नरसिंह चौधरी, आनंद राजपूत, सुनील सिंह, जितेंद्र सिंह, विजय भाई, दीपक पांडे, दिनेश शर्मा, बाबूलाल गोस्वामी, संजय बोरा यांच्यासोबत पदाधिकारी व वाहतूकदार उपस्थित होते.

# काही भागातील विमानसेवा बंद

## इंडिगो : प्रवाशांनी निघण्यापूर्वी चौकशी करावी

**नाशिक : प्रतिनिधी**



विमानतळ बंद करण्याबाबत विमान वाहतूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्देशांनुसार, इंडिगो विमान कंपनीने १० मे रोजी सकाळी ५.२९ वाजेपर्यंत श्रीनगर, जम्मू, अमृतसर, लेह, चंदिगड, धर्मशाळा, बिकानेर, जोधपूर, ग्वाल्हेर, किशनगड आणि राजकोट येथे जाणारी व येणारी सर्व उड्डाणे रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

विमान कंपनी तेथील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. त्यानंतरच उद्‌भवणाऱ्या परिस्थितीनुसार इतर क्षेत्रांमध्ये वेळापत्रकात बदल केले जाऊ शकतात. इंडिगो विमान कंपनी आपल्या ग्राहकांना घडामोडींबद्दल माहिती देत राहीलच. विमानतळावर जाण्यापूर्वी ग्राहकांनी आपल्या विमानाची स्थिती तपासण्याचा सल्ला इंडिगो कंपनीने दिला आहे.

देशासाठी व देशवासीयांसाठी हा संवेदनशील काळ आहे आणि नेहमीप्रमाणे आपल्या ग्राहकांना पाठिंबा देण्यासाठी इंडिगो कंपनी कटिबद्ध आहे. नागरिकांच्या सततच्या संयमाबद्दल आणि सहकार्याबद्दल विमान कंपनी ऋणी राहणार असल्याचेही प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापनकडून सर्व विभागांना अलर्ट राहण्याच्या सूचना

**नाशिक : प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या काळात दुर्घटना होऊ शकतात. त्याअनुषंगाने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून जिल्ह्यातील सर्व यंत्रणांना पत्र पाठवून खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत.

आपत्कालीन परिस्थितीदरम्यान सर्व विभागांच्या यंत्रणांनी योग्य तयारीत असावे. जिल्ह्यातील विविध महत्त्वाची ठिकाणे, धार्मिक स्थळे, अतिमहत्त्वाची ठिकाणे लक्षात घेऊन सर्व यंत्रणांसोबत समन्वयक राखणे आवश्यक आहे.

सर्व विभागांनी २४ x ७ नियंत्रण कक्ष कार्यान्वित, सुरू ठेवून नियंत्रण कक्षात सक्षम कर्मचारी यांची नियुक्ती करावी. त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे. नियंत्रण कक्षात महत्त्वाचे अद्ययावत दूरध्वनी, भ्रमणध्वनी क्रमांक, इंटरनेट, प्रिंटर्स, संगणक, व्हिडिओ कॉन्फरन्स सेवा उपलब्ध करून ठेवाव्यात. सर्व विभागांनी, सर्व अधिकारी यांनी आपल्या सोबत महत्त्वाचे संपर्क क्रमांक अद्ययावत करून ठेवावेत. सर्व सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, मुख्याधिकारी, अग्निशमन अधिकारी यांनी आपल्या वाहनांमध्ये पीए सिस्टम सुरू असल्याची खात्री करावी. लाऊड हेलर ठेवण्यात यावेत.

अग्निशमन अधिकारी, मुख्याधिकारी नगर परिषद, नगरपालिका यांनी उपलब्ध असलेली अग्निशमन वाहने सुस्थितीत असल्याचा अहवाल सादर करावा. ज्या वाहनांची देखभाल-दुरुस्ती आवश्यक आहे, ती तत्काळ करून घेण्यात यावी. पोलीस विभाग/ महानगरपालिका यांच्याद्वारे उपलब्ध सीसीटीव्हीचे निरीक्षण बारकाईने करावे, अशा महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या आहेत.

# टीडीकेत सीटू युनियन रौप्यमहोत्सवानिमित्त रुग्णवाहिका लोकार्पण



**नाशिक :** सातपूर येथील टीडीके कंपनीतील सीटू कामगार युनियनच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त रुग्णवाहिका लोकार्पण सोहळा खासदार राजाभाऊ वाजे व सीटूचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. डी. एल. कराड यांच्या हस्ते सीटू कामगार भवन, खुटवडन-गर येथे ११ मे रोजी दुपारी ३ वाजता होणार आहे. यासाठी जास्त जास्त कामगारांनी उपस्थित राहावे, असे आवाहन टीडीकेचे कामगार प्रतिनिधी बाळासाहेब सोनवणे, संदीप गटकळ,अमर शेरकर,बारकू पवार, सोमनाथ घाटोळ, सचिन अहिरराव, सचिन नेरे, प्रमोद शिरोडकर, योगेश वावरे आदींनी केले आहे.

# दोन्ही शिवसेनेच्या अस्तित्वाची लढाई

**नाशिक : अश्विनी पांडे**

**सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार येत्या चार महिन्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. गेल्या तीन वर्षांपासून होऊ न शकलेली मनपा निवडणूक होणार असल्याने सर्वच राजकीय पक्षांकडून जोरदार तयारीला सुरुवात करण्यात आली आहे. मात्र, गेल्या पंचवार्षिक निवडणुकीपेक्षा यंदाच्या निवडणुकीत मोठा फरक असणार आहे.**

गेल्या आठ वर्षांत राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली. नाशिक हा कधी काळी शिवसेनेचा बालेकिल्ला होता. २००७ ते २०१२ या कालावधीत शिवसेनेची नाशिक महानगरपालिकेवर सत्ता होती. मात्र, २००९ च्या मनसेच्या लाटेत शिवसेनेची थोडी पडझड झाली. मात्र, २०१७ च्या मनपा निवडणुकीत शिवसेनेने ३४ जागा मिळवत जोरदार कमबॅक केले होते. मात्र, भाजपाची २०१७ च्या मनपा निवडणुकीत एकहाती सत्ता आली. मात्र, आता शिवसेनेत




मोठी फूट पडल्याने दोन शिवसेना निर्माण झाल्या आहेत. त्यातील शिंदे यांची शिवसेना राज्यात सत्तेत सहभागी आहे. तर ठाकरेंची शिवसेना ही विरोधी पक्षात आहे. त्यामुळे आगामी काळात होऊ घातलेल्या मनपा निवडणुका दोन्ही शिवसेनेसाठी अस्तित्वाची लढाई असणार आहे.

### मागील दोन मनपा निवडणुकीतील संख्याबळ

**मनपा निवडणूक २०१२ - १९**
**मनपा निवडणूक २०१७ - ३४**

शिवसेना

### शिंदे गट जमेची बाजू

**१. राज्यात सत्ता**
**२. पालकमंत्रिपद मिळण्याची शक्यता**
**३. इनकमिंग वाढण्याची शक्यता**

### कमकुवत बाजू

**१. पक्षांतर्गत गटबाजी**
**२. ठाकरे गटाकडून गद्दार हा प्रचार**
**३. पक्षाचा शहरात एकही आमदार, खासदार नाही.**



> उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना पक्ष महायुतीसोबत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढणार आहेत.
> माजी लोकप्रतिनिधींना मोठ्या प्रमाणात नगरविकास विभागाचा निधी दिल्याने जनतेची विकासकामे सर्वत्र चालू आहेत. त्याचा निश्चितच फायदा शिवसेनेला होणार आहे. नाशिक महापालिकेच्या निवडणुका महायुतीत लढण्याबाबत वरिष्ठ पातळीवर निर्णय होईल. केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून जनसेवा करणारा शिवसैनिक नसतो. तो सतत जनतेसोबतच असतो आणि जनहिताची कामे करतच असतो. लाडकी बहीण, मोफत बस प्रवाससारख्या अनेक योजनांमुळे एकनाथ शिंदे यांना अधिकाधिक लोकप्रियता मिळत राहिली. अनाथांचा नाथ अशी उपाधीही त्यांना जनतेने दिली आहे. शिवसेनेची घोडदौड मनपा निवडणुकीतही अशीच चालू राहील.
> **- प्रवीण (बंटी) तिदमे,** महानगरप्रमुख, शिवसेना शिंदे गट

### ठाकरे गट जमेची बाजू

**१. पक्ष फुटल्याची जनतेला भावनिक साद**
**२. शिंदे गटातील गटबाजी पथ्यावर पडण्याची शक्यता**

### कमकुवत बाजू

**१. शहरात शिवसेनेत मोजकेच नेते**
**२.पदाधिकाऱ्यांकडून पक्षांतराची शक्यता**
**३. सत्ताधारी महायुती असल्यास सामना करणे आव्हानात्मक**



> शिवसेनेत फूट पडली असली तरी खरी शिवसेना आमचीच आहे. लोकसभा निवडणुकीत जनतेने यांना जागा दाखवून दिली होती. मात्र, विधानसभा निवडणुकीत इव्हीएम मशीनमध्ये घोळ करून महायुतीचे सरकार आले आहे. सरकार आल्यानंतर जनतेला जी आश्वासनं दिली होती. त्याचा सरकारला विसर पडला आहे. विधानसभा निवडणुकीच्या आधी लाडकी बहीण योजना राबवली होती. मात्र, आता त्या योजनेच्या बाबतीतही नियम लावत अनेक महिलांना वगळण्यात येत आहे. त्यामुळे जनतेसमोर यांचा खरा चेहरा आला असून, मनपा निवडणुकीत जनता आमच्याच बाजूने राहणार आहे. नाशिक मनपावर पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा फडकणारच आहे.
> **- डी. जी. सूर्यवंशी,** जिल्हाप्रमुख, शिवसेना ठाकरे गट



मुंबईकरांचा प्रवास महागला, बेस्ट बसच्या दरात वाढ पान ३

नाशिक आज
# गांवकरी



आपत्ती व्यवस्थापनाचे धडे घेतले पाहिजेत पान ३

नाशिक, शुक्रवार, दि. ९ मे २०२५

## संक्षिप्त

### शनिवारी मर्हाी लघुपट महोत्सव

**नाशिक : प्रतिनिधी**

मर्हाी चित्रपट संस्थेतर्फे शनिवारी (दि.१०) व रविवारी सकाळी ११ ते ६ या वेळेत लघुपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी मर्हाी लघुपट महोत्सवामध्ये संपूर्ण राज्यातून जवळपास ५० लघुपट आले आहेत. त्यातील निवडक ३० लघुपटांचे स्क्रिनिंग दाखवले जाईल. गेल्या आठ वर्षापासून मर्हाी लघुपट महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. लघुपटांमधील पहिल्या तीन क्रमांक व उत्तेजनार्थ तसेच वैयक्तिक बक्षीस देऊन सन्मान केला जातो. नागरिकांनी या लघुपटांचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष निशिकांत पगारे, राज देसले, प्रा. सोमनाथ मुठाळ, भिला ठाकरे, जितेश पगारे, योगेश बर्वे, डॉ. अजय कापडणीस, चंद्रकिरण सोनवणे, कृष्णकुमार सोनवणे, किरण काळे व विजय जांगडा आदींनी केले.

### पळसे परिसरात पावसाची हजेरी

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

नाशिक तालुक्यातील पळसे, शिंदे, नानेगाव, शेवगेदारणा आदी गावांमध्ये जोरदार वादळी वाऱ्यासह व विजांच्या कडकडाटासह तीन दिवसांपासून बेमोसमी पाऊस होत आहे. नाशिक तालुक्यात सायंकाळी सहाच्या दरम्यान वादळी वारे व विजांचा कडकडाट पाऊस झाला. शहरी व ग्रामीण भागात यादरम्यान अचानक वीजपुरवठा खंडित झाला. त्यानंतर शहरी भागासह ग्रामीण भागात पावसाला सुरुवात झाली. वादळी वाऱ्यामुळे पळसे गावातील भाऊसाहेब सरोदे यांच्या घराचे पत्रे उडाले.

### जनकल्याणतर्फे सायकल रॅली

**नाशिक : प्रतिनिधी**

जागतिक थॅलेसेमिया दिनानिमित्त जनकल्याण रक्तकेंद्रातर्फे रक्तदान श्रेष्ठ दान, नियमित करू रक्तदान, निरोगी आयुष्याचा खरा सन्मान, असा संदेश देत सायकल रॅलीने थॅलेसेमिया जनजागृती अभियानाला सुरुवात करण्यात आली. सायकल रॅलीचे उद्घाटन शैलेश कुटे यांच्या हस्ते करण्यात आले. सायकलिस्ट फाउंडेशनच्या उपाध्यक्षा डॉ. मनीषा रौंदळ, सायकलिस्ट फाउंडेशनचे अध्यक्ष किशोर काळे, उपाध्यक्ष अरुण पवार, जनकल्याण रक्तकेंद्राचे अध्यक्ष राजेश रत्नपारखी, कार्यवाह शैलेश पंडित, सहकार्यवाह मदन भंदूरे, संचालक सुबोध गर्गे, नरेश अहिरे, श्रीकांत जोशी, समीर देव, मुख्य रक्त संक्रमण अधिकारी डॉ. सुजाता सोनवणे, डॉ आदित्य बोदर, प्रशासकीय अधिकारी विनय शौचे उपस्थित होते.

### पालिकेतील दिव्यांग कार्यालयाचे स्थलांतर

**नाशिक : प्रतिनिधी** नाशिक महानगरपालिकेच्या समाजकल्याण विभागामार्फत दिव्यांग कल्याणाच्या विविध योजना राबविल्या जातात. या योजनांची अंमलबजावणी महानगरपालिका मुख्यालय राजीव गांधी भवनमधून केली जाते. येत्या मंगळवार (दि. १३) पासून दिव्यांग कल्याण योजनांची अंमलबजावणी अटल दिव्यांग स्वाभिमान भवन येथून केली जाणार आहे. महानगरपालिका क्षेत्रातील सर्व दिव्यांग बांधव, दिव्यांगांच्या कल्याणाकरिता काम करणाऱ्या संघटना, त्यांचे पदाधिकारी यांनी नाशिक महानगरपालिकेशी संबंधित दिव्यांग कल्याणकारी योजनांचे संपूर्ण कामकाज अटल दिव्यांग स्वाभिमान भवन येथून केले जाणार असल्याची नोंद घ्यावी, असे समाजकल्याण विभागाचे उपायुक्त नितीन नेर यांनी म्हटले आहे.

# ‘महिला व बालविकास’च्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा

## ना. आदिती तटकरे : महिलांना शाश्वत साधन म्हणून ई-रिक्षा उपयुक्त

**नाशिक : प्रतिनिधी**

महिलांना ई पिंक रिक्षाद्वारे उत्पन्नाचे शाश्वत साधन मिळणार असून, महिला सुरक्षेसाठी ई पिंक रिक्षा उपयुक्त ठरणार आहे. जिल्ह्यात एक हजार ई-रिक्षा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. प्रातिनिधिक स्वरूपात २५ महिलांना ई-रिक्षाचे वाटप करण्यात आले आहे. महिला व बालकल्याण विभागाच्या योजनांचा लाभ समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवा, असे महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.



राज्य शासनाचा महिला व बालविकास विभाग आणि जिल्हा परिषद, नाशिक यांच्या वतीने पिंक ई-रिक्षा वितरण व विविध शासकीय योजनांचा लाभ वितरण सोहळा काल सकाळी महाकवी कालिदास कलामंदिर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी आमदार छगन भुजबळ, आमदार हिरामण खोसकर, महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी जलज शर्मा, महानगरपालिकेच्या आयुक्त मनीषा खत्री, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, महिला व बालविकास विभागाच्या सहाय्यक आयुक्त चंद्रशेखर पगारे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुनील दुसाने, कायनेटिक ग्रीनचे रितेश मंत्री, आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, डॉ.राजेंद्र बागूल, प्रा. डॉ. हर्षल नेहते आदींसह सर्व पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी बचतगटांचे प्रतिनिधी, आशा सेविका, मदतनीस उपस्थित होत्या.

> राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आदिशक्ती समिती स्थापन करणार असून आदिशक्ती पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. कुपोषण,बालमृत्यू, मातामृत्यूचे प्रमाण कमी करणे, महिलांना शासकिय योजनांचा लाभ आणि स्वयंरोजगाराच्या संधी यातून आर्थिक विकास हे आदिशक्ती अभियान उत्कृष्टपणे राबविणाऱ्या ग्रामपंचायतींना आदिशक्ती पुरस्कार देणार आहे.

यावेळी उबर ओला या सेवा सुविधेमध्ये ई पिंक रिक्षांची उपलब्धता, ई पिंक रिक्षा बसस्टँड, विमानतळ, रेल्वेस्थानक, पर्यटनस्थळे, महिला वसतिगृहे, औद्योगिक ठिकाणे अशा ठिकाणी महिलांना सुरक्षित प्रवासासाठी उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रयत्न असणार असल्याचे तटकरे यांनी सांगितले.

अंगणवाडीसेविका आणि मदतनीस यांच्या कुटुंबांनाही डॉ.आनंदीबाई जोशी आरोग्य शिबिरामध्ये सहभागी करून घेण्यात येणार असल्याची घोषणा केली. यावेळी मेन्स्ट्रुअल कपचे मोफत वाटप करण्यात आले. मासिकपाळीत स्वच्छतेसाठी मेन्स्ट्रुअल कप उपयुक्त असून, त्याचा वापर, प्रशिक्षण, प्रचार आणि प्रसार वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे तटकरे यांनी सांगितले.

यावेळी लेक लाडकी योजना, बचतगटांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल धनादेश वाटप करण्यात आले. बचतगटांच्या उत्पादनांचे ब्रँडिंग करण्यात आले. दोन ठिकाणी श्रीडी अंगणवाडी उपक्रम राबविणारा नाशिक जिल्हा प्रथम ठरणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्तांचा एकीकडे वापर होत असताना अशा अंगणवाड्यांचा उपक्रम सकारात्मक ठरणार असल्याचे तटकरे यांनी सांगितले.

जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत महिला व बालविकास विभाग तसेच आरोग्य विभागाच्या वतीने एकूण १४ विविध उपक्रमांचे लोकार्पण करण्यात आले. बाळाच्या नावासमोर त्याच्या आईचे नाव लावणे हा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य असल्याचे सांगून यद्वारे महिलांचा सन्मान होत असल्याचे तटकरे यांनी नमूद केले. आगामी काळात महिला व बालविकास विभाग ९० टक्क्यांपेक्षा अधिक भरती करणारे एकमेव विभाग ठरणार आहे. त्यामुळे अंगणवाडीसेविका, मदतनीस आणि सुपरवायझरची भरती सुरू असल्याचे तटकरे यांनी सांगितले.

जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी प्रास्ताविक केले. डॉ. राजेंद्र बागूल यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली.

### मासिक पाळी कप वितरण

ग्रामीण भागातील किशोरवयीन मुली आणि महिलांमध्ये मासिक पाळी कपबाबत जनजागृती व्हावी व त्याचा वापर वाढावा, या प्रमुख उद्देशाने मासिक पाळी कप वितरण कार्यक्रमाचे उद्घाटनही यावेळी मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाले. आशा कार्यकर्तींना प्रशिक्षण देऊन मासिक पाळी कप वापरासाठी ग्रामीण भागातील किशोरवयीन मुली आणि महिलांना प्रोत्साहन देणार आहेत. नाशिक स्त्रीरोगतज्ज्ञ संघटना अध्यक्ष डॉ. नेहा लाड आणि डॉ. गौरी करंदीकर व एफएलएल लाइफ केअरच्या डॉ. राजश्री दिवेकर, प्रो. डॉ. कानन, प्रो. डॉ. बेला आय.आय.टी. मुंबई यांनी मासिक पाळी व्यवस्थापन प्रशिक्षण घेतले. यासाठी तालुकानिहाय व प्रा. आ. केंद्रनिहाय प्रशिक्षण सत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. प्रशिक्षण सत्रानंतर प्रत्येक आशा कार्यकर्तीला मासिक पाळी कप वितरित करण्यात येणार आहे. अशा प्रकारे एकूण ३,००० मासिक पाळी कपचे वितरणही जिल्हास्तरावरून सेसमार्फत खरेदी करून देण्यात आले आहेत.

### भुजबळांकडून तटकरेंऐवजी आदिती ठाकरे उल्लेख

महिला व बालविकास विभागाच्या वतीने कालिदास कलामंदिरात राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ आणि महिला व बालविकासच्या मंत्री आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत ई पिंक रिक्षा वितरण कार्यक्रमात छगन भुजबळ यांनी भाषणात महायुतीच्या विकासकामांबद्दल कौतुक केले. महिला व बालविकास विभागाचे कामकाज, लाडकी बहीण योजना याबाबत बोलत असताना मंत्री आदिती ठाकरे असा उल्लेख झाल्याने अनेकांच्या भुवया ताणल्या गेल्या होत्या. अनवधानाने उल्लेख झाला असावा, असा समज उपस्थितांनी करून घेतला.



# दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास फायदाच

## छगन भुजबळ यांचा आशावादी सूर

**नाशिक : प्रतिनिधी**

भविष्यात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास आश्चर्य वाटू नये, असे सूचक वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले आहे. या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी या संकेतांना आशेचा किरण संबोधले असून, पक्षात पुन्हा मनोमिलन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

शरद पवार यांच्या वक्तव्यानंतर भुजबळ यांनी गुरुवारी (दि. ८) पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, राजकारणात दुरावलेली कुटुंबं पुन्हा एकत्र आली तर त्यातच खरी आनंदाची बाब आहे. यावेळी त्यांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्यातील मनोमिलनाबाबत पूर्वी केलेल्या आवाहनाचीही आठवण करून दिली. भुजबळ म्हणाले, दोन्ही राष्ट्रवादी गट आणि पवार कुटुंब एकत्र आले तर त्याचा थेट फायदा पक्षाला होईल. पक्षाची ताकद वाढेल; मात्र खा. शरद पवार यांनी निर्णयप्रक्रियेतून स्वतःला दूर ठेवले असल्याचेही भुजबळांनी अधोरेखित केले. त्यामागे काही विशिष्ट कारणे असल्याचे त्यांनी नमूद केले.

### पवार कुटुंबासाठी मध्यस्थाची गरज नाही

अजित पवार आणि सुप्रिया सुळे यांच्यातील संबंधांबाबत विचारले असता, भुजबळ म्हणाले की, अजित पवार हे शरद पवार यांच्या घरात वाढलेले आहेत. त्यामुळे पवार कुटुंबात मनोमिलनासाठी कोणत्याही मध्यस्थाची आवश्यकता भासणार नाही. मात्र, कोणी प्रयत्न करावेत असे वाटल्यास तेही केले जातील. शरद पवार यांच्या संकेतांनी राष्ट्रवादीतील घडामोडींना वेग आला असून, पक्षात नवीन पिढी काय निर्णय घेते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## म्युनिसिपल संघटना आक्रमक; आयुक्तांना निवेदन

# समायोजित शिक्षकांना मूळ सेवेत पाठवा

**नाशिक : प्रतिनिधी**

महापालिकेत ४९ शिक्षक आवश्यकता नसताना तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांनी आर्थिक गैरव्यवहार करून समायोजित शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या. त्यामुळे या शिक्षकांना तत्काळ मूळ सेवेत पाठविण्यात यावे, अशी मागणी म्युनिसिपल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुधाकर बडगुजर यांच्या नेतृत्वाखाली मनपा आयुक्त मनीषा खत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. शिक्षकांना मूळ सेवेत पाठविले नाही तर याविरोधात संघटना तीव्र आंदोलन करेल, असा इशाराही देण्यात आला.



निवेदनात म्हटले की, या शिक्षकांमुळे महापालिकेवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडेल. त्यामुळे त्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांना कार्यमुक्त करावे. महापालिकेने महासभा व स्थायी समितीचा ठराव मंजूर करून राज्य शासनाला पाठवावा. तत्कालीन शिक्षणाधिकारी बी. टी. पाटील यांच्या कार्यकाळात अनेक प्रकरणांत अनियमितता झालेली असून, याबाबत चौकशी व्हावी. शिक्षण मंडळाकडील बिंदुनामावलीनुसार मराठी माध्यमिक शिक्षकांची ६७८ पदे मंजूर आहेत. शिक्षणाधिकाऱ्यांनी बिंदुनामावलीचा विचार न करता अनियमितता केलेली आहे. त्यामुळे मनपाची फसवणूक व आर्थिक भार पडलेला आहे. अनुसूचित जाती-जमाती या प्रवर्गातील मंजूर पदे ४७ आहेत. शिक्षक भरती मात्र १६७ पदांची केलेली आहे. अतिरिक्त १२० शिक्षक बिंदुनामावलीतील मंजूर पदापेक्षा अतिरिक्त भरलेले आहेत. ओबीसी प्रवर्गातील १२९ पदे मंजूर आहेत. त्यात १७१ पदे भरती केली आहेत. यात ४२ शिक्षक अतिरिक्त भरले आहेत. शिक्षण मंडळाच्या आस्थापनेवर ६७८ पदे मंजूर असताना ७०२ शिक्षक भरती केलेली आहे. एकूण २४ शिक्षक यात अतिरिक्त आहेत. यातसुद्धा आर्थिक फसवणूक व बोजा मनपावर पडणार आहे. अशी परिस्थिती असताना शिक्षणाधिकाऱ्यांनी ४९ शिक्षक विविध जिल्ह्यांतून अतिरिक्त भरती केलेले आहेत. त्यात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार व फसवणूक झालेली आहे. नाशिक जिल्हा परिषदेकडून २३ शिक्षक मनपा आस्थापनेवर घेण्यात आले आहेत. जिल्हा परिषद धुळे, नंदुरबार, जळगाव, अहिल्यानगर, परभणी, छत्रपती संभाजीनगर, ठाणे, बीड, कोल्हापूर यांमधील २६ शिक्षक मनपाकडे आर्थिक व्यवहार करून वर्ग करण्यात आले आहेत. यापूर्वी ९८ शिक्षकांच्या बदल्या आयुक्तांच्या स्वाक्षरीने केलेल्या आहेत. निष्पाप व प्रामाणिक काम करणाऱ्या शिक्षकांचा राजकीय बळी पडू नये याबाबत काळजी घ्यावी, असेही म्युनिसिपल कर्मचारी सेनेने म्हटले आहे.



# एसटी कामगारांचे प्रश्न सोडवू : सूर्यवंशी

**नाशिक : प्रतिनिधी**

एसटी कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यासाठी शिवसेना कटिबद्ध असेल, असे प्रतिपादन शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी यांनी केले.

एसटी महामंडळाच्या विभागीय कार्यालय येथे एसटी कामगार सेना शाखेचे नूतनीकरण शिवसेना नाशिक जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्र एस.टी. कामगार सेनेचे राज्य कार्याध्यक्ष प्रदीप धुरंद, राज्य चिटणीस हिरेन रेडकर, राज्य संघटक सुभाष जाधव यांच्या हस्ते जिल्हाप्रमुखपदी डी. जी. सूर्यवंशी यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र एस.टी. कामगार सेनेचे पदाधिकारी देवा सांगळे, शारदा ढिकले, नयना भालेराव, श्याम झंगळे, भास्कर उगले, अनिल सांगळे, श्याम पोरजे, प्रवीण हाडोळे, रवींद्र जाधव आदी उपस्थित होते.

# शहरात स्पॉट बिलिंगला सुरुवात

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक महानगरपालिकेच्या वतीने पाण्याच्या स्पॉट बिलिंगचे कामकाज एजन्सीमार्फत सुरू करण्यात आले आहे. शुभारंभ आयुक्त मनीषा खत्री यांच्या हस्ते करण्यात आला.



नाशिक महापालिका क्षेत्रातील मिळकतधारकांचे नळकनेक्शनचे पाणीवापराबाबतचे बिलिंग वाटप स्पॉट बिलिंगद्वारे करण्यासाठी कंनबेरी एनलिटिक्स प्रा. लि. एजन्सीची नियुक्ती करण्यात आली आहे. या एजन्सीकडून कामकाज सुरू करण्यात आले आहे. एजन्सीमार्फत पाणी मीटर तपासणी केली जाणार असून, ज्यांनी पाणी मीटर बसवलेले नाहीत त्यांनी ते बसवून त्याची नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन आयुक्त मनीषा खत्री यांनी केले आहे.

# वातावरण बदलाचा ‘ताप’

## व्हायरल, न्यूमोनिया रुग्णांमध्ये वाढ; ऐन उन्हाळ्यात पावसाळा

**नाशिक : प्रतिनिधी**

गेल्या तीन ते चार दिवसांपासून शहरातील वातावरणात अचानक झालेल्या बदलामुळे तापमानाचा पारा खाली आला असला तरी अधूनमधून येणारा पाऊस आणि ऊन-सावलीचा खेळ यामुळे बदलल्या वातावरणाचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम जाणवत आहे. योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

कडक उन्हापासून बचावासाठी रुमाल, टोपी, गॉगल घालून बाहेर पडलेल्या नोकरदारांना ऐनवेळी आलेल्या पावसामुळे भिजत घरचा रस्ता गाठावा लागला होता. काल दिवसभर ढगाळ वातावरण आणि वाहत्या वाऱ्यामुळे बोचऱ्या थंडीचा सामना करावा लागला. भर उन्हाळ्यात स्वेटर किंवा रेनकोटची गरज भासली. विरुद्ध दोन टोकाचे वातावरण नाशिककरांना अनुभवायास मिळाले. भरउन्हाळ्यामध्ये पावसाळा सुरू झाल्याची अनुभूती आली.

हवामान विभागाने जिल्ह्याला ऑरेंज अॅलर्ट दिला आहे. गेल्या दोन दिवसांपासून वादळी वाऱ्यांसह पावसाने शहरासह जिल्ह्यात हजेरी लावली आहे. कडक



उन्हाळ्यात अवकाळी पावसाने दाणादाण उडविली असून, अचानक वातावरणातील बदलामुळे आरोग्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. सर्दी, खोकला, ताप, श्वसन संबंधित आजार, न्यूमोनिया आदी आजारांमध्ये वाढ झाली असून, डॉक्टरांनी योग्य ती काळजी घेण्याचे सांगितले आहे.

एकीकडे उन्हाळ्याची दाहकता कायम असताना वळवाच्या पावसामुळे वातावरणात थंड वारे आणि पावसाच्या सरींमुळे हवेत गारवा निर्माण झाला आहे. त्यामुळे खोकला, ताप, व्हायरल, इतर श्वसन संबंधित तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. हवामानात बदल झाला असून, शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्यास आजार होण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे गरज असेल तरच घराबाहेर पडण्याचा सल्ला तज्ज्ञ देत आहेत. हवामानातील या बदलाचा परिणाम लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि अगोदरपासून आजारी असलेल्या व्यक्तींवर अधिक होत असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे.

> अचानक बदललेल्या वातावरणामुळे गॅस्ट्रो, व्हायरल, न्यूमोनियासारखे आजार होऊ शकतात. शक्यतो पावसात भिजू नये, गरम पाणी प्यावे, लहान मुलांची काळजी घ्यावी. उघड्यावरील अन्न खाऊ नये. योग्य ती काळजी घ्यावी.
>
> **- डॉ. नीलेश निकम**, अध्यक्ष, आयएमए

संपादकीय

# महाराष्ट्राचे भूषण गवई

महाराष्ट्र व विशेषतः विदर्भाचे भूमिपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई ५२ वे सरन्यायाधीश झाले आहेत. स्वामी विवेकानंद यांच्या द्रष्ट्या मनाला भारतात २१ व्या शतकात देशाचे नेतृत्व शूद्र करतील, असे दिसले होते. त्याची प्रचिती आता येऊ लागली आहे. पूर्वीच्या व्यवस्थेत संधी नाकारलेल्या समूहांमधून आलेले व्यक्ती सध्या पंतप्रधान, राष्ट्रपती असणे ही देशाच्या संविधानाची ताकद असून, आता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे उद्धरलेल्या कोटी कुळांपैकी देशाच्या सर्वोच्च न्यायालयातील ५२ वे कुळ ठरण्याचा बहुमान न्यायमूर्ती भूषण गवई यांना मिळणे ही संधी नाकारलेल्या हजारो पिढ्यांचा खऱ्या अर्थाने सन्मान आहे. न्यायमूर्ती भूषण गवई यांनी आतापर्यंत मिळवलेले यश गुणवत्तेच्या बळावर मिळवले आहे. एकीकडे हजारो वर्षांपासून ज्यांना माणूस म्हणूनही जगण्याची संधी नाकारली होती, त्या मानवी समूहांना पायावर उभे राहण्यासाठी विशेष सवलत दिली म्हणून जणू काही देशांत गुणवत्ता नाहीशी झाली, अशा थाटात काही लोक मोघमपणे बोलत असतात. पण केवळ गुणवत्तेच्या बळावर सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश पदाला घातलेली गवसणी म्हणजे या प्रवृत्तीला मारलेली सणसणीत चपराक आहे. न्यायमूर्ती गवई यांना हा प्रवास करण्यासाठी अनेक कसोट्या पार कराव्या लागल्या. सामान्यांचे वकील ते देशाचे ५२ वे सरन्यायाधीश हा न्या. भूषण गवई यांचा चार दशकांहून अधिक विधी व न्यायिक क्षेत्रातील प्रदीर्घ प्रवास अनन्यसाधारण असाच आहे. गवईंचे उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात दिलेले अनेक निकाल विधी वर्तुळासाठी मैलाचा दगड ठरले आहेत. घटनात्मक अधिकारांसाठी संघर्ष करणाऱ्या कुटुंबातील न्या. भूषण गवई सदस्य आहेत. न्यायिक प्रथेनुसार विद्यमान सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी देशाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्या. भूषण गवई यांच्या नावाची शिफारस केली. न्या. भूषण गवई हे १४ मे २०२५ रोजी सरन्यायाधीशपदाची शपथ घेत आपला पदभार स्वीकारतील. सरन्यायाधीश म्हणून त्यांचा सहा महिन्यांचा कार्यकाळ म्हणूनच अनेकांगाने महत्त्वाचा ठरेल. घटनात्मक दृष्टीने महत्त्वाची अशी अनेक प्रकरणे त्यांच्या समक्ष सुनावणीच्या प्रतीक्षेत आहेत. वकिली व्यवसायास १९८५ मध्ये सुरुवात केल्यावर न्या. भूषण गवई यांनी सामान्यांचे कायदेशीर प्रतिनिधित्व, सरकारी वकील, उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश अशी पदे भूषविली आणि आता ते सरन्यायाधीश होत आहेत. वकिली व्यवसायात त्यांनी सुरुवातीला बॅरिस्टर राजाभाऊ भोसले यांच्याकडे सहाय्यक म्हणून काम केले. दिवंगत राजाभाऊ भोसले हे महाधिवक्ता व मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश होते. न्या. भूषण गवई १९९० मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात वकिलीसाठी स्थायिक झाले. दिवंगत नेते रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांचे सुपुत्र असलेल्या न्या. भूषण गवई यांनी वडिलांच्या सामाजिक चळवळीचा फार जवळून अनुभव घेतला. न्या. भूषण गवई यांच्या एकंदरीत चार दशकांच्या विधी व न्यायवर्तुळाचे अवलोकन केल्यास त्यांच्यावर समता, बंधुता आणि न्याय या संवैधानिक मूल्यांचा असलेला प्रभाव प्रकर्षाने दिसून येतो. स्वतः न्या. भूषण गवई हे मूळचे विदर्भातील. त्यांचे मूळ गाव अमरावती जिल्ह्यात दर्यापूर तालुक्यातील दारापूर. वडिलांना राजकीय पार्श्वभूमी असूनही न्या. भूषण गवईंनी वंचित शोषितांच्या न्याय्य हक्कांसाठी विधी क्षेत्राची निवड केली. त्या काळात विदर्भाचे मागासलेपण, ग्रामीण भागातील समस्या, वंचित शोषितांचे न्याय्य हक्क, सामान्य माणसाच्या दैनंदिन गरजा अशा विविध विषयांशी न्या. भूषण गवई परिचित होतेच. नुकतेच ग्रामीण भागात सर्पदंशाने होणारे मृत्यू याविषयीच्या प्रकरणाची दखल घेत देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य सचिवांना त्यांनी याविषयी प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले. भारत हा सर्पदंशाने होणाऱ्या मृत्यूची राजधानी म्हणून जगात ओळखला जातो. विधी क्षेत्रात पदार्पण केल्यावर त्यांनी या क्षेत्रात येणाऱ्या अनेक तरुणांना मदतीचा हात दिला. अनेक तळागाळातील तरुणांना त्यांनी विधी व न्यायिक क्षेत्रात येण्यास प्रवृत्त केले. त्यांच्या विधी क्षेत्रातील कारकीर्दीत वकिलीची कुठलीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसलेल्या अनेक नवोदित वकिलांना त्यांनी स्वावलंबी होण्यास हातभार दिल्याने लहान गावांतील अनेक तरुण उच्च न्यायालयात वकिली करण्याचे स्वप्न पूर्ण करू शकले. उच्च न्यायालयात हक्काचे वकील म्हणून भूषण गवई यांच्याकडे विदर्भातील सामान्य नागरिक मोठ्या आशेने बघायचे. त्या सामान्यांना वकील या नात्याने भूषण गवईंनी कधीच निराश केले नाही. हा तो काळ होता जेव्हा जिल्हा, तालुका न्यायालयानंतर सामान्य अशिलांसाठी उच्च न्यायालय हे आर्थिकदृष्टीने अखेरचे न्यायालय होते. न्यायालयीन प्रक्रिया महाग होत असताना भूषण गवई यांच्या कार्यालयाने वकील म्हणून मोठ्या प्रमाणात सामान्यांना कायदेशीर प्रतिनिधित्व देत आधार दिला. वडील रा. सू. गवई राष्ट्रीय पातळीवरचे लोकप्रिय नेते. रिपब्लिकन पक्षाची धुरा त्यांच्याकडे असूनही दादासाहेब गवईंना सर्वच समाजात अत्यंत आदराचे स्थान होते. वकिली व्यवसायात भूषण गवईंना तोच आदर आणि सन्मान सर्व स्तरांतून मिळाला. ऑगस्ट १९९२ ते जुलै १९९३ नागपूर खंडपीठात सहाय्यक सरकारी वकील म्हणून कार्यरत होते. त्यांची १७ जानेवारी २००० नागपूर खंडपीठात मुख्य सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली. १४ नोव्हेंबर २००३ मुंबई उच्च न्यायालयात अतिरिक्त न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर २४ मे २०१९ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. त्याला कारण त्यांची प्रत्येकाच्या मदतीस धावून जाण्याची वृत्ती, संघर्ष, सतत व्यासंगातून वकिलीत प्रचंड जनसंपर्क, लोकप्रियता भूषण गवईंना प्राप्त झाली. सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीशपदावर नियुक्ती झाल्यावर अनेकदा परिचित, संबंधित व्यक्तींची कायदेशीर प्रकरणे सुनावणी आल्यावर न्या. गवईंनी ती प्रकरणे माझ्या समक्ष लावू नयेत, असे विनम्रपणे न्यायालयाच्या प्रशासनास निर्देश दिले. वडिलांची राजकीय पार्श्वभूमी, स्वतः लोकप्रियता, दांडगा जनसंपर्क याचा कुठलाही परिणाम न्यायाधीशांची भूमिका पार पाडत असताना दिसला नाही. न्या. गवईंच्या अनन्यसाधारण आणि कठोर निर्णयांनी त्यांचे वेगळेपण नेहमीच अधोरेखित केले. अगदी काँग्रेस नेते राहुल गांधींची खासदारकी रद्द झाल्यावर त्या निर्णयाला आव्हान देण्यात आले. जुलै २०२३ मध्ये त्यावर त्यांनी प्रकरणाच्या सुनावणीच्या अगोदरच दोन बाजूंच्या वकिलांना वडिलांच्या काँग्रेस पक्षासमवेत असलेल्या संबंधांच्या बाबतीत आठवण करून देत प्रकरण सुनावणीस घ्या अथवा नाही हे कळवावे, असे विनम्रपणे विचारले होते. दोन बाजूंनी कुठलाही आक्षेप नसल्याचे कळवल्यावरच त्यांनी ते प्रकरण सुनावणीस घेतले. नुकतेच तेलंगणा विधानसभेत बीआरएस पक्षाच्या आमदारांच्या पक्षांतराच्या बाबतीत तेलंगणा विधानसभा अध्यक्षा आणि मुख्यमंत्र्यांच्या विधानाला त्यांनी चांगलेच फटकारले. पक्षांतरबंदी कायद्यानुसार निर्णय न घेतल्यास संपूर्ण न्याय करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या घटनात्मक अधिकारांची जाणीव करून दिली. न्या. भूषण गवईंचे उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात दिलेले अनेक निकाल विधी वर्तुळासाठी मैलाचा दगड ठरले आहेत. घटनात्मक अधिकारांसाठी संघर्ष करणाऱ्या कुटुंबाचा वारसा न्या. भूषण गवई चालवत आहेत. समता, बंधुता आणि न्यायाचे बाळकडू त्यांना कौटुंबिक संस्कारांतून अगोदरच प्राप्त आहेत.

# 'कठपुतली पाकिस्तान'ला खेळवणारे आका!

स्वातंत्र्यपूर्व काळात बॅरिस्टर मोहम्मद अली जिना यांच्या लक्षात आले की, आपण स्वतंत्र मुस्लिम राष्ट्र पदरात पाडू शकतो, तेव्हा त्यांची राजकीय पाऊलं वेगळी पडायला लागली. स्वातंत्र्यपूर्व काळातच ते मुस्लिम लीगचे पहिल्या क्रमांकाचे नेते बनले. १९१६ पासून ते ऑल इंडिया मुस्लिम लीगचे अध्यक्ष व मुस्लिम लीगचे सर्वेसर्वा होते. बॅरिस्टर जिना ऑगस्ट १९४७ च्या कालखंडात गंभीर आजारामुळे वैद्यकीय सेवा घेत होते. महात्मा गांधी भारत-पाकिस्तानच्या फाळणीच्या पार्श्वभूमीवर बोलले होते की, 'एक वेळ माझ्या शरीराचे दोन तुकडे होतील, पण भारताची फाळणी होणार नाही.' फाळणी झाली तेव्हा जिना यांचे वजन आजारपणामुळे ३५ किलोपर्यंत खाली आले होते. काहीच महिन्यांचे ते सोबती होते. ही बातमी काँग्रेसच्या उच्चपदस्थांना कळली असती तर? या एका बातमीमुळे भारताचा इतिहास बदलला असता. काही महिन्यांचा अवधी घेतला असता तर फाळणीचा विषयच संपला असता. कारण जिनाच पैगंबरवासी झाले असते.

हेच बॅरिस्टर मोहम्मद अली जिना पाकिस्तानरूपी कठपुतली तयार करणारे निर्माता ठरले. आपोआपच ही कठपुतली त्यांचा अत्यंत विश्वासू सहकारी लियाकत अली खान यांच्या हाती आली. मोहम्मद अली जिना यांनी लियाकत अली यांना पाकिस्तानचे पहिले पंतप्रधान केले होते. 'कठपुतली' आता पंतप्रधान अली खान यांच्या हातचे बाहुली बनली. कारण बॅरिस्टर जिना स्वातंत्र्यानंतर अंथरुणातच खेळले आणि त्या आजारातच ११ सप्टेंबर १९४८ ला मृत्यू पावले. ते शेवटपर्यंत पाकिस्तानचे पहिले गव्हर्नर जनरल होते. निर्मितीपासून पाकिस्तान हे देशावर राज्य करणारे सैनिकी हुकूमशहा यांच्या हातचेच बाहुले राहिले आहे. विशेष म्हणजे, हे हुकूमशहासुद्धा जागतिक महासत्तांचा वरदहस्त असेपर्यंत सत्तेवर राहिलेले आहेत. आंतरराष्ट्रीय व अंतर्गत दबावामुळे त्यांना निवडणुका घेऊन कठपुतली देशाचे, 'कठपुतली लोकशाही सरकार' स्थापन करावे लागले आहे.

पाकिस्तानच्या परराष्ट्र धोरणाचे सर्वांत पहिले ध्येयधोरण म्हणजे भारताचा विरोध करणे. दुसरे धोरण म्हणजे पश्चिमेकडून लागून असलेला देश अफगाणिस्तानच्या भूमिकेवर राजकीय दिशा ठरवणे, तिसरे धोरण म्हणजे देशाला आर्थिक मदत मिळवण्यासाठी राजकीय धोरणानुसार महासत्तांकडून आर्थिक मदत मिळवणे आणि चौथे धोरण म्हणजे 'इस्लामिक पाकिस्तान' राष्ट्राचा गवगवा करून इस्लामी जगतात जास्तीत जास्त मित्र मिळवण्याचा प्रयत्न करणे व त्यातून स्वार्थ साधणे. अशा चंचल राजकीय दृष्टिकोन असलेल्या देशाचा शेजार भारताला लाभला आहे व त्यासोबतच केवळ विस्तारवादाचाच हव्यास असलेला चीन हासुद्धा आपला देश शेजारी आहे. भारत स्वातंत्र्यानंतर पंडित नेहरूंच्या समाजवादी विचारसरणीने व अलिप्त परराष्ट्र धोरणाच्या नियमाने रशिया आपला जवळचा मित्र देश बनला. तेव्हाच पाकिस्तान पाश्चिमात्य देशांशी संपर्क करू लागला. पाकिस्तानने प्रारंभापासूनच रशियाशी फारकत घेऊन अमेरिकेशी जवळीक करणे सुरू केले. भारत व अफगाणिस्तानमधील सीमारेषा जी १८९३ मध्ये ब्रिटिशांनी आखली होती. ती सीमारेषा आता अफगाणिस्तानची पाकिस्तानला मिळाली होती. ती 'ड्युरंड लाइन' अफगाणिस्तानला मान्य नसल्याने १९४७ मध्येच संयुक्त राष्ट्रसंघामध्ये पाकिस्तानच्या सदस्यत्वासाठी विरोध करणारा पहिला देश अफगाणिस्तान ठरला. सोबतच पाकिस्तानमधील पख्तून लोकांसाठी स्वतंत्र राष्ट्राची मागणी अफगाणिस्तानने केली होती. त्यामुळे अफगाणिस्तानसोबतचे संबंध विकोपाला गेले होते. थोडक्यात आजपर्यंत भारत हा कायमचा शत्रूराष्ट्र म्हणून पाकिस्तान पाहत आला आहे व अफगाणिस्तानसोबत सोयीनुसार जागतिक महासत्तांच्या स्वार्थीय धोरणानुसार पाकिस्तान पारडे बदलत आला आहे. यासोबतच सौदी अरेबियाशी इस्लामिक बांधिलकी म्हणून संबंध ठेवून आर्थिक व धार्मिक दृष्टिकोनातून फायदा मिळवणे तसेच त्यांच्यापासून वेळोवेळी मोठ्या प्रमाणात आर्थिक कर्ज व मदत मिळवणे तसेच महत्त्वाचे म्हणजे तेलाचा वाजवी दरात पुरवठा मिळवणे हे पाकिस्तानचे सौदी अरेबियासोबत धोरण राहिले आहे. कतार व तुर्कस्तान मात्र पलीकडच्या काळातील




विविध संकटात धावून येणारे व अल्पकालीन मदत करणारे देश झाले आहेत. या क्षणालासुद्धा पाकिस्तानच्या कराची बंदरावर तुर्कस्तानने आपली युद्धनौका पाठवलेली आहे. जागतिक आकाच्या हातचे बाहुले अशा या धरसोड वृत्तीच्या परराष्ट्र राजकीय धोरणामुळे पाकिस्तानने जागतिक स्तरावर आपली विश्वासार्हता रसातळास नेली आहे. दक्षिण आशिया भागावर जागतिक



भारताभोवतालचे अस्वस्थ वर्तमान

हेमंत चोपडे
७३५०७०५०९१

महासत्तांना सत्ता संतुलन ठेवण्यासाठी अनेक महासत्तांनी पाकिस्तानचा वापर करून घेतला आहे आणि आजही करून घेणे सुरू आहे. १९६२ चे भारताचे चीनसोबतचे युद्ध होईपर्यंत पाकिस्तान चीनच्या सावलीत सुद्धा नव्हता. भारताचा शत्रू तो आपला मित्र या न्यायाने पाकिस्तानने चीनसोबत मैत्री केली. तसेच चीनलासुद्धा भारतावर शह ठेवण्यासाठी दक्षिण आशियामधील देश हवाच असतो. तीसुद्धा भूमिका पाकिस्तान वेळोवेळी करीत आला आहे. सध्या पाकिस्तान तर चीनच्या पूर्ण राजकीय व आर्थिक दबावाखाली जगत आहे. १९७९ च्या आसपास अफगाणिस्तानवर रशियाने नियंत्रण मिळवले. दक्षिण आशियावर अमेरिकेचे वर्चस्व असण्यासाठी अमेरिकेने पाकिस्तानला हाताशी घेतले. रशियाची अफगाणिस्तानमधील राजवट उलथून टाकण्यासाठी अमेरिका व सौदी अरेबिया यांच्या मदतीने मुजाहिद्दीन गटांना पाकिस्तानने प्रशिक्षण देणे सुरू केले. १९९० येईपर्यंत पाकिस्तानने तालिबानच्या वाढीस भरघोस मदत केली. १९९६ ला अफगाणिस्तानमध्ये तालिबानला सत्तेवर आल्यानंतर अमेरिकेचा खेळ पूर्ण झाला. आता पुन्हा अफगाणिस्तानमधून तालिबानचे पतन करण्यासाठी पाकिस्तानच्या मदतीने २००१ मध्ये अमेरिकेने अफगाणिस्तानवर कब्जा मिळवला. याच काळात सौदी अरब व मुस्लिम देश यांच्याशी ताळमेळ ठेवण्यासाठी पाकिस्तानने तालिबान व हक्कानी नेटवर्कला आश्रय देणे सुरू केले. सोबतच 'अफगाणिस्तानची टीटीपी म्हणजे तेहरिके तालिबान पाकिस्तान ही दहशतवादी संघटना पाकिस्तानमध्ये घातपात करते' असे आरोपही सुरू केले. कालांतराने अमेरिकेच्या अफगाणिस्तानमधून सैन्य वापसीनंतर तालिबान पुन्हा सत्तेवर आले. तालिबानसोबतची धरसोड वृत्तीचे स्वार्थी राजकारण, तालिबानी सत्तेवर आल्यानंतर पूर्णपणे समजून चुकले आणि पुन्हा अफगाणिस्तान-पाकिस्तान संघर्ष सुरू झाला. २०२३-२४ मध्ये लाखो अफगाण निर्वासितांना पाकिस्तानने पाकमधून हाकलले. आता तालिबानला साथ देणारा, त्यांना वाढवणारा आश्रयदाता पाकिस्तान त्यांच्यापासूनच त्रस्त आहे. १९६२ पासून चीनकडे झुकलेला पाकिस्तान १९७० येईपर्यंत अमेरिकेकडे पूर्णपणे वळला होता. १९७१ च्या बांगलादेश निर्मितीच्या वेळी अमेरिकेने आपल्या युद्धनौका अरबी समुद्रात आणल्या होत्या. पण रशियाने जगाला ठणकावून सांगितल्यामुळे की, 'भारतावरच आक्रमण हे रशियावरचे आक्रमण असेल, हे जगाने लक्षात ठेवावे' यामुळे अमेरिका त्यावेळी मूग गिळून बसला होता. ८० च्या दशकामध्ये अमेरिकेने दूर लोटल्यामुळे मुस्लिम राष्ट्रांची जवळीक करणे पाकिस्तानने सुरू केले. १९७१ च्या युद्धात अमेरिका व संयुक्त राष्ट्र संघाने मदत न केल्याने पाकचा राग होताच. याच काळात पाकिस्तानचे पंतप्रधान जुल्फिकार अली भुट्टो यांनी जागतिक स्तरावर 'इस्लामी ब्लॉक' नावाने इस्लामी जागतिक शक्ती करण्याचा प्रयत्न केला. ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कॉर्पोरेशन मध्ये सक्रिय भूमिका घेतली. या काळात चीनसोबतचे घनिष्ठ संबंध होते तर रशियासोबतच तणावाचे! ९० च्या दशकातही पाकिस्तानला अमेरिका व सौदी अरेबियाची खूप मोठी मदत होत होती. आयएसआय व सीआयए यांचे सहकार्य मिळत होते. भारताने अणुचाचणी केल्यामुळे १९९८ मध्ये ही पाकिस्तानने अणुचाचणी केली. त्यावेळी पाकिस्तान एकाकी पडला होता. ११ सप्टेंबर २००१ पर्यंत दहशतवाद व आतंकवादाने होरपळत असलेल्या भारताचे कथन करणे, स्वार्थ दृष्टिकोन व त्यानुसार राजकारण करणाऱ्या महासत्ता बघत नव्हत्या. पण ११ सप्टेंबरला अमेरिकेचे ट्वीन टॉवर्स पडल्यानंतर अमेरिकेचे डोळे उघडले. त्याच्या अंगणातच दहशतवादाने थैमान मांडले होते. येथून पुढे अमेरिकेने पाकिस्तानशी खरीखुरी मैत्री कधीच केली नाही. गरजेनुसार वेळेनुसार पाकिस्तानसोबत मैत्री केली, पण ती दिखावटीच होती. एकाच वेळी पाकिस्तानमध्ये हल्ले करणे व मैत्रीचे नाटक करणे असे अमेरिकेने केलेले आहे. २०११ ते २०२० मध्येसुद्धा पाकिस्तानचे चीन केंद्रित परराष्ट्र धोरण होते. सोबतच इस्लामी राष्ट्रात संतुलन साधण्याचा प्रयत्न पाकिस्तान करीत असल्याचे दिसले. या काळात भारत व अमेरिका यांचे संबंध दृढ झाले हे जगाने बघितले. पण त्याच वेळी रशियासोबतचे संबंधही बिघडले नाहीत. २०२१ला अफगाणिस्तानमध्ये तालिबानची सत्ता पुन्हा आल्यानंतर, 'तेहरीके तालिबान पाकिस्तान' या अफगाणिस्तानस्थित संघटनेचे पाकिस्तानवर हल्ले वाढले. प्रचंड आर्थिक संकट, चीनने फायदा उचलला नसता तरच नवल! पाकिस्तानने १९५८ ला पहिली लष्करी हुकूमशाही अयुब खान यांच्या रूपाने बघितली. १९७७ मध्ये जिया उलहक यांच्या रूपाने दुसरी लष्करी हुकूमशाही आली. तर तिसरी हुकूमशाही १९९९ ला परवेज मुशर्रफ यांच्या रूपाने. त्या त्यावेळी पाकिस्तान देश हा या हुकूमशांच्या हातचं बाहुलच होता. पाकिस्तानच्या जनतेविषयी काय बोलावं! थोडक्यात या कठपुतली पाकिस्तानला आजपर्यंत अनेकांनी खेळवलं आहे. १९४७ पासून तो आजपावेतो कठपुतली तीच, फक्त बदलला आहे तो खेळ करणारा! खेळवणारा! आका! कधी अमेरिका तर कधी चीन.

# रेडक्रॉस : निःस्वार्थ सेवा देणारी संस्था

रेडक्रॉस ही एक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्था आहे. ही संस्था गरजूंना आपत्कालीन सेवा देते. ही संस्था रुग्ण, युद्धात घायाळ, नैसर्गिक आपत्तीमध्ये अडकलेल्या लोकांना जीवनदान देण्याचे तसेच घायाळांवर वैद्यकीय उपचार करून त्यांना मदत करण्याचे कार्य करते. रेडक्रॉस मोहिमेचे जन्मदाते जीन हेन्री ड्यूनेन्ट यांचा जन्म दि. ८ मे १८२८ रोजी झाला. त्यांच्या जन्मदिन संपूर्ण विश्वात रेडक्रॉस दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक रेडक्रॉस दिनाला आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक दिन म्हणूनदेखील साजरा केला जातो. ही संस्था तब्बल दीडशे वर्षांपासून काम करीत आहे. ही संस्था नैसर्गिक आणीबाणीप्रसंगी अडकलेल्या गरजूंना आपली निःस्वार्थ सेवा देत असते.

भारतात इ. स. १९२० मध्ये पार्लियामेंट्री ॲक्टच्या अंतर्गत भारतीय रेडक्रॉस समितीचे गठन केले गेले. तेव्हापासून रेडक्रॉसचे स्वयंसेवक आपली निःस्वार्थ सेवा देत आहेत. विश्वाचे तब्बल दोनशे देश एकाच विचारांवर ठाम आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस संस्था नैसर्गिक आपदांमध्ये अडकलेल्या लोकांना तसेच युद्धामध्ये घायाळ झालेल्या वीरांना मदतीचा हात देऊन त्यांना सहाय्य करतात.

रेडक्रॉसचा मुख्य उद्देश रुग्णांची, युद्धामध्ये घायाळ झालेल्या लोकांची सेवा करणे आहे. सन १९१९पासून रेडक्रॉस मानवाचा त्रास कमी करण्याकडे विशेष लक्ष देत आहे. हेन्रीने सेवाकार्यात वाहिलेल्या या समितीला रेडक्रॉस नाव दिले. या समितीची ओळख पटण्यासाठी एका पांढऱ्या पट्टीवर लाल रंगाच्या क्रॉस चिन्हाला मान्य करण्यात आले. आता हे चिन्ह संपूर्ण विश्वात मानवास समर्पित निःस्वार्थ सेवाभाव म्हणून ओळखले जाते.

पांढऱ्याशुभ्र पार्श्वभूमीवर अधिक चिन्हासारखी तांबडी फुली हे या संघटनेचे बोधचिन्ह असून, त्यावरूनच संघटनेचे 'रेडक्रॉस' हे

कृष्णकुमार निकोडे
७७७५०४१०८६

नाव पडले आहे. हेन्री ड्यूनेन्ट हे स्वित्झर्लंडचे नागरिक असल्याने त्या देशाच्या सन्मानार्थ त्याच्या तांबड्या पार्श्वभूमीवरील पांढरी फुली असलेल्या राष्ट्रध्वजावरच्या रंगांची अदलाबदल करून हे चिन्ह तयार करण्यात आले आहे. इस्लामी राष्ट्रांत तांबड्या फुलीऐवजी पांढऱ्या पार्श्वभूमीवर चंद्रकोर-रेडक्रेसेंट तर इराणमध्ये उगवता तांबडा सूर्य व सिंह-रेड लायन अँड सन तर इस्राइलमध्ये तांबडा डेव्हिडचा तारा असा या बोधचिन्हात बदल केलेला आहे. हे बोधचिन्ह असलेली वाहने, इमारती तसेच ते धारण करणाऱ्या व्यक्ती यांच्यावर गोळीबार, बॉम्बफेक अथवा हल्ला करू नये, असेही ठरविण्यात आलेले आहे. अर्थात अशा वाहनांत वा इमारतींत युद्धसाहित्य अथवा सैनिक असता कामा नये. अशा प्रकारे संरक्षण योग्य ठिकाणे व व्यक्ती ओळखू येण्यासाठी हे चिन्ह वापरतात. आता तर हे चिन्ह वैद्यकीय व्यवसायाचेही निदर्शक झाले आहे.

सध्याच्या काळात १८६ देशांमध्ये रेडक्रॉस समिती कार्य करीत आहे. सन १९०१ साली हेन्री ड्यूनेन्ट यांना त्यांच्या सेवाभावास पहिले नोबल शांती पारितोषिक देण्यात आले. विश्वाची पहिली ब्लड बँक- रक्तपेढी अमेरिकेमध्ये सन १९३७ साली उघडली गेली. आजच्या काळात जगातील जास्तीत जास्त ब्लड बँका रेडक्रॉस आणि त्यांच्या सहयोगी संस्था राबवत आहेत. रेडक्रॉस संस्थेने राबवलेल्या जनजागृती मोहिमेमुळे हजारो लोक थॅलेसेमिया, कर्करोग, रक्ताल्पता-ॲनिमिया यांसारख्या आजारांपासून वाचत आहेत.

रेडक्रॉस संघाच्या रुग्णसेवा कार्यालयात सन १९५१ साली समाजसेवा विभाग समाविष्ट करण्यात आला. हा विभाग माहितीविषयक सेवा पुरवितो. रेडक्रॉसच्या शिष्यवृत्तीसाठी उमेदवार निवडतो व सल्ला देतो. तसेच रेडक्रॉस रुग्णसेवा शाळा, रुग्णपरिचारिकांचे मदतनीस व गृहरुग्णसेवा शिक्षक यांच्या प्रशिक्षणाच्या संदर्भात मार्गदर्शन करतो. संघाच्या प्रादेशिक परिषदांमुळे राष्ट्रीय संस्थांना विविध देशांसमोर येणाऱ्या सामाईक अडीअडचणींच्या माहितीची देवाणघेवाण करता येते. जागतिक आरोग्य संघटना, आंतरराष्ट्रीय निर्वासित संघटना, अन्न व कृषी संघटना, युनेस्को इत्यादींची उद्दिष्टे व रेडक्रॉसची उद्दिष्टे यांत बऱ्याच बाबतींत सारखेपणा असल्याने संघ त्यांच्याशी संपर्क ठेवून असतो व त्यांच्याशी सहकार्यही करतो. संघाचे वेगळे कनिष्ठ रेडक्रॉस कार्यालय असून, त्याच्यातर्फे कनिष्ठ विभागांना सहाय्य देण्यात येते. राष्ट्रीय रेडक्रॉस संस्थांमार्फत ७५ पेक्षा अधिक देशांमध्ये मुख्यत्वे प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांचे कनिष्ठ विभाग संघटित करण्यात आलेले आहेत. विविध वंशांच्या भिन्न संस्कृतींत वाढणाऱ्या मुलांमधील मैत्री व परस्परांविषयीची जाणीव वाढविणे, हेच या विभागांचे मुख्य उद्दिष्ट आहे.

जनमनाचे प्रतिध्वनी

# भारताचे पाकला चोख प्रत्युत्तर

भारतीय संरक्षण दलाच्या तिन्ही दलांनी १९७२ नंतर प्रथमच संयुक्तपणे कारवाई करून पाकव्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानमध्ये घुसून नऊ दहशतवादी छावण्यांना लक्ष्य करून एअर स्ट्राइकची अचूकता दाखविली. भारताने फक्त दहशतवादी तळांवर हल्ले केले. पाकिस्तानी लष्करांवर आणि नागरिक वस्तीवर हल्ले केले नाहीत. पण, भारताने पाकिस्तानला इशारा दिला आहे की, यापुढे भारताकडे वाकड्या नजरेने पहाल तर त्याची किंमत चुकवावी लागेल, असा इशारा दिला आहे.

साहजिकच भारतात आनंदाची लहर उमटली. अमेरिकेला आणि आंतरराष्ट्रीय समुदायाला विश्वासात घेऊन ही कारवाई केली असणार. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले होते की, कल्पना करणार नाही अशा प्रकारे धडा शिकवू, ते त्यांनी प्रत्यक्षात दाखवून दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय संरक्षण दलाचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे. कारण मोदींनी जरी लष्कराला अधिकार दिले असले, तरी शेवटी त्याची जबाबदारी ही मोदींवर येते. ज्या २६ जणांच्या पत्नींच्या समोर कुंकू पुसले गेले. या रागातून या मोहिमेला ऑपरेशन सिंदूर असे भावनिक नाव देण्यात आले. 'ऑपरेशन सिंदूर' या यशस्वी कारवाईनंतर भारतीय संरक्षण दलातील दोन महिला अधिकाऱ्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन संपूर्ण माहिती जनतेला दिली. हे सुरक्षेच्या दृष्टीने एक सकारात्मक पाऊल ठरते आहे. या घटनेने अनेक महत्त्वाचे पैलू समोर आले आहेत. महिलाही देशाच्या संरक्षणासाठी महिलाही खांद्याला खांदा लावून लढत आहेत.

भारत हा शांतता प्रेमी, संयमी देश आहे. आपण कधीही कोणावर प्रथम हल्ले केलेले नाहीत. पण भारतासोबत सतत असे घडत राहिले तरी तो शांत राहील, अशी स्थिती राहिलेली नाही. भारत बदलला आहे, तो चोख प्रत्युत्तर देतो हे भारताने पाकिस्तानच्या कारवाया संपुष्टात आणण्यासाठी २०१६ मध्ये सर्जिकल स्ट्राइक आणि २०१९ मध्ये एअर स्ट्राइक केले. आता ऑपरेशन सिंदूर हे २०१९ पेक्षा मोठी कारवाई केली, हे पुन्हा एकदा दिसून आले. भारताने जगापुढे पाकिस्तानला उघडे पाडले आहे. पाकिस्तान हा असा देश आहे की, जिथे लोकशाही नावाचा प्रकारच नाही. तिथल्या राजकीय परिस्थितीला कोणताही अर्थ राहिलेला नाही. लष्कराच्या आणि दहशतवादांच्या पाकिस्तान आपले अस्तित्व सिद्ध करू पाहत आहे. पण पाकिस्तान केवळ भारताचा शत्रू नाही तर दहशतवाद्यांचा पोशिंदा आहे, हे जगाच्या नकाशावर आणून दिले आहे. पाकिस्तानने पुन्हा एकदा काही केले तर हल्ला रोखण्यासाठी भारत कोणती पावले उचलेल हे पहावे लागेल.

**- सुनील कुवरे, शिवडी**


## तरुणाई लग्नाच्या बाबतीत उदासीन का?

आजची तरुणाई लग्नाच्या बाबतीत उदासीन आहे तर काहींना लग्न करायची इच्छा असूनही वाढलेल्या अपेक्षांमुळे किंवा तडजोड करायची तयारी नसल्यामुळे योग्य तसा जोडीदार मिळत नाही. प्रत्येकाला अगदी मनासारखा जोडीदार मिळेलच असे नाही. सद्यपरिस्थितीत फक्त मुलगी द्या हो, अशी विणवणी वर पित्याकडून वधू पित्याकडे होताना दिसते. वधू पित्याकडून नोकरदार मुलांची मागणी केली जाते. परंतु ही मानसिकता बदलायला हवी. शेतकरी, व्यवसायधारक यामध्ये कर्तबगारी करून दाखवणारी मुले आहेत. मुलांचे लग्न जमवण्यासाठी किंवा सून म्हणून मुलगी आणण्यासाठी अनाथालयातील मुलीचा स्वीकार करणे असे अनेकांचे मत आहे, पण आयुष्याच्या प्रत्येक वळणावर जशी थोडीफार तडजोड आपण करत असतो तशीच तडजोड जोडीदाराबरोबर केली तर बिघडलं कुठं? कारण या जगात कोणीच परफेक्ट नाही.

**- राजू जाधव, बेळगाव**

# शुद्ध वातावरण व पवित्र आचरण

आपल्या घरातले वातावरण शुद्ध, शांत आणि पवित्र असावे. आपल्याकडे येणाऱ्या माणसाला परत जाऊच नये असे वाटावे. अगदी भगवंताच्या इच्छेने प्रपंच चालला आहे असे समजून, त्या प्रपंचात विद्या, वैभव, घरदार इ. सर्व काही यश संपादन करा; अगदी एखाद्या राजयोग्याप्रमाणे प्रपंचात ऐषआरामात राहून गाद्यागिरद्यांवर लोळा; पण हे करीत असताना तुमचे अंतःकरण मात्र भगवंताच्या प्रेमाने ओथंबलेले राहू द्या. कोणाशी वाद घालीत बसू नका. जगाचा मान फार घातक आहे; त्याची चटक लागली की मनुष्य त्याच्यामागे लागतो, नंतर मान मिळविण्याची कृती थांबते आणि मानही नाहीसा होतो. जगातले अजिंक्य पुरुषसुद्धा कुठेतरी विषयात गुंतलेले असतात, तिथे त्यांचा घात होतो. जगाला ते भारी असतील, पण त्या विषयापुढे त्यांचे काहीच चालत नाही. प्रेमात गुंतू नका, तसे द्वेषमत्सरातही गुंतू नका; दोन्ही सारखेच घातक आहेत. भगवंताचा विसर हा कोणत्याही कारणाने झाला तरी बरा नाही; मग प्रपंचात सुखसोयी असल्याने तो होवो किंवा प्रपंचात दुःख झाल्यामुळे होवो. ढोंग, बुवाबाजी इ. च्या भानगडीत तुम्ही पडू नका; अगदी काहीही न केलेत तरी चालेल, पण ढोंग मुळीच करू नका; आणि सर्वांनी माझ्यावर कृपा करा, अगदी अनुभवाने मी सांगतो, की बुवा होण्याच्या फंदात तुम्ही पडू नका. आपले कर्तव्य भगवंताच्या स्मरणात करून, त्याचे अनुसंधान अखंड टिकू द्या.



विचारधन

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### आचार्य उपेंद्र यांच्या नेतृत्वाखाली रविवारी गणेशविद्या महायज्ञ



**नाशिक :** अंतर योग फाउंडेशन एक पवित्र आणि परिवर्तनात्मक आध्यात्मिक चळवळ गणेश विद्या महायज्ञ आयोजित करत आहे. हा एक ऐतिहासिक महासोहळा असून, भारताला विश्वगुरू बनविण्याच्या दिशेने टाकलेले एक महान पाऊल आहे. महायज्ञ सोहळा रविवारी, ११ मे २०२५ रोजी सकाळी ७.३० ते रात्री १०.३० दरम्यान सिडको एक्झिबिशन सेंटर, वाशी, नवी मुंबई येथे आचार्य उपेंद्रजी यांच्या नेतृत्वाखाली तो संपन्न होत आहे. अंतर योग गणेश विद्या महायज्ञ कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य आहे. या कार्यक्रमात राजकारण, उद्योग, अध्यात्म या क्षेत्रातील मान्यवर पाहुणे आणि हजारो साधक उपस्थित राहणार आहेत. जगभरातील साधक ऑनलाइन स्ट्रिमिंगद्वारे या कार्यक्रमात सहभागी होऊ शकतील.आचार्य उपेंद्रजी यांच्या दृढ श्रद्धेनुसार आणि महर्षी अगस्त्यांनी २००० वर्षांपूर्वी नाडी ज्योतिषामध्ये केलेल्या भविष्यवाणीनुसार, हा कार्यक्रम उपस्थित आणि दूरदृष्टी असलेल्या आत्म्यांमध्ये गहन परिवर्तन घडवून आणणारा आहे. या कार्यक्रमाचे सहभागी होणारे भक्त निश्चितच एकाग्रता, स्मरणशक्ती व निर्णयक्षमता यामध्ये लक्षणीय वाढ अनुभवतील. त्यांना नकारात्मक ऊर्जा, अनपेक्षित अडथळे आणि ग्रहदोषांपासून दैवी संरक्षण मिळेल. शारीरिक आणि मानसिक आरोग्यातही ठळक सुधारणा दिसून येईल, असे आचार्य उपेंद्रजी म्हणाले. अंतर योग गणेश विद्या महायज्ञ हे एक वैश्विक निमंत्रण आहे. जीवनात आध्यात्मिक जागृती साधण्याचे, आगामी संकटांपासून संरक्षण मिळवण्याचे आणि यश व समृद्धीकडे वाटचाल करण्यासाठीचे हे आयोजन आहे. सर्वांना या जीवनात परिवर्तन घडवणाऱ्या अद्वितीय कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी हार्दिक आमंत्रण आहे.

### गौरव चोप्राचे ५ वर्षांनी टीव्हीवर पुनरागमन



**मुंबई :** सोनी सबवरील 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेतील हृदयस्पर्शी आणि आपल्या जीवनाशी सुसंबद्ध कथानकामुळे प्रेक्षकांना ही मालिका भावली आहे. या मालिकेत आता सुपरिचित अभिनेता गौरव चोप्राची एंट्री होणार आहे. प्रोफेसर राजवीर शास्त्री या चाणाक्ष, काहीशा विक्षिप्त कायद्याच्या प्राध्यापकाच्या रूपात तो दिसणार आहे.

कोर्टात दमदार स्वरूपात वकिली करण्याबद्दल तो ओळखला जातो. एका नवीन लक्षवेधी अध्यायात, प्रोफेसर राजवीर शास्त्रीच्या एंट्रीने कथानकाला एक नाट्यमय वळण मिळते. एकेकाळचा कायद्यात तज्ज्ञ असलेला प्रोफेसर शास्त्री आता कडवट आणि शंकेखोर झाला आहे. कोर्टात उत्कृष्ट युक्तिवाद करणाऱ्या आणि आकर्षक व्यक्तिमत्वाच्या राजवीरची कारकीर्द एका घोटाळ्यामुळे नष्ट झाली आहे. त्याचा व्यावसायिक नावलौकिक तर त्यात धुळीचा मिळालाच, पण त्याच्या व्यक्तिगत जीवनालादेखील त्याची झळ लागली. त्याचा विवाह आणि मुलीशी असलेला बॉन्डदेखील संपुष्टात आला. पुष्पाची अपार ऊर्जा राजवीरच्या हरलेल्या उत्साहाला आव्हान देते आणि या दोन विसंगत दिसणाऱ्या व्यक्तींमध्ये एक दमदार आणि भावनात्मक नात्याचा मार्ग खुला होतो. आपल्या भूमिकेविषयी बोलताना गौरव चोप्रा म्हणतो, मी जेव्हा ही पटकथा पहिल्यांदा वाचली, तेव्हा राजवीरच्या स्वभावातील गुंतागुंत मला आकर्षक वाटली. तो असा माणूस आहे, जो अत्यंत हुशार पण आतून कोसळलेला आहे. प्रेक्षकांना हे नवीन कथानक बघायला नक्की आवडेल, त्यात भावनिक चढ-उतार बघायला मिळती.

# प्रत्येक नागरिकाने आपत्ती व्यवस्थापनाचे धडे घेतले पाहिजेत

## मंत्री मंगलप्रभात लोढा : 'आयटीआय'मध्ये नव्या सहा अभ्यासक्रमांचीही घोषणा

**मुंबई : आपत्ती व्यवस्थापन ही काळाची गरज आहे. आपत्ती मानवनिर्मित असो किंवा नैसर्गिक याचे व्यवस्थापन आणि बचाव कसा करावा, याचे प्रशिक्षण प्रत्येक नागरिकाने घेतले पाहिजे. असे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान सीमेवरील तणावाच्या पार्श्वभूमीवर कौशल्य विकास विभाग आणि अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील आयटीआयच्या विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्यात येत आहेत. मंत्री श्री. लोढा यांच्या हस्ते ठाणे येथील राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आपत्ती व्यवस्थापनाविषयीच्या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. राज्यातल्या सर्व औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात ऑनलाइन आपत्ती व्यवस्थापनाच्या कार्यशाळा होणार आहेत.

मंत्री लोढा म्हणाले की, मानवाने प्रगती केली असली तरी, आपत्तीचे स्वरूप ही बदलले असून, या पार्श्वभूमीवर बचावाचे प्रशिक्षण नव्या पिढीला देण्याचा उद्देश आहे. 'आयटीआय'मध्ये सहा नव्या अभ्यासक्रमाची घोषणा केली. यात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ईव्ही इलेक्ट्रिक वाहन व्यवस्थापन, इंडस्ट्रिअल रोबोटिक्स आणि थ्री डी प्रिंटिंग, ड्रोन तंत्रज्ञान, सोलर टेक्निशियन या अभ्यासक्रमांचा समावेश असून येत्या शैक्षणिक वर्षापासूनच याची सुरुवात होणार आहे.

दोनदिवसीय शिबिरात अनिरुद्धाज अकॅडमी ऑफ डिझास्टर मॅनेजमेंटचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील मंत्री यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. तर राज्याचे माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित यांनी आयटीआय विद्यार्थ्यांना नागरी संरक्षण या विषयावर ऑनलाइन कार्यशाळेत मार्गदर्शन केले.





राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतल्या शिबिराच्या सुरुवातीला डॉ. लीना गडकरी यांनी आपत्ती व्यवस्थापन संकल्पना सांगितली. या दोनदिवसीय शिबिरात बचाव आणि मदतकार्य याचे प्रशिक्षणही देण्यात येणार आहे. मानवनिर्मित आपत्ती यात युद्धाचा समावेश असून, त्या काळात घ्यायची काळजी, उपचार आणि बचाव यावरही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. बचावाची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांनी सादर केली. राजमाता जिजाऊ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य श्रीमती माने यांनी आभार मानले.




# दांडेकर टेक्निकल इन्स्टिट्यूटचा स्नेहमेळावा, फॅशन शो उत्साहात

**नाशिक : प्रतिनिधी**

प्रत्येकात वेगळेपण असते. अंगभूत कलागुण असतात. ते वेळेत ओळखले पाहिजेत. विविध क्षेत्रात नाशिकमध्ये भरपूर टॅलेंट आहे. त्यांचा योग्य उपयोग करून घेतला पाहिजे. नव्या पिढीतील युवक, युवतींनी नवनवीन कौशल्ये, आधुनिक तंत्रज्ञान शिकून आत्मसात करणे आवश्यक आहे. दांडेकर टेक्निकल इन्स्टिट्यूटमध्ये विविध प्रकारचे अभ्यासक्रम आहेत. त्यांचे उत्तम मार्गदर्शन केले जाते. याचा प्रत्यय येतो. आत्मविश्वास महत्त्वाचा असतो व तो येथे मिळतो. लोकप्रिय अभिनेता चिन्मय उदगीरकर यांनी असे प्रतिपादन केले.

नाशिक व्यवसाय विद्या प्रसारक मंडळ संचलित दांडेकर टेक्निकल इन्स्टिट्यूट या ख्यातनाम संस्थेचे बुधवारी दि. ७ रोजी स्नेहमेळावा व पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले. कॉलेजरोडवरील गुरुदक्षिणा सभागृहात सायंकाळी ५.३० वाजता हा कार्यक्रम झाला. संस्थेला यंदा ८८ वर्षे पूर्ण झाली असून, दिमाखदार वाटचाल सुरू आहे. संस्थेने आतापर्यंत अनेक महिला, युवकांना त्यांच्या पायावर उभे करून त्यांचे संसार मार्गी लावण्यास मदत केली. स्नेहमेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून लोकप्रिय अभिनेते व सामाजिक कार्यकर्ते चिन्मय उदगीरकर उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष ॲड. अविनाश भिडे यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. प्राचार्या व कार्यवाह मानसी देशमुख यांनी अहवाल वाचन केले. यावेळी गुणवंत विद्यार्थी, शिक्षक व देणगीदारांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चारुशीला शिंगणे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व आभारप्रदर्शन सुभाष सबनीस यांनी केले. उपाध्यक्ष दिलिप डोंगरे, कोषाध्यक्ष अरुण पैठणकर तसेच संचालक मंडळ सदस्य बाळकृष्ण कुलकर्णी, सुधाकर पोळ, सुहास शुक्ल, नीलेश देशपांडे व संध्या कांबळे, तेजश्री सोनवणे आदी सहकाऱ्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

**नेत्रवेधक फॅशन शो रंगला**

यावेळी फॅशन डिझाइनच्या द्वितीय वर्षातील व ब्यूटिशियन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थिनींनी रंगारंग फॅशन शो सादर केला. या नेत्रवेधक कार्यक्रमात देवेंद्र पारख हा एकमेव विद्यार्थी सहभागी झाला. प्रतिभा गर्गे, प्रियांका जाधव, बनलिशा भारस्कर, स्विटी सासे, वैष्णवी माळी, कसक मकवाना, राहिला पठाण, श्रद्धा पगारे, मेघा कुलकर्णी, सोनाली सोनवणे, सुमित्रा प्रजापती, ईश्वरी व पूजा हेगडे, रूपाली वाकळे, रंजना चतुर, साक्षी पाटील, मनीषा धाडगे, मोनिका ढेरिंगे तसेच किशोरी सोनवणे, गायत्री भदाणे, सपना इप्पर, भारती आहेर, पूजा माळोदे यांनी सहभागी होऊन पारंपरिक व नवनव्या फॅशन्सचे आत्मविश्वासाने सादरीकरण केले.

# डेला रिसॉर्ट्सची हिरानंदानी डेव्हलपर्ससोबत भागीदारी

## पुण्यामध्ये १,१०० कोटींचा मेगा टाऊनशिप प्रकल्प उभारणार

**नाशिक :** डेला रिसॉर्ट्स अँड ॲडव्हेंचरने हिरानंदानी कम्युनिटीज अँड क्रिसला डेव्हलपर्ससोबत प्रोप्रायटरी सीडीडीएमओ मॉडेलसाठी हातमिळवणी केली आहे. तब्बल ११०० कोटी रुपये उत्पन्न मिळवून देण्याची क्षमता असलेली रेसकोर्स थीम्ड मेगा टाऊनशिप उभारण्यासाठी ही भागीदारी करण्यात आली आहे. महत्त्वाचे म्हणजे, भारतीय स्थावर मालमत्ता उद्योगक्षेत्रात हे पाऊल पहिल्यांदाच उचलले गेले आहे. विशिष्ट संकल्पनेवर आधारित, हॉस्पिटॅलिटी-चलित मॉडेलने स्थावर मालमत्ता क्षेत्रात एक नवीन गुंतवणूक वर्ग खुला आहे, ज्यामध्ये गुंतवणुकीवर ९% पर्यंत परतावा देण्याची क्षमता आहे. या मॉडेलमुळे हा मूल्य प्रस्ताव स्थावर मालमत्तेच्या पलीकडे जाऊन, एक खास निवडण्यात आलेली लाइफस्टाइल इकोसिस्टिम निर्माण करतो, ज्यामध्ये अतुलनीय लक्झरी, कम्युनिटी आणि अनुभवात्मक हॉस्पिटॅलिटी यांचा मिलाफ आहे.




पुण्यातील वेगाने विकसित होत असलेल्या उत्तर हिंजवडीमध्ये तब्बल ४० एकरांहून मोठ्या परिसरात वसवण्यात येणार असलेल्या या टाऊनशिपमध्ये ८ एकरांचे रेसकोर्स आणि इंटरनॅशनल पोलो क्लब, १२८ खासगी व्हिला प्लॉट्स, ११२ रिसॉर्ट खासगी निवास, ३०० खोल्यांचे पंचतारांकित लक्झरी रिसॉर्ट, ९ वेडिंग डेस्टिनेशन व्हेन्यू, १२ कॉर्पोरेट आणि माईस व्हेन्यू, एक्स्ट्रीम ॲडव्हेंचर पार्क, डेला रेन्ज गोल्फ, वेलनेस सुविधा आणि डेलाची खासियत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डिझाइन संवेदनांनी सजलेल्या एक्स्पेरिएन्शियल जागा यांचा समावेश असेल. या टाऊनशिपची आधुनिक ऑरगॅनिक आणि ब्रिटिश कलोनियल आर्किटेक्चरल आणि डिझाईन शैली अनुभवात्मक जगणे, स्थिर परतावा आणि दीर्घकालीन संपत्ती वृद्धी यांना महत्त्व देणाऱ्या घरमालकांच्या व गुंतवणूकदारांच्या नवीन पिढीच्या सौंदर्याशी संबंधित आवडीनिवडींना पुरेपूर अनुरूप आहे.

डेला रिसॉर्ट्स अँड ॲडव्हेंचरचे संस्थापक आणि अध्यक्ष तसेच या महत्त्वपूर्ण विकासामागे ज्यांची दूरदृष्टी आहे असे श्री. जिमी मिस्त्री यांनी सांगितले, ही केवळ एक टाऊनशिप नाही तर भारतामध्ये आजवर कधीही पाहिले न गेलेल्या स्थावर मालमत्ता मॉडेलचा हा उदय आहे. सीडीडीएमओ दृष्टिकोनासह आम्ही स्थावर मालमत्तेला केवळ उत्पादन नव्हे तर अनुभव म्हणून निर्माण करू इच्छितो.

उद्योगक्षेत्रातील दिग्गज, हिरानंदानी कम्युनिटीजचे अध्यक्ष डॉ. निरंजन हिरानंदानी यांनी या भागीदारीविषयी सांगितले, भारतीय स्थावर मालमत्ता उद्योगामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून येत आहे. एकात्मिक, वन-स्टॉप डेस्टिनेशन्समध्ये जीवनशैलीवर भर देणाऱ्या जगण्याबाबत घरखरेदीदारांच्या वाढत्या महत्त्वाकांक्षा या परिवर्तनाला दिशा आणि चालना देत आहेत. नावीन्य आणि ट्रेंड्स निर्माण करणे हे नेहमीच हिरानंदानीचे हॉलमार्क्स म्हणून ओळखले जातात. उत्तर हिंजवडी, पुण्यामध्ये १०५ एकरांच्या टाऊनशिपसाठी क्रिसला डेव्हलपर्ससोबत आमची धोरणात्मक भागीदारी म्हणजे हिरानंदानी ग्रुपने पुण्यातील वेगाने वाढत असलेल्या स्थावर मालमत्ता बाजारपेठेत केलेले पदार्पण आहे. शिवाय, डेला ग्रुपसोबत केलेला विकास व्यवस्थापन करार विशेष निवडण्यात आलेल्या, खास अनुभव देणाऱ्या, राहण्याच्या जागा पुरवण्याची आम्ही कटिबद्धता मजबूत करतो.

# 'ऑपरेशन सिंदूर'मुळे पाकी शेअर मार्केटमध्ये भूकंप

## केएसई १०० निर्देशांक ३५५९ अंकांनी गडगडला



**नवी दिल्ली :** भारतानं पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला ऑपरेशन सिंदूर राबवत घेतला आहे. ऑपरेशन सिंदूरअंतर्गत भारताच्या तिन्ही दलांनी संयुक्तपणे अभियान राबवत पाकिस्तानातील ५ आणि पाकव्याप्त जम्मू -काश्मीरमधील ४ ठिकाणी एअर स्ट्राइक केले. भारताच्या या हल्ल्यामुळे पाकिस्तानच्या स्टॉक मार्केटमध्ये भूकंप झाल्याचं पाहायला मिळालं. पाकिस्तानी शेअर मार्केटमधील प्रमुख निर्देशांक केएसई १०० हा ३५५९ अंकांनी घसरला. पाकिस्तानी शेअर बाजारातील केएसई १०० हा निर्देशांक ३.३ टक्क्यांनी घसरून १,१०,००९ अंकांवर बंद झाला.

केएसई १०० निर्देशांक सकाळी बाजार सुरू झाला तेव्हा ६५६०.८२ अंकांनी घसरून १०७००७.६८ अंकांवर पोहोचला होता. पाकिस्तानातील टॉपलाइन सिक्युरीटीज या ब्रोकरेज फर्मनं पाकिस्तानच्या स्टॉक मार्केटमध्ये गेल्या ९ व्यापार सत्रात ४.१ टक्के घसरण झाल्याचं म्हटलं.

केएसई १०० निर्देशांक मंगळवारी देखील घसरला होता. स्टेट बँक ऑफ पाकिस्तानकडून व्याजदरात कपात करण्यात आल्यानंतरदेखील शेअर बाजारात घसरण झाली. मंगळवारी पाकिस्तानचा शेअर बाजार ५३३.७३ अंकांनी घसरला होता.

भारतीय सुरक्षा दलांनी संयुक्तपणे ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तान आणि पाकव्याप्त जम्मू -काश्मीरमधील ९ ठिकाणांवर हवाई हल्ले केले. भारतानं पाकिस्तानच्या एअर स्पेसमध्ये न जाता हे हल्ले केले आहेत. पहलगाम मध्ये २२ एप्रिलला दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला होता. त्या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला होता. यामध्ये २५ भारतीय आणि १ नेपाळच्या व्यक्तीचा मृत्यू झाला होता.

केएसई १०० निर्देशांक पुलवामा दहशतवादी हल्ल्यावेळी २ टक्क्यांनी घसरला होता. तर, त्यानंतर बालाकोटमध्ये भारतानं एअर स्ट्राइक केला होता. त्यावेळी केएसई १०० निर्देशांक १.४० टक्क्यांनी घसरला होता.

**आर्थिक समस्यांमुळं केएसई १०० निर्देशांकात घसरण**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावाच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानच्या स्टॉक मार्केटवर विपरीत परिणाम झाला आहे. पाकिस्तानच्या आर्थिक अस्थिरतेमुळं स्टॉक मार्केट केएसई १०० निर्देशांकात घसरण सुरू आहे. भारतानं पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तान विरुद्ध आक्रमक भूमिका घेतली आहे. भारतानं सिंधू जल करार स्थगित केलेला आहे. भारतानं चिनाब नदीतून वाहून जाणारं पाणी अडवलं आहे.

# मुंबईकरांचा प्रवास महागला, बेस्ट बसच्या दरात वाढ

**मुंबई :** मुंबईकरांसाठी मोठी आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. मुंबईकरांचा बस प्रवास आता महाग होणार आहे. बेस्ट बसच्या प्रवासभाड्यामध्ये दुप्पट वाढ करण्यात आली आहे. ही भाडेवाढ आजपासून ( ९ मे २०२५) लागू करण्यात येणार आहे. दरम्यान, या भाडेवाढीचा फटका सर्वसामान्य मुंबईकरांना बसणार आहे.



१. प्रवास भाडेटप्प्यात बदल : विद्यमान भाडेसारणीमध्ये ५,१०,१५, व २० कि.मी. अंतरावर भाडेटप्पा देण्यात आले होते. तथापि प्रस्तावित भाडेतक्त्यामध्ये ५,१०,१५,२०, २५,३०,३५,४०,४५ व ५० कि.मी. व त्यानंतर प्रत्येक ५ कि.मी. अंतरावर भाडेटप्पा देण्यात आलेले आहेत.

२. विना वातानुकूलित बससेवा : ५ कि.मी. अंतरापर्यंतचे किमान प्रवासभाडे ५ रुपयांवरून १० रुपये करण्यात आले आहे.

३. वातानुकूलित बससेवा : ५ कि.मी. अंतरापर्यंतचे किमान प्रवासभाडे ६ रुपयांवरून १२ रुपये करण्यात आले आहे.

४. सवलतीचे प्रवास भाडे : विद्यमान प्रवासभाड्यात १२ वर्षे वयापर्यंतच्या मुलांना सवलतीच्या प्रवासभाड्याची तरतूद उपलब्ध नाही. परंतु, नवीन सुसूत्रीकरणादरम्यान ५ ते १२ वर्षे वयापर्यंतच्या मुलांना प्रवासभाड्यात सवलतीची तरतूद करण्यात आली आहे.

५. दैनंदिन / मासिक बसपास या दैनंदिन / मासिक बसपासच्या सहाय्याने प्रवासी मुंबई शहर, उपनगरे तसेच बेस्ट उपक्रमाचे बसप्रवर्तन कार्यरत असलेल्या संपूर्ण प्रवर्तन क्षेत्रामध्ये अमर्याद प्रवास करू शकतील. दैनंदिन बसपासचे शुल्क रु.६०/- वरून रु.७५/- करण्यात आलेले आहे. व मासिक शुल्क रु.९००/- वरून रु.१८००/- करण्यात आलेले आहे.

६. शालेय विद्यार्थ्यांकरिता बसपास : उपक्रमाच्या बससेवांवर खासगी शैक्षणिक संस्था, महाविद्यालय, विद्यापीठ यामधून शिक्षण घेणाऱ्या वयोमर्यादा २६ वर्षांखालील विद्यार्थ्यांना विद्यमान सवलतीच्या दरात बसपास उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या बसपासच्या मूल्यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

७. महापालिका शाळेतील गणवेशधारक विद्यार्थी : महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना उपक्रमाच्या बसगाड्यांमधून मोफत प्रवासाची सुविधा विद्यमान पद्धतीने CH-LO स्माटकार्डच्या सहाय्याने देण्यात येणार आहे. बेस्टच्या आर्थिक डबघाईवर तोडगा काढण्यासाठी ही भाडेवाढ करण्यात आली असल्याची माहिती आहे.




# एलआयसीकडून टाटा स्टीलच्या २५ कोटी शेअरची खरेदी

**मुंबई :**

भारतातील सर्वांत मोठी जीवन विमा कंपनी एलआयसीनं टाटा स्टीलमधील भागीदारी वाढवली आहे. टाटा स्टील कंपनीनं २५ कोटी शेअर खरेदी केले आहेत.

भारतीय जीवन विमा निगम अर्थात एलआयसीनं टाटा ग्रुपच्या टाटा स्टील कंपनीच्या शेअरवर मोठ्या प्रमाणात पैसे लावले आहेत. एलआयसीनं टाटा स्टीलचे २५ कोटी शेअर खरेदी केले आहेत.

एलआयसीची टाटा स्टीलमधील भागीदारी आता ७.८५ टक्क्यांवर पोहोचली आहे. टाटा स्टीलनं याबाबतची माहिती स्टॉक एक्स्चेंजला दिली आहे. एलआयसीनं टाटा स्टीलचे २,५१,२६६,१८८ शेअर खरेदी केले आहेत. टाटा स्टीलच्या शेअरमध्ये थोडी तेजी पाहायला मिळाली.

# एमपीए नाशिकरोड नूतन कार्यकारिणी पदग्रहण सोहळा

**नाशिकरोड : वार्ताहर**

समाजाचा एक घटक म्हणून आपण समाजाचे देणे लागतो. समाजाने व कुटुंबाने नाकारलेल्यांना आधार देणे, त्यांचे संगोपन करणे, त्यांना समाजाच्या मूळ प्रवाहात समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असते, असे प्रतिपादन गार्डा बालसदन या अनाथ बालिकाश्रमाचे डॉ. रत्नाकर पवार यांनी केले.

एमपीए नाशिकरोड नूतन कार्यकारिणी पदग्रहण सोहळ्याप्रसंगी कर्मयोगी महंत डॉ. रत्नाकर पवार बोलत होते. माजी नगरसेवक संभाजी मोरुस्कर प्रमुख अतिथी होते. त्यांच्या हस्ते नूतन कार्यकारिणी सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी डॉ. आसिफ तांबोळी यांनी डॉ. प्रकाश पुंड यांच्याकडून अध्यक्षपदाची, डॉ. धनंजय पाटील यांनी डॉ. तांबोळींकडून सचिवपदाची, डॉ. महेंद्र गाडेकर यांनी डॉ. प्रमोद पाटील यांच्याकडून खजिनदारपदाची तर डॉ. संगीता सरोदे यांनी डॉ. सौ. कौसर तांबोळी यांच्याकडून महिला विभागप्रमुखांची सूत्रे स्वीकारली.

प्रारंभी श्रीगणेश वंदना व धन्वंतरी पूजनाने सुरू झालेल्या या कार्यक्रमात मीनल मराठे, हर्षिता, अपूर्वा, काव्या, निहारिका, मेहेक, मेघना यांनी नृत्याविष्कार सादर केला. एमपीए ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. अशोक निरगुडे यांनी प्रास्ताविक केले. मावळते अध्यक्ष डॉ. प्रकाश पुंड यांनी त्यांच्या दोन वर्षांच्या कार्यकाळातील कामांची सविस्तर माहिती दिली. डॉ. प्रमोद पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



यावेळी डॉ. नंदकिशोर कातोरे, माजी नगरसेवक पंडित आवारे, डॉ. सिंधीकर, डॉ. संतोष धात्रक आदी व्यासपीठावर होते. कार्यक्रमास डॉ. सुलभा पवार, डॉ. सतीश पापरीकर, डॉ. राजीव पाठक, डॉ. मेघा पापरीकर, डॉ. शैलेश निकम, डॉ. तुषार सूर्यवंशी, डॉ. भालचंद्र ठाकरे, डॉ. प्रतिभा वाघ, डॉ. शिरीष घन, डॉ. प्रशांत भुतडा, डॉ. सुषमा भुतडा, डॉ. आहेर, नेहा आहेर, डॉ. सुनील पाटील, डॉ.सारंग दराडे, डॉ. रवी कुटे, कैलास कुटे, डॉ. गणेश कोळपे, डॉ.उत्तमकुमार जोशी, डॉ. आर. वाय. कुलकर्णी, डॉ. युनूस तांबोळी, डॉ.के. डी. बुवा, डॉ. दीपक सरोदे, डॉ. सुरेश आहेर, डॉ. समीर कोदारे, डॉ. हाफिज सय्यद, डॉ. नीलेश कुंभारे, डॉ. क्षत्रिय, चेतन सोनकुळे, संजय बागूल, अमित सर्वज्ञ, डॉ. सचिन नवले, डॉ. अभिनंदन कोठारी, डॉ. प्रसाद वाघ, डॉ. सारंग मराठे, डॉ. ज्ञानेश बोरसे, डॉ. चंद्रकांत बोरसे, डॉ. खाचणे, डॉ. भोगे, डॉ. विजय गवळी, डॉ. पांडुरंग पाटील, विशाल वालखेडे आदी उपस्थित होते.

डॉ. राजेश चाकोते, डॉ. नितीन म्हस्के व डॉ. राजश्री हरक यांनी सूत्रसंचालन केले. सचिव डॉ. धनंजय पाटील यांनी सर्वांचे आभार मानले.



**मुळातच आयुष्य हे खूप लहान असल्याने काही नियम सहजपणे मोडीत काढा आणि मनमुराद हसा. मुख्य म्हणजे खेदात, न्यूनगंडात जाऊ नका. या क्षणापासून उर्वरित आयुष्य तुम्हाला हसतमुख, आनंदी राहायचे आहे. आपण जे काही केले नाही, करू शकलो नाही त्याबद्दल दुःखी, निराश तर मुळीच होऊ नका. जे काही करायचे आहे ते पूर्ण क्षमतेने सर्वोत्कृष्टच करा. भूतकाळातल्या साऱ्या गाठी सोडून टाका. आता नव्याने जगण्यासाठी आपले सुरक्षित बंधन सोडा. समुद्रात वादळे घोंगावणारच आहेत. मोठी स्वप्ने पहा पण त्याला अंतर देऊ नका.**

**मोहन माळी**
नाशिक

# जीवन सुंदर आहे...



जीवनात यशाचा एक आलेख तयार करण्यासाठी निरंतर कष्टाची गरज असते. यश असतेच, यश मिळतेच पण त्यासाठी पाठलाग हवा. तोच पाठलाग आपण करत नाही. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात माणुसकीपण हरवलं, माणसं हरवली, नाती हरवली. भावना शून्य होत असताना जगण्याची एक रीत असते, तीच आम्ही हरवली. आयुष्याच्या पटलावर मी कोण याचा शोध घ्यावा लागतो, तो शोध जीवन जगण्यासाठी एक यशस्वीतेची किनार असते. ती किनार आपल्याला शोधावी लागते. तो शोध मानवी मनाच्या आर्त पोकळीतून निर्माण होतो.

जगण्याच्या अनेक वाटा असतात, पण त्यात यशस्वीतेची वाट कोणती याचा शोध घ्यावा लागतो. माणसं बदलतात. प्रवृत्ती बदलते पण आपण का बदलावं. जीवनाच्या शिखरावर चढताना स्वप्नांची एक रांगोळी असते, त्या रांगोळीमध्ये अनेक ठिपके असतात. ते ठिपके जोडले की सुंदर रांगोळी तयार होते. आयुष्यात तेच असते. सुखाचे ठिपके जोडणे आपल्या हातात असतं. त्या ठिपक्यांचा शोध आपण घ्यावा लागतो. जगण्यातून जगण्याची उमेद निर्माण करण्याची एक शक्ती आपल्यात निर्माण करण्याचं काम कोणीतरी करत असतो. तो एक दैवी संकेत असतो. तो दैवी संकेत आपल्याला कार्यप्रवण बनण्याची क्षमता आपल्यात निर्माण करत असतो. ती शक्ती वेळीच ओळखायला हवी.

आलेल्या क्षणाचे संधीत रूपांतर करणे हे खरे तर आपले नशीब असते. ती संधी आपल्याला वेळीच ओळखता आली पाहिजे. ते एक सुंदर लेणं असतं. आपल्या आयुष्यातलं जे लेणं आपल्या आयुष्याला सुखाची झालर निर्माण करण्याचं काम करत असतं. तो क्षण महत्त्वाचा असतो. आयुष्यात तो ओळखता यायला हवा.

आयुष्यात सुखानंदात सर्वच सोबती असतात, पण दुःखात, वेदनेत तसेच पडत्या काळात जे आपल्या सहप्रवासात असतात तेच आपले खरे असतात. ज्यांची हाताची व हृदयाची उदारता मैत्रीत उतरते, अशांच्या सोबतीत आपण राहायला हवे. अर्थात आपल्याला माणसं ओळखता यायला हवीत. ती ओळख खूप महत्त्वाची असते. मोहमायात जगताना आपल्याला एक भुरळ पडत असते. अशावेळी आपण आपल्या अस्तित्वाला जपणं हे खूप गरजेचं असतं. तो क्षण महत्त्वाचा असतो. आपल्या आयुष्यात अशा वेळेस आपल्याला माणसं ओळखता येतात. आपली कोण, आपल्यातली कोण, आपल्यासाठी कोण ती ओळखली की जीवन सुंदर होते. ◆◆◆

## नोकरी

### सैनिक स्कूल सातारा

- पदाचे नाव : टीजीटी, रायडिंग इन्स्ट्रक्टर, मेडिकल ऑफिसर, संगीत शिक्षक
- एकूण रिक्त पदे : ०४ पदे
- नोकरी ठिकाण : सातारा
- अर्ज करण्याची पद्धत : ऑफलाइन
- अर्जाची शेवटची तारीख : ०५ जून २०२५
- अर्ज सादर करण्याचा पत्ता : मुख्याध्यापक, सैनिक स्कूल सातारा, PO Box No-२०, सदर बाजार, जिल्हा- सातारा (महाराष्ट्र) ४१५ ००१.
- वेबसाइट : http://www.sainiksatara.org/

### राष्ट्रीय आरोग्य अभियान, नाशिक भरती २०२५

- पद : कीटकशास्त्रज्ञ, सार्वजनिक आरोग्यतज्ज्ञ
- एकूण रिक्त पदे : १० पदे
- नोकरी ठिकाण : नाशिक
- निवड प्रक्रिया : मुलाखत
- मुलाखतीची तारीख : १५ मे २०२५
- अर्ज स्वीकृती वेळ : सकाळी १०.३० ते ३.०० वाजेपर्यंत
- मुलाखतीची पत्ता : जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, नाशिक
- वेबसाइट : https://arogya.maharashtra.gov.in/

# फॅशन आणि मस्तीची कॉलॅब!

**ज्योती हांडगे**
फॅशन डिझाइनर

कॉलेज म्हणजे फक्त लेक्चर, असाइन्मेंट्स आणि परीक्षा एवढंच नाही...

कॉलेज म्हणजे स्टाइलचं, मस्तीचं आणि मैत्रीचं हटके युनिव्हर्स!

आणि या युनिव्हर्समध्ये फॅशन आणि फ्रेंड्स यांची जबरदस्त कॉलॅब म्हणजेच - 'College Lookbook with a Twist of Fun!'

चला, तर मग करूया उहापोह - मस्तीभरी फॅशनबद्दल, जी मैत्रिणींसोबत अजूनही खास वाटते!

**१. कॉलेजचा रनवे - तुमच्या पायांखालचा रस्ता!**

ज्याचं कॉलेज चालू असतं, त्याचं कॅटवॉक सुरू असतं! कधी फुल झिंटॅक कुर्ता, कधी टीशर्टवर झकास डेनिम जॅकेट, तर कधी साध्या कुर्तीवर - कॉलेजमध्ये प्रत्येक दिवशी एक वेगळी स्टाइल जगायला मिळते. आणि ती स्टाईल बनते - मैत्रिणींच्या सल्ल्यांवर, मस्तपणावर आणि ए अगं हे ट्राय कर ना! यावर!

**२. मैत्रीण म्हणजे मिरर... पण थोड़ी judgmental!**

तू काहीतरी नवं स्टाइल ट्राय करतेस आणि ती पाहून मैत्रीण फक्त डोळे मोठे करून म्हणते - वॉव! तू बदललीस गं!

मग तीच सांगते - ओव्हरसाइज टीवर चंकी शूज कसे मॅच करायचे, की पेस्टल शेड्समध्ये काय भारी दिसतं.

अशा सिक्रेट कॉलेज कॉर्नरमध्ये होणाऱ्या फॅशन वर्कशॉप्स, पाणीपुरीवर होणाऱ्या डिबेट्स आणि लायब्ररीतले स्टाईलिंग गॉसिप्स म्हणजेच खरी मस्ती!

**३. क्लासरूम कॅटवॉक : स्टाइलमध्ये गोंधळ हवाच!**

क्लास सुरू होतो आणि पाच मैत्रिणी एंट्री घेतात -

सिंपल सूटमध्ये एकजण, कूल डेनिम लुकमध्ये दुसरी, टोटल ट्रेंडी थर्ड आणि बाकी दोन अजूनही यापेक्षा नवीन काय घालू? मोडमध्ये!

शिक्षक विचारतो - तुम्ही कॉलेजला आला आहात ना, की एखाद्या फॅशन शोला?

आणि आम्ही विचार करतो - दोन्ही!

**४. कॅन्टीन म्हणजे रनवे + रॅम्पवॉक + रील्स स्पॉट!**

कॅन्टीनची पायरी ही फक्त बसायची जागा नाही, ती आहे - रील शूटिंगच्या स्वप्नांची सुरुवात!

मग काय, कधी matching earrings, कधी जुने dupatta reuse करून त्यावर DIY fringe लावून काय भारी गं लुक आहे तुझा! ऐकायला मिळतं.

**५. फॅशन फेल... पण मस्ती पास!**

कधी एखाद्या दिवशी लुक भारी फसतो mismatch होतो आणि सगळ्या मैत्रिणी सडत सांगतात -

हे काय केलं गं तू?

पण तेवढ्यात कोणी तरी बोलतं - लुक्सपेक्षा attitude भारी हवाच!

...आणि मग ते हास्य, ते कॅमेऱ्यातलं funny pic, ते म्हणजेच खरी कॉलेज फॅशन मेमरी!



**६. कॉलेज संपलं पण स्टाइल मेमरीज कायम!**

आजही जुने फोटो पाहिले की आठवतं -

ती एक फ्रेंड जी नेहमी लिपस्टिक मागायची,
ती जी चप्पल घालायचं विसरायची
आणि ती जी रोज नवीन hairstyle करून यायची आणि म्हणायची - अगं याला effort नाही लागत! ...पण effort दिसायचा!


**७. कॉलेज फॅशन म्हणजे काय?**

ते कुठल्याही ब्रँडचं नव्हतं, ते आमच्या मस्तीनं बनवलेलं होतं -

कधी recycled dupatta, कधी फक्त confidence, कधी नवे जुमके, कधी जुना टॉप.

आणि ते share करायचं - हक्कानं, प्रेमानं आणि हे घे, तुला सूट होईल! अशा बोलण्याने. ◆◆◆

# टायपिंग सॅव्ही



**प्रा. अलका सानप**
नाशिक

आम्ही हल्ली जवळजवळ हातात वाही आणि पेन घेऊन लिहीणंच विसरलोय. आज प्रत्येक माणूस लिहिणेच विसरू लागलाय. त्याला लिहिण्यापेक्षा मोबाइल अथवा कम्प्युटरवर टायपिंग करणे सोपे आणि सवयीचे होत असल्याचे दिसून येत आहे.

आजच्या टेक्नोसॅव्ही युगात लोक हाताने कमी लिखाण करतात. त्यामुळेच कागद पेन्सिल आणि पेनच्या मागणीत लक्षणीय घटही होत आहेच. कागदावर लिहिण्यापेक्षा मोबाइल अथवा कम्प्युटरवर टायपिंग करणे लोकांना अंगवळणी पडले आहे. मोबाइलवरील मजकूर अतिशय स्वच्छ आणि स्पष्ट दिसतो. त्यात हवा तेव्हा आणि हवा तसा बदल करणे शक्य होते. त्यामुळेच लिखाणापेक्षा मजकूर टाइप करण्याचे प्रमाण वाढत आहे.

एकमेकांना महत्त्वाचे निरोप देण्यासाठी मेसेजिंग, चॅटिंग अथवा मेलिंग करणे खूपच सोयीचे आणि व्यवहार होऊ लागल्यामुळे लिखाणापेक्षा टायपिंगचे प्रमाण वाढत आहे. हे प्रमाण भविष्यात आणखी वाढेल, असा दावा संशोधकही करत आहेत.

लोकांना यांत्रिक उपकरणांची सवय झाली आहे. कित्येकजण मोबाइल अथवा कम्प्युटरवर टाइप करूनच संदेशांची देवाणघेवाण, सर्वच महत्त्वाची कामे, काही सामानाची लिस्ट, हिशेब आणि पैशाची देवाणघेवाणही करू लागले आहेत. आता एवढे शिकूनही कागद-पेन घेऊन लिखाण करणे अवघड जाते. कित्येकांना सलग महिना-दीड महिना हातात पेन किंवा पेन्सिल न घेताच संदेशांची देवाणघेवाण करणे शक्य होत आहे. काही मंडळी तर सहा महिने ते वर्षभराच्या कालावधीत एका अक्षराएवढेही लिखाण कागदावर करत नाहीत. त्यामुळे लोकांची लिखाणाची सवय सुटली आहे. अनेकांचे अक्षर अतिशय खराब झाले आहे.

डॉकमेलचे संशोधक सांगतात, त्यांच्या पाहणीनुसार, बहुसंख्य व्यक्ती ४१ दिवसांत एकदाच कागदावर लिखाण करतात. दर तीनपैकी एक व्यक्तीसह महिन्यात एकदाच कागदावर लिखाण करतात. चॅटिंग, इ-मेल, एसएमएस आणि आजच्या युगात कागदावर पत्र लिहिणे तर दुर्मिळच झाले आहे.

**पण तुझ्याविना अधुरे अन्**
**अपुरेच आम्ही...**
**पुन्हा शोधून वही अन् पेन..**
**मनातले कागदावर उतरवणार आम्ही..**

या मनातल्या वचनासह इथेच थांबते. ◆◆◆

# जिंदगी का साथ निभाता चला गया...

**ऋतुजा अहिरे**
नाशिक

काल खूप दिवसांनी पुण्याला जाण्याचा योग आला. प्रवास करणे, हल्ली मला फार मजेशीर वाटते. एका शहरातून दुसऱ्या शहरात जाताना, स्वप्न पूर्ण करण्यासाठी कम्फर्ट झोन मागे सारून, कर्मभूमी गाठत असतो. बसमध्ये जाताना नाना तऱ्हेची लोकं भेटतात. यावेळी माझ्या शेजारी एक संगीताच्या शिक्षिका बसल्या होत्या. त्यांच्या संगीतावरच्या प्रेमाचे वर्णन करताना त्या म्हणाल्या, गाणं म्हणताना मला सगळे कसे विसरायला होते. साधना म्हणजे काय हे मला गाण्याने शिकवले. आयुष्यात येणारे यश-अपयश कसे पचवावे हे मी गाण्यातून शिकले. म्हणजे बघ ना, आपण गाणे ऐकतो तेव्हा ते जर एकाच सुरात असेल तर किती रटाळ वाटेल, पण तेच कधी वरचा सूर तर कधी अगदी खालचा-असे गण्यातले चढ-उतार गाण्याला त्याचे सूर देतात. आणि शेवटी माझ्या खूप आग्रह केल्यावर त्यांनी मला गाण्याच्या दोन ओळी म्हणून दाखवल्या- में जिंदगी का साथ निभाता चला गया, और फिक्र को धुँए में उड़ाता चला गया.

मला विचाराल तर आयुष्य हे एका शहरातून दुसऱ्या शहरात होणाऱ्या प्रवासासारखे आहेत. शहर म्हणजे आपल्या आयुष्याचे वेगवेगळे टप्पे. बालपणापासून ते उतारवयापर्यंत अनेक बस आपल्याला बदलाव्या लागतात. या प्रवासात कित्येक लोक भेटतात, काही सोबतीला असतात, काही थोड्या काळासाठी भेटतात पण कायमस्वरूपी आठवण देऊन जातात, काही लोक प्रवासात मागे तर काही पुढे जातात. पण हा प्रवास, सगळ्यांचाच वेगळा असतो म्हणून कोणी मागे राहिले किंवा कोणी पुढे गेले म्हणून तुलना होता कामा नये. स्वच्छंदीपणे खिडकी बाहेर डोकावून वाऱ्याची झुळूक चेहऱ्यावर अनुभवली पाहिजे, रात्रीच्या वेळी अभाळातल्या लुकलुकत्या ताऱ्यामध्ये आपल्या प्रेमाला शोधले पाहिजे, बाजूला बसणाऱ्या व्यक्तीसोबत शॉर्ट टॉक का होईना पण संभाषण सुरू केले पाहिजे- कुणास कधी त्या व्यक्तीशी आपले सूर जुळतील आणि सुंदर गाणे तयार होईल. ◆◆◆

## माय क्लिक



निकिता गरुड
श्वेता खोडे
रेश्मा छल्लारे
विद्या शिरसाठ

# समाधान!

**विलास पंचभाई**
- स्ट्रेस कमी करा -
भाग क्रमांक ३९



**दर आठ पंधरा दिवसांनी आपले जवळचे नातेवाईक गोळा होतात व नेपाळी गाण्यावर ठेका धरतात.. हाताला, पायाला मेहंदी साजशृंगार व छान नटणे मुरडणे... आनंद घेतात जगण्याचा. त्यांच्या चेहऱ्यावर कुठलाही तणाव दिसत नाही...**

समाधान हे पैशात नाही मिळत, ते चेहऱ्यावर असायला लागते... आमच्या अपार्टमेंटमध्ये वॉचमन आहे. त्याच्या आईचे वय जवळपास ९० च्या घरात...दिवसभर फिरत असते.

मुलगा कामावर जाताना रोज दारात उभी राहते व कामावरून आल्यावर तिच्या चेहऱ्यावरचे समाधान शब्दात सांगता येणार नाही व पैशात मोजता येणार नाही....!

पाच-सहा जणांचं कुटुंब १० बाय १० घ्या खोलीत कसे राहत असतील पण राहतात ..आनंदाने राहतात..

गाडी नाही, स्वतःचे घर नाही, त्यामुळे कुठली अपेक्षा नाही.

पण खाऊन पिऊन सुखी... खाण्यापिण्याची मात्र चंगळ.

दर आठ पंधरा दिवसांनी आपले जवळचे नातेवाईक गोळा होतात व नेपाळी गाण्यावर ठेका धरतात..हाताला, पायाला मेहंदी साजशृंगार व छान नटणे मुरडणे... आनंद घेतात जगण्याचा. त्यांच्या चेहऱ्यावर कुठलाही तणाव दिसत नाही...

लहान मुलं पाचवी, सहावीत शिकणारे त्यांच्या हातातही मोबाइल. छानपैकी पार्किंगमध्ये गादी टाकतात आणि बिचारे मस्त मोबाइल खेळत असतात. मधूनच बहीण-भाऊ एकत्र भांडण करतात. खरंच हे पाहिलं ना की मला आमच्या लहानपणाची आठवण येते. किती सुख होतं त्या लहानपणात..! आई-वडिलांचा धाक. आईचं जवळ घेणं, प्रेमाने चुंबन घेणं पण आज मात्र तसं दिसत नाही. आज सगळेच स्वावलंबी झाले आहेत. त्यामुळे कोणालाच कोणाची गरज वाटेना अशी झाली आहे... नेपाळी हे कुटुंब कुठेही जाताना-येताना पाच-सहा जणांच्या घोळक्यानेच फिरत असतात. छान गप्पाटप्पा, हसी मजाक आनंद घेत असतात..

म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर स्ट्रेस अजिबात दिसत नाही, कारण त्यांच्या अपेक्षा लहान, कर्जाचा बोजा नाही. त्यामुळे समाधानी जीवन भलेही त्यांच्याकडे पैसे नसतील, परंतु ते आपल्या कुटुंबाला नात्याला धरून आहेत. आमच्याकडे आज सुबत्ता आली पण आमचेच नातेवाईक आम्हाला ओळखीनाशी झाली आहेत..

आणि बघा बरं संस्काराचा किंवा वातावरणाचा किती फरक पडतो. वॉचमन नेपाळी असला तरी त्याची दोघं मुलं अगदी अस्खलित असे मराठी बोलतात..!

त्यांचे मित्रमंडळीही मराठीच. त्यामुळे एकमेकांकडे जाणं. त्यामुळे त्यांचं घर जरी लहान असलं तरी त्यांच्याकडे देखील मित्रमंडळींचा भरणा आहे..जगण्याचा श्वास मोठा आहे. आमच्याच अपार्टमेंटच्या पार्किंगमध्ये सात-आठ मुलं-मुली नेहमीच खेळायला असतात... मला त्याचं नवल वाटतं की कसं सगळं करून घेतात ही मुलं नेपाळी असूनही... आम्ही मराठी पण मराठी माणूस एकत्र येत नाही. एकमेकांचे सुखदुःख समजून घेत नाही आणि महाराष्ट्रात राहणारा तो मराठी असा आम्ही म्हणतो, परंतु केरळी असेल तर केरळी जवळच जातो. भैया असेल तर भैयाजवळच जातो. पंजाबी असेल तर पंजाबी जवळच जातो. गुजराती असेल तर गुजराथ्याजवळ, मग मराठीने काय घोडं मारलं आहे.... अहो, आमच्या महाराष्ट्रातही वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये वेगळी भाषा बोलली जाते, परंतु मराठी ही सर्वानुमते राष्ट्राची भाषा असली पाहिजे. तुम्ही घरात कोणती भाषा बोलता, त्यापेक्षा व्यवहारात कोणती भाषा बोलता हे जास्त महत्त्वाचं आहे....असो.

पण समाधान हे खरंच पैशाने नाही विकत घेता येत तर मानण्यावर आहे...मग आज ठरवून टाका जे आहे ते छान आहे. आहे त्यात समाधान आहे.... नो चिंता, नको स्ट्रेस...

हम रेंहेगे ऑल टाइम फ्रेश...! ◆◆◆